सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २४ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २३६ । पाने १२ । किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



विवेकानंद केंद्र ही एक जिवंत संस्था आहे. नाती ही कायद्याने निर्माण केलेली नाती नव्हेत तर नैतिक आणि आध्यात्मिक नाते असलेली संघटना आहे. आपण एकमेकांशी कायद्याने नव्हे तर नैतिकतेने बांधले गेलो आहोत. हे आपण स्वखुशीने पत्करलेले नाते आहे. ते यांत्रिक नाते नाही.

**- पद्मविभूषण स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र, पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

### विनम्र अभिवादन



राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका वं. मावशी केळकर यांचा आज (तिथीप्रमाणे) जन्मदिन. हा दिवस संकल्पदिन म्हणून पाळला जातो.

# तरुणांच्या भविष्यापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही : पंतप्रधान

## पेपरफुटीच्या प्रकरणांसाठी जलदगती न्यायालयांची घोषणा



**नवी दिल्ली, २३ जुलै**
पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये सहभागी असलेल्यांवर जलदगतीने खटला चालवून त्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी केंद्र सरकार जलदगती न्यायालये (फास्ट-ट्रॅक कोर्ट) न्यायालये स्थापन करेल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केली. तरुणांच्या भविष्यापेक्षा काहीही महत्त्वाचे नसून त्यांचे हित जपणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्यांना त्वरित आणि कठोर शिक्षा मिळावी, यासाठी 'फास्ट-ट्रॅक' न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. यासंदर्भात आवश्यक ती सर्व पावले उचलण्याचा निर्देश संबंधित प्राधिकारी आणि अधिकाऱ्यांना दिला आहे. विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी आम्ही उचललेल्या पावलांच्या मालिकेतील हे आणखी एक पाऊल आहे, असे 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये नरेंद्र मोदी म्हणाले. जे कोणी आपल्या तरुणांच्या भविष्याला हानी पोहोचवण्याचा प्रयत्न करतील, त्यांना सोडले जाणार नाही, त्यांनी पुढे म्हटले. नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकारावरून दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांचे दीर्घकाळ आंदोलन सुरू असतानाच ही घोषणा करण्यात आली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### पेपरफूट घोर पाप

पंतप्रधान मोदींनी प्रश्नपत्रिका फुटण्याच्या प्रकाराला 'घोर पाप' असे संबोधून, तरुणांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा संकल्प केल्यानंतर काही दिवसांतच केंद्र सरकारची ही घोषणा आली आहे. रालोआच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत हे भाष्य करण्यात आले आणि नंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ते कळवले. नीट परीक्षेचे पेपर फुटल्याचा मुद्दा पक्षीय राजकारणाचा बनू नये. कारण, हा एक राष्ट्रीय मुद्दा आहे आणि तो केवळ एका राज्याचा किंवा केवळ केंद्राचा विषय नाही, असे किरण रिजिजू यांनी सांगितले. ■

### या संकटासाठी मोदीच जबाबदार : राहुल गांधी



या संकटासाठी पंतप्रधान मोदीच जबाबदार आहेत, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. तरुणांच्या भविष्याचे सर्वाधिक नुकसान तुम्हीच केले आहे. तुम्ही आपल्या शिक्षण व्यवस्थेवर पूर्ण ताबा मिळवण्याला आणि तिचा विध्वंस करण्याला केवळ परवानगीच दिली नाही तर, त्याला प्रोत्साहनही दिले आणि यासाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण दिले, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचाही पुनरुच्चार करताना धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवा, विद्यार्थ्यांची माफी मागा आणि विद्यार्थ्यांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करा, अशा तीन मागण्या त्यांनी केल्या. ■

# ठाकरेंच्या काळातच 'टीईटी' महाघोटाळा

## ठाकरे बंधूंवर मुख्यमंत्र्यांचा घणाघात



**मुंबई, २३ जुलै**
नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ २६ जुलै रोजी रस्त्यावर उतरण्याची घोषणा करणाऱ्या ठाकरे बंधूंवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडकून टीका केली आहे. ठाकरे बंधूंचा हा आगामी मोर्चा विद्यार्थ्यांच्या हितासाठी नसून, केवळ स्वतःची गमावलेली राजकीय जमीन आणि अस्तित्व पुन्हा मिळवण्यासाठी चाललेला हा एक केविलवाणा खटाटोप आहे, असा जोरदार पलटवार मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे. ज्यांच्या स्वतःच्या काळात राज्याच्या इतिहासातील 'टीईटी'चा सर्वात मोठा शैक्षणिक घोटाळा झाला, त्यांनी आता विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या गप्पा मारणे हा निव्वळ राजकीय जुमला असल्याची घणाघाती टीका त्यांनी केली.

उद्धव ठाकरे यांना त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातील काळ्या इतिहासाची आठवण करून देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) घोटाळा हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच झाला होता. या महाघोटाळ्यात थेट आयएएस अधिकाऱ्यांपासून ते त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांपर्यंत अनेकांचा सहभाग होता. केवळ पेपरच फुटले नाहीत, तर नापास झालेल्या उमेदवारांकडून पैसे घेऊन निकाल बदलून त्यांना पास करण्याचे मोठे पाप त्याच काळात झाले, असा सणसणीत टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

**राज ठाकरेंना सर्वत्र जंतरमंतरच दिसते**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. राज ठाकरे यांनी नुकत्याच केलेल्या 'जंतरमंतर' या वक्तव्याचा संदर्भ घेत मुख्यमंत्र्यांनी त्यांना चिमटा काढला. ◂ (तभा वृत्तसेवा)

### हिंमत असल्यास संसदेत चर्चा करावी

वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील (नीट) गोंधळाच्या मुद्द्यावरून रस्त्यावर उतरून राजकारण करणाऱ्या विरोधकांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरपूस समाचार घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकारण करणे थांबवा आणि खरोखरच विद्यार्थ्यांचा कळवळा असेल, संविधानावर विश्वास असेल, तर पळपुटेपणा सोडून संसदेत या विषयावर चर्चा करण्याची हिंमत दाखवा, असे थेट आणि खुले आव्हान फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि संपूर्ण विरोधी पक्षाला दिले आहे. लोकशाहीत चर्चा आणि निर्णय घेण्याची सर्वोच्च जागा ही संसद आहे, रस्त्यावर गोंधळ घालून प्रश्न सुटत नाहीत, असे त्यांनी सुनावले. ■




देशभरात शुक्रवारी आयोजित केलेल्या बंदच्या पृष्ठभूमीवर नवी दिल्लीतील जंतर मंतर परिसरात शीघ्र कृती दल तैनात करण्यात आले

# कॉक्रोच पार्टीचे आज देशव्यापी आंदोलन



**नवी दिल्ली, २३ जुलै**
नीट पेपरफुटीवरुन कॉक्रोच पार्टीकडून राजधानी नवी दिल्लीत जंतर मंतरवर सुरु आहे. आंदोलक केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम आहे. दरम्यान, २० जुलैला या आंदोलनाला हिंसक वळण लागले. आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला होता. त्या विरोधात कॉक्रोच पार्टीने २४ जुलैला देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन शांततापूर्ण मार्गानेच करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

कॉक्रोच पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शुक्रवारी देशभरात होणारे आंदोलन प्रत्येक जिल्ह्यात व्हावे, संपूर्ण देशभरात एकाच वेळी आंदोलन करण्यात यावे. या आंदोलनात विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.या आंदोलनासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घ्याव्यात, आंदोलनस्थळी इन्कलाब जिंदाबाद आणि भारत माता की जय अशा घोषणा द्याव्यात, असेही सांगण्यात आले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### महत्त्वाचे

## सलग चौथ्या दिवशी बाजारात घसरण

**मुंबई :** मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत. याचा थेट फटका भारतीय शेअर बाजाराला बसला असून, गुरुवारी सलग चौथ्या सत्रात निर्देशांकांमध्ये घसरण नोंदवली गेली. या तणावामुळे गुंतवणूकदारांमधील चिंतेचे वातावरण अधिक गडद झाले आहे. जागतिक बाजारातून मिळालेल्या संमिश्र संकेतांच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजाराची सुरुवात घसरणीने झाली. पहिल्या सत्रात बाजाराने सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र दुसऱ्या सत्रात विक्रीचा दबाव अचानक वाढला. बिकट परिस्थितीमुळे निफ्टीने इंट्राडेमध्ये २३,८०७.२० ची खालील पातळी गाठली. ऑटो आणि मीडिया क्षेत्र वगळता बहुतांश सर्वच क्षेत्रांमध्ये मोठी घसरण झाली. ■

# इथेनॉल-मिश्रित पेट्रोल सुरक्षित, कार्यक्षम

## केंद्र सरकारने अधोरेखित केले राष्ट्रीय लाभ



**नवी दिल्ली, २३ जुलै**
पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त वाढवण्याबाबत केंद्र सरकारने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. भविष्यात इथेनॉल अधिक प्रमाणात मिसळण्याबाबत कोणताही निर्णय हा सविस्तर वैज्ञानिक व तांत्रिक अभ्यास करून आणि वाहन उत्पादक, तेल विपणन कंपन्या व संशोधन संस्था यांसारख्या सर्व संबंधित घटकांशी सल्लामसलत केल्यानंतरच घेतला जाईल. इथेनॉल मिश्रित पेट्रोल सुरक्षित आणि कार्यक्षम असल्याचे स्पष्ट करीत केंद्र सरकारने त्याचे राष्ट्रीय लाभ अधोरेखीत केले.

मात्र , ई-८५ इंधन (ज्यामध्ये ८५ टक्के इथेनॉल आणि १५ टक्के पेट्रोल असते) हे केवळ अशा 'फ्लेक्स फ्युएल वाहनां'साठी आणले, जी अशा प्रकारच्या इंधनासाठी खास डिझाईन आणि प्रमाणित केली आहेत. याचा अर्थ देशभरात पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाच्या मूळ पातळीत वाढ झाली आहे, असा होत नसल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी गुरुवारी लोकसभेत एका लेखी उत्तराद्वारे दिली. इथेनॉल हे काही नवीन इंधन नाही. जगभरात एक शतकाहून अधिक काळापासून याचा वापर केला जात आहे. भारतात, 'इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रम' टप्प्याटप्प्याने, वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित आणि सर्व संबंधित घटकांशी सल्लामसलत करून लागू केला आहे. या प्रक्रियेत नीती आयोग, वाहन उत्पादक कंपन्या, तेल विपणन कंपन्या, ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम आणि इतर तांत्रिक संस्थांचा सहभाग आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### १.९७ लाख कोटींची बचत

ई-२० कडे झालेल्या स्थित्यंतरामुळे लक्षणीय राष्ट्रीय लाभ झाले आहेत. इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रमामुळे १.९७ लाख कोटी रुपयांची परकीय गंगाजळी वाचली आहे, सुमारे ३१६ लाख टन कच्च्या तेलाच्या वापराला पर्याय मिळाला, ९५२ लाख टन कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. ■

# बाजीराव विहीर येथे पार पडले उभे आणि गोल रिंगण



### पालखी सोहळा वाखरी मुक्कामी विसावला

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील सोलापूर जिल्ह्यातील दुसरे उभे रिंगण, तर चौथे गोल रिंगण बाजीराव विहीर येथे पार पडले. पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर असलेल्या वाखरी पालखी तळ येथे विसावला. शुक्रवार, दि.२४ वाखरी येथून दुपारी पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. वारकरी भाविकांसाठी वाखरी पालखी तळावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सुलभ शौचालय, आरोग्य सुविधा, आपत्कालीन कक्ष, स्नानगृह, मसाज सुविधा, हिरकणी कक्ष, जर्मन हँगर, मुख्यमंत्री आरोग्य रथ, मोबाईल चार्जिंग सुविधा, सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ जुलै-**
श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील रिंगण बाजीराव विहीर (ता. पंढरपूर) येथे लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडले. माउलींच्या पालखी सोहळ्यातील चौथे आणि शेवटचे गोल रिंगण आणि उभे रिंगण बाजीराव विहिरीजवळ उत्साहात पार पडले.रिंगण सोहळ्याने भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. रिंगण पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकरी आनंदाने विठुनामाच्या जयघोषात तल्लीन झाले होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यातील विविध भागांतून निघालेल्या संतांच्या पालख्या गुरुवारी वाखरीत दाखल झाल्या. दरम्यान, दुपारी भंडीशेगाव येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने निघाला होता. संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा उभ्या रिंगणासाठी बाजीराव विहिरीसमोर आला. उड्डाणपुलाच्या शेजारील सर्व्हिस रस्त्यालगत लागलेले रिंगण पाहण्यासाठी वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

दुपारी साडेतीन वाजता उभे रिंगण पूर्ण झाले. त्यानंतर माऊलीचा सोहळा गोल रिंगणासाठी शेजारील मोकळ्या रानात दाखल झाला. पालखी सोहळ्यातील शेवटचे गोल रिंगण पाहण्यासाठी वाखरीच्या पालखी तळावर दाखल झालेल्या विविध संतांच्या दिंडी सोहळ्यातील हजारो वारकरी बाजीराव विहीर परिसरात दाखल झाले होते. सायंकाळी ५.३० वाजता माऊलींचा सोहळा रिंगणस्थळी आला.

सेवेकऱ्यांनी टाळ-मृदंगांच्या तालावर खांद्यावरून पालखी नाचवत रिंगण पाहण्यासाठी थांबलेल्या वारकऱ्यांच्या भोवतीने रिंगण घातले.मनाच्या दिंड्यांनी झेंडा घेऊन रिंगणात प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर अश्वस्वार रिंगणाला सुरुवात झाली. यावेळी उपस्थित वारकऱ्यांनी माऊली... माऊलीचा गजर केला.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दादर-पंढरपूर-दादर रेल्वे सुरु करुन चंद्रभागा एक्सप्रेस नाव द्या

## पंढरपूर-देहू मेमू रेल्वे सेवा सुरू करा; धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जुलै-**

आषाढी वारी, कार्तिकी वारी तसेच वर्षभर पंढरपूरला येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांच्या प्रवासाची गैरसोय दूर करण्यासाठी दादर-पंढरपूर-दादर दैनिक रेल्वे सेवा सुरू करून तिला 'चंद्रभागा एक्सप्रेस' असे नाव द्यावे, तसेच पंढरपूर-देहू मेमू रेल्वे सेवा सुरू करावी, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली.

या मागणीला अधिक बळ देण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्रातील सर्वपक्षीय ४२ खासदारांच्या सह्या घेऊन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन सादर केले.

तसेच सोलापूर जिल्ह्याच्या वाहतूक, व्यापार, शेती आणि दळणवळणाच्या विकासाला गती देण्यासाठी विविध प्रलंबित रेल्वे प्रश्नांबाबत चर्चा केली.

यात प्रामुख्याने पंढरपूर-लोणंद रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षण व भूमी अधिग्रहणाबाबत वरिष्ठ स्तरावर तातडीची बैठक आयोजित करून प्रकल्पाला गती देण्याची मागणी करण्यात आली. माढा तालुक्यातील मोडनिंब येथे 'गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल' उभारणीचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली आणि सध्या बंद असलेली दिल्ली-कोलकत्ता-मुजफ्फरनगर-शालिमार 'किसान रेल्वे' सेवा पुन्हा सुरू करण्याची विनंती करण्यात आली. तसेच लातूर-कुर्डूवाडी-सोलापूर आणि मिरज-कुर्डूवाडी-दौंड कॉर्ड लाईन प्रकल्पांना गती देण्याची मागणी करण्यात आली. मिरज-कुर्डूवाडी-लातूर रोड या सुमारे ३७५ कि.मी. लांबीच्या रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण पूर्ण करून प्रकल्पाला वेग देण्याचीही मागणी करण्यात आली.

सोलापूर रेल्वे विभागातील वाढती लोकसंख्या आणि पंढरपूरकडे येणाऱ्या लाखो वारकऱ्यांचा विचार करून सांगोला तालुक्यातील जवळा व बामणी, पंढरपूर तालुक्यातील बाभुळगाव तसेच माढा तालुक्यातील म्हैसगाव व लऊळ येथे नवीन रेल्वे स्थानके मंजूर करण्याची मागणीही खासदार मोहिते-पाटील यांनी केली. याशिवाय कुर्डूवाडी-पंढरपूर मार्गावरील वापरात नसलेल्या जुन्या मीटरगेज रेल्वे मार्गालगतची रिक्त जमीन विकासासाठी वापरून तेथे व्यापारी संकुले उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्र्यांसमोर मांडण्यात आला. या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना दिले.

## महत्वाचे...



### जिल्हा परिषद अंत्रोळी शाळेत माता पालक सहविचार सभा

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळी येथे इयत्ता पहिली ते सातवी मधील सर्व माता पालकांच्या सहविचार सभा पार पडली. प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे, यांनी उपस्थित माता पालकांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नागनाथ म्हमाने यांनी केले. सूत्रसंचालन श्रीरंग बनसोडे यांनी केले. कीर्ती जाधव यांनी आभार मानले.



### पालिकेच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

माजी उपमुख्यमंत्री कै.अजितदादा अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक वैभव हत्तूरे,अतिरिक्त आयुक्त विणा पवार, इरफान शेख, महेश देवकर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, अल्ताफ कुरेशी, चंद्रकांत दोतुल, शेखर सकट उपस्थित होते.



### सांगोला महाविद्यालयात बापूसाहेब झपके यांना अभिवादन

**सांगोला, दि. २३ जुलै-**

कर्मवीर गुरुवर्य कै.बापूसाहेब झपके यांच्या १०४ व्या जयंती निमित्त सांगोला महाविद्यालयात प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मनोगतात डॉ.सुरेश भोसले यांनी सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाच्या स्थापनेतील बापूसाहेब झपके यांचे योगदान अधोरेखित केले. तसेच संगणक विभागातील प्रा.गणेश पैलवान यांनी भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यातील बापूसाहेब झपके यांचे योगदान याबद्दल माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्र.कार्यालयीन अधीक्षक विलास माने यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती, पुण्यतिथी उपक्रम आयोजन समितीचे प्रमुख डॉ. जमीर तांबोळी, प्रशासकीय कर्मचारी बाबासो इंगोले, शंकर माने यांनी परिश्रम घेतले.



### आदर्श विद्यालयात अजितदादा पवार यांची जयंती साजरी

**सांगोला, दि.२३ जुलै-**

वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय, सांगोला येथे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण मुख्याध्यापक विठ्ठलपंत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मनोगतात संस्था सचिव निलकंठ शिंदे यांनी अजितदादा यांच्या कार्याची पद्धत, वक्तशीरपणा व परखड व्यक्तिमत्त्वाचे पैलू विद्यार्थ्यांना सांगितले. सूत्रसंचालन शिक्षक सुयोग बनसोडे यांनी केले.



### अजितदादा पवार यांना बी. टी. माने संकुलाच्या वतीने अभिवादन

**अक्कलकोट, दि. २३ जुलै-**

फत्तेसिंह शिक्षण संस्था संचलित माजी आमदार स्व. बी. टी. माने शॉपिंग सेंटर येथील व्यापारी मित्रपरिवाराच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवनिंगप्पा संगापुरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सोलापूर जिल्हा सरचिटणीस प्रा. प्रकाश सुरवसे यांनी अजित पवारांच्या जीवनकार्याची माहिती देत अजितदादा पवार यांनी राज्याच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांना अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष माणिकराव बिराजदार, प्रवीणकुमार मगदूम, महेश लोकांपुरे, श्रीनिवास दळवी, स्वामीनाथ पारखे, श्रीकांत जाधव, रोहित कोळी, कदम डेरीवाले, सोनू शिंदे, भास्कर सुरवसे, अनिस शेख उपस्थित होते.

# अभिनेत्री हेमा मालिनी यांच्या भेटीतून इस्कॉनला मेकॅनिकल हत्ती

## नगराध्यक्षा भालके यांच्या हस्ते उद्घाटन



**तसा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. २३ जुलै-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील इस्कॉन मंदिराच्या वैभवात आणखी भर पडली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी यांनी इस्कॉन मंदिराला आकर्षक मेकॅनिकल हत्ती भेट दिला असून त्याचे उद्घाटन पंढरपूरच्या नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके व लोकनाथ स्वामी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

मेकॅनिकल हत्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी उत्सुकता दर्शविली. पारंपरिक हत्तीच्या स्वरूपात तयार करण्यात आलेला हा मेकॅनिकल हत्ती वास्तवदर्शी हालचाली करतो. त्यामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी तो विशेष आकर्षण ठरणार आहे. इस्कॉनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की अभिनेत्री हेमा मालिनी यांनी भक्तिभावातून ही भेट दिली असून यामुळे मंदिराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर पडणार आहे. देश-विदेशातून पंढरपूरला येणाऱ्या भाविकांसाठी हा मेकॅनिकल हत्ती आकर्षणाचे केंद्र ठरेल असा विश्वास लोकनाथ स्वामी महाराज व्यक्त करण्यात आला आहे.



### बाल बुध्दिबळ स्पर्धेत अनिता कोळी, विशाल शिरुर प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या ६४व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत मुलींमध्ये इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी अनिता शिवानंद कोळी व मुलांमध्ये इयत्ता सातवीतील विशाल सुधाकर शिरूर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक वृंद यामध्ये स्वतः सक्रियपणे सहभागी झाले होते. शिक्षकांनी स्वतः बुद्धिबळाच्या पटावर उतरून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमाचे केंद्रशाळा स्तरावर आणि सोलापूर जिल्हा शैक्षणिक वतुर्ळातून प्रचंड कौतुक होत आहे. वर्धापन दिनाचा हा रचनात्मक आणि विद्यार्थ्यांच्या हिताचा उपक्रम इतर शाळांसाठीही मार्गदर्शक ठरेल, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या. स्पर्धेतील यशस्वी बाल खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# मार्जिन न मिळाल्यास आज काळी फित लावून धान्य वाटप

## सोलापूर ग्रामीण रास्त भाव धान्य दुकानदार महासंघाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जुलै-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांना फेब्रुवारी २०२६ पासून शासनाकडून देय असलेले मार्जिन अद्यापही मिळाले नसल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत मुख्यमंत्री यांना निवेदन देत, येत्या चार ते पाच दिवसांत किमान दोन महिन्यांचे मार्जिन संबंधित दुकानदारांच्या खात्यावर जमा न झाल्यास २४ जुलै २०२६ रोजी सर्व धान्य दुकानदार काळी फित बांधून शासनाच्या विरोधात निषेध आंदोलन करत धान्य वाटप करतील, असा इशारा सोलापूर ग्रामीण रास्त भाव धान्य दुकानदार संघटना महासंघाने दिला आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२६ पासूनचे मार्जिन प्रलंबित असून याबाबत जिल्हा पुरवठा कार्यालय तसेच विभागीय कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र, 'दोन दिवसांत मिळेल', 'चार दिवसांत मिळेल' अशी आश्वासने मिळाली; प्रत्यक्षात आजपर्यंत कोणतीही रक्कम जमा झालेली नाही.

मार्जिन न मिळाल्यामुळे धान्य दुकानदारांपुढे कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, दुकानाचे भाडे, वीजबिल आणि कर्मचाऱ्यांचे पगार देण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अनेक दुकानदार आर्थिक संकटात सापडल्याचे संघटनेने म्हटले आहे. विशेष म्हणजे, राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांतील दुकानदारांच्या खात्यावर मागील काही दिवसांत मार्जिन जमा झाले असताना सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील दुकानदारांना मात्र एक रुपयाही मिळालेला नाही, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.



### बार्शी वकील संघातर्फे आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार

**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

बार्शी वकील संघाच्यावतीने सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवड झाल्याबद्दल आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात बार असोसिएशन हॉल येथे संपन्न झाला. यावेळी बार्शी वकील संघाच्यावतीने आ. राजेंद्र राऊत यांना भारतीय संविधानाची प्रत भेट स्वरूपात प्रदान करण्यात आली. संविधानातील लोकशाही मूल्ये, न्याय, समता आणि बंधुता या तत्त्वांप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा हा सन्मान विशेष लक्षवेधी ठरला. उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. राजेंद्र राऊत यांनी आपल्या मनोगतात बार्शीच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच न्यायव्यवस्था, वकिली व्यवसाय आणि जनसामान्यांच्या हितासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाही दिली. बार्शी वकील संघाने व्यक्त केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमास बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड, उपाध्यक्ष ॲड. अक्षय पाटील, सचिव ॲड. प्रकाश साखरे, खजिनदार ॲड. सुरज राऊत, लायब्ररी चेअरमन ॲड. अमोल अलाट उपस्थित होते.

# उजनी धरणातून बार्शी उपसा सिंचनच्या उजव्या कालव्यात पाणी आले

## आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नाला यश



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून व आमदार राजाभाऊ राऊत यांनी शासनदरबारी सतत पाठपुरावा करुन बार्शी तालुक्यासाठी महत्त्वाकांक्षी असणाऱ्या बार्शी उपसा सिंचनला उजनी धरणातून उजवा कालवामधून पाणी सोडण्यात आले आहे.

शासन दरबारी आमदार राजाभाऊ राऊत यांची जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली होती. जलसंपदा विभागाच्यावतीने बार्शी उपसासिंचनसाठी या पाण्याच्या विसर्ग सुरु करण्यात आला आहे. या माध्यमातून बार्शी शहरातील राऊत तलाव व गणेश तलाव पूर्ण भरुन घेण्यात येणार आहेत. यामुळे बार्शी शहरातील विहीर, कूपनलिका, बोअर यांची पाणी पातळी देखील वाढणार आहे. धसपिंपळगाव रोड बार्शी बायपास येथे बार्शी उपसा सिंचन कालवा आउटलेट येथे पाणी आले असता पाण्याचे पूजन आमदार राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, दिपक रोंगे, पाणी पुरवठा सभापती भैय्या बारंगुळे, दादासाहेब गायकवाड, पृथ्वीराज राजपूत, प्रकाश माने, अमोल सुरवसे, मल्लिनाथ गाढवे उपस्थित होते.

### नवले सिंहगड महाविद्यालयात सोमवारपासून आंतरराष्ट्रीय परिषद

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे २७ व २८ जुलै २०२६ रोजी International Conference on AI-Driven Materials, Energy and Smart Technologies (AIMEST२०२६) या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ शंकर नवले यांनी सांगितले.या परिषदेच्या अध्यक्षस्थानी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर तथा संस्थेचे सचिव संजय नवले हे राहणार असून, माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस. एच. पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. अजय कुमार द्विवेदी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना संबोधित करणार आहेत. परिषदेत सादर होणाऱ्या उत्कृष्ट संशोधन निबंधांना Best Paer Award प्रदान करण्यात येणार असून, सर्व सहभागी संशोधकांना प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य समन्वयक डॉ. एस. एस. शिरगण हे असून, परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

### कला शिरोमणी पुरस्काराने बाळासाहेब नरारे सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२३ जुलै-**

श्री श्री राजाहुआ सत्र यांच्या वतीने गुवाहाटी येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय दहाव्या आंतरराष्ट्रीय संगम महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात संगीत व योग क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे बाळासाहेब नरारे यांना त्यांच्या दीर्घकालीन कार्याची दखल घेत कला शिरोमणी' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री. बाळासाहेब नरारे यांनी गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून संगीत क्षेत्रात अविरतपणे कार्य केले असून, हा मानाचा पुरस्कार गुवाहाटी मध्य मतदारसंघाचे आमदार विजय गुप्ता यांच्या हस्ते नरारे यांना प्रदान करण्यात आला. या महोत्सवात भव्य सांस्कृतिक दिंडीचेही आयोजन करण्यात आले होते. या दिंडीचे नेतृत्व प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केले. या पुरस्कार सोहळ्यास भाजप नेते प्रभात हजारिका, प्रेसिडेंट सनातन बाप, व्हाईस प्रेसिडेंट विश्वज्योती डे, ॲडव्हायझर पंकज देवरा, प्राचार्य मिलिंद फंड, आदर्श व्यापारी संतोष शियाळ, नवनाथ थोरात, महोत्सवाचे सर्वेसर्वा हलीराम बोरा, मंजूमनी बोरा यांच्यासह संगीत क्षेत्रातील मान्यवर, संगीत रसिक, देश विदेशातील कलाकार आणि विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेले स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वारकऱ्यांसाठी नांदेड, नगरसोल येथून सहा अतिरिक्त विशेष रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

पंढरपूर येथे आषाढी वारीला उपस्थित राहणाऱ्या यात्रेकरूंना सोयीस्कर प्रवास करण्यासाठी भारतीय रेल्वेने आधीच आषाढी विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. नांदेड आणि नगरसोल येथून पंढरपूरसाठी ६ जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.

गाडी क्रमांक ०७६४५ स्पेशल नांदेडहून २६ जुलै आणि २ ऑगस्ट रोजी २०:०० वाजता निघेल आणि पंढरपूरला दुसऱ्या दिवशी ७ वाजता पोहोचेल. या गाडीच्या दोन फेऱ्या होतील. गाडी क्रमांक ०७६४६ विशेष पंढरपूर येथून २७ जुलै आणि ०३ ऑगस्ट रोजी सकाळी ८:०० वाजता निघेल आणि नांदेडला दुसऱ्या दिवशी २०:३० वाजता पोहोचेल. या गाडीच्या दोन फेऱ्या होतील. पूर्णा, परभणी, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बारसी टाऊन, कुर्डुवाडी आणि मोडलिंब असे थांबे असतील तर ३ एसी २ टियर, ५ एसी ३ टियर, १० स्लीपर क्लास, २ लगेज कम गार्डच्या ब्रेक व्हॅनसह ६ सामान्य द्वितीय श्रेणी असे २४ डब्यांची रचना असेल.

ट्रेन क्रमांक ०७६३७ स्पेशल २३ जुलै रोजी नगरसोल येथून २३:०० वाजता निघेल आणि पंढरपूरला दुसऱ्या दिवशी १९:०० वाजता पोहोचेल. या गाडीची एक फेरी होईल. गाडी क्रमांक ०७६३८ विशेष ही गाडी २४ जुलै रोजी २०:०० वाजता पंढरपूर येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ११:३५ वाजता नगरसोल येथे पोहोचेल. या गाडीची एक फेरी होईल. रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन आणि कुर्डुवाडी असे थांबे असतील तर ४ एसी-३ टियर, १४ स्लीपर क्लास, ६ जनरल सेकंड क्लास (ज्यामध्ये २ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनचा समावेश आहे) अशी २४ डब्यांची रचना असेल.

# दहशतवादाचे समर्थन थांबविल्यानंतर मिळेल पाणी

## संयुक्त राष्ट्रसंघात भारताचा पाकिस्तानवर घणाघात




**न्यू यॉर्क, २३ जुलै**

सीमापार दहशतवादाचा वापर सरकारी धोरणाचे साधन म्हणून केला जात असताना सिंधू जलकराराच्या अंतर्गत सहकार्याची अपेक्षा करता येणार नाही, असे स्पष्ट करीत भारताने संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानी वक्तव्याचा समाचार घेत या देशावर घणाघात केला.

जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील, याचा ठाम पुनरुच्चार भारताने केला. 'नैसर्गिक संसाधनांचे प्रशासनः शांतता, सुरक्षा आणि समृद्धीचा पाया' या विषयावर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत झालेल्या उच्चस्तरीय खुल्या चर्चेदरम्यान, संयुक्त राष्ट्रसंघातील भारताचे कायम प्रतिनिधी पर्वथनेनी हरीश यांनी बुधवारी ही टिप्पणी केली. इस्लामाबादने एका खोटे विमर्श तयार करण्यासाठी चर्चेचा गैरवापर केल्यामुळे भारताला उत्तर देणे भाग पडले, असे पर्वथनेनी यांनी पाकिस्तानला प्रत्युत्तर देताना सांगितले.

सिंधू जल कराराबाबतची आमची भूमिका स्पष्ट आणि सुसंगत राहिली आहे. सीमापार दहशतवादाचा वापर नियमितपणे राज्याच्या धोरणाचे एक साधन म्हणून केला जात असताना परस्पर विश्वास आणि सदिच्छेवर आधारित सहकार्याची अपेक्षा करता येत नाही, असे पर्वथनेनी म्हणाले. संयुक्त राष्ट्रांमधील पाकिस्तानचे कायम प्रतिनिधी आसिम इफ्तिखार अहमद यांनी, सिंधू जल कराराला स्थगिती देऊन भारताने पाण्याचा शस्त्र म्हणून वापर केल्याचा आरोप केला तसेच ही कृती बेकायदेशीर असल्याचे आणि त्यामुळे २४ कोटींपेक्षा जास्त पाकिस्तान्यांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाल्याचे म्हटले होते. या आरोपांना भारताने चोख प्रत्युत्तर दिले.

जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाबाबत सांगायचे तर, तो भारताचा नेहमीच अविभाज्य आणि अतूट भाग राहिला आहे, आहे आणि यापुढेही राहील. ही अशी घटनात्मक आणि कायदेशीर वस्तुस्थिती आहे, ज्याकडे पाकिस्तान जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो, असे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील खुल्या चर्चेदरम्यान भारताचा प्रत्युत्तर देण्याचा अधिकार बजावताना पर्वथनेनी यांनी सांगितले.

जम्मू-काश्मीरबाबतचा एकमेव प्रलंबित मुद्दा म्हणजे पाकिस्तानने भारताच्या सार्वभौम भूभागावर केलेली उघड आक्रमकता आणि केलेला बेकायदेशीर ताबा हा आहे. भारतावर दोषारोप करण्याऐवजी, पाकिस्तानने स्वतःच्या कारभारात सुधारणा केल्यास ते त्यांच्यासाठी आणि त्यांच्या जनतेसाठी अधिक हिताचे ठरेल, असे त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

### नैसर्गिक संसाधने विकासाचे साधन असावीत

नैसर्गिक संसाधनांचे बेकायदेशीर शोषण आणि त्यांची तस्करी काही विशिष्ट परिस्थितींमध्ये सशस्त्र गटांना वित्तपुरवठा करण्यास आणि संघर्ष दीर्घकाळ चालण्यास कारणीभूत ठरू शकते, असे पर्वथनेनी यांनी सांगितले. नैसर्गिक संसाधने ही प्रामुख्याने सार्वभौम राष्ट्रांच्या विकासाचे आणि समृद्धीचे साधन असायला हवीत, यावर त्यांनी भर दिला.

## बनारस-मुंबई रेल्वेला घातपात घडवण्याचा प्रयत्न



**प्रयागराज, २३ जुलै**

बनारस-मुंबई एलटीटी एक्स्प्रेसला अपघात घडवण्याचा प्रयत्न अपयशी ठरला आहे. उत्तरप्रदेशातील इरादतगंज आणि लिंक स्टेशन दरम्यानच्या रेल्वे मार्गावर लोखंडी पाईप दिसल्यामुळे लोको पायलटला आपत्कालीन ब्रेक लावावे लागले आणि यामुळे एक मोठा अपघात टळला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली.

वाराणसीहून मुंबईकडे जाणारी ट्रेन मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास, रुळावर अडथळा दिसून आल्यानंतर थांबवण्यात आली. लोको पायलटनी त्वरित रेल्वे अधिकाऱ्यांना याची सूचना दिली. पाईप रुळांवर फेकला गेल्याचे दिसून आले. तो पोकळ आणि गंजलेला होता, असे उत्तर मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शिवम शर्मा यांनी सांगितले. रेल्वे सुरक्षा दलाने अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या घटनेचा तपास सुरू केला आहे. रुळावरून पाईप हटवण्यात आला आणि त्यानंतर काही मिनिटांतच ट्रेनने मुंबईच्या दिशेने आपला प्रवास पुन्हा सुरू केला. (वृत्तसंस्था)

# आंदोलकांच्या हल्ल्यात अनेक पोलिस जखमी

## गुरुवारी पहाटेपर्यंत दिल्लीच्या रस्त्यांवर हिंसाचार, गोंधळ



पोलिसांसोबत झटापट करताना आंदोलक आणि जंतर मंतरजवळ आंदोलकांच्या हल्ल्यात जखमी झालेले पोलिस निरीक्षक

**नवी दिल्ली, २३ जुलै**

कर्तव्यावर जात असताना जंतर मंतरजवळ आंदोलकांच्या एका गटाने केलेल्या हल्ल्यात एक पोलिस निरीक्षक जखमी झाले आहेत. बुधवारी रात्री त्यांनी आपले वाहन हनुमान मंदिराजवळ पार्क केले होते. त्यानंतर ते जंतर मंतरकडे आपल्या कर्तव्यावर पायी असताना हा हल्ला करण्यात आला, अशी माहिती स्वतः पोलिस अधिकारी नंद किशोर सिंग यांनी गुरुवारी दिली. बुधवारी दिवसा आणि गुरुवारी पहाटे एकवाजेपर्यंत दिल्लीच्या रस्त्यांवर आंदोलकांचा गोंधळ सुरू होता.

पोलिसांनुसार, जंतर मंतरवर जात असताना पोलिस निरीक्षकाला पार्लमेंट स्ट्रीट जंक्शनजवळ एक मोठी गर्दी दिसली. तिथे सुमारे ४,००० ते ५,००० लोक जमले होते. ते पोलिस आणि सरकारविरोधी घोषणा देत होते. त्यावेळी मी कर्तव्य बजावण्यासाठी त्या भागातून जाण्याचा प्रयत्न करत असताना सुमारे १०० ते १५० लोकांनी त्यांना घेरले व माझ्यावर हल्ला केला, असेही सिंग यांनी सांगितले. जंतरमंतर आणि आसपासच्या परिसरात असलेले पोलिस बूथ आणि बॅरिकेड्सवर आंदोलकांनी ताबा मिळविला होता. पोलिसांच्या वाहनांची तोडफोड करीत पोलिस कर्मचाऱ्यांवर दगडफेक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### लाठ्या, काठ्या, दगडांनी केली मारहाण

सिंग पुढे म्हणाले, त्यांनी मला लाठ्या, काठ्या, दगड आणि त्यांच्या हातात असलेल्या सर्व धारदार वस्तूंनी मारहाण केली. मी जखमी झालो आणि कसाबसा तिथून निसटण्यात यशस्वी झालो. जेव्हा त्यांनी माझ्यावर हल्ला केला, तेव्हा मी गणवेशात होतो. जंतर मंतर परिसरात विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान ही घटना घडली. तिथे आंदोलक आणि पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये संघर्ष झाला. या हिंसाचारात अनेक कर्मचारी जखमी झाल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. (वृत्तसंस्था)

# ताहीरच्या शिक्षेची सुनावणी पुढे ढकलली



**नवी दिल्ली, २३ जुलै**

इंटेलिजन्स ब्युरोचे अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आलेला आपचा माजी नगरसेवक ताहीर हुसैन आणि इतर चौघांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेच्या प्रमाणाबाबतची सुनावणी बचाव पक्षाने वेळ मागितल्याने येथील न्यायालयाने २७ एप्रिलपर्यंत पुढे ढकलली. अतिरिक्त वेळेसाठी वारंवार विनंती केल्यानंतर, अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीण सिंह यांनी कामकाज तहकूब केले. शिक्षा जाहीर करण्याबाबत दोषी व्यक्तीला दीर्घकाळ आहेत, असे न्यायाधीश म्हणाले.

हुसेन यांच्या वतीने बाजू मांडताना वकील राजीव मोहन आणि तारा नरुला यांनी आपले म्हणणे मांडण्याची तयारी करण्यासाठी वेळ मागितला. ही कायदेशीर प्रक्रिया आता शिक्षा सुनावण्याच्या टप्प्यावर पोहोचली आहे आणि या टप्प्यावर आरोपीसाठी त्याचे परिणाम अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत, असा युक्तिवाद त्यांनी केला. न्यायाधीशांनी सुरुवातीला ती विनंती फेटाळून लावली आणि संबंधित पक्षांना युक्तिवाद पुढे चालू ठेवण्यास सांगितले. मात्र, सरकारी पक्षाने आपली बाजू मांडण्यास सुरुवात करण्याच्या अगदी काही क्षण आधीच त्यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार केला. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ऑगस्टमध्ये सुरू होईल 'किंग'चे चित्रीकरण




**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानचा बहुचर्चित चित्रपट 'किंग' आता त्याच्या अंतिम चित्रीकरणाच्या टप्प्यात पोहोचला आहे. चित्रपटाचे शेवटचे आंतरराष्ट्रीय शेड्यूल ऑगस्टमध्ये अमेरिकेत चित्रीत केले जाईल. यासाठी निर्माते अनेक ठिकाणांवर तयारी करत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद करत आहेत. आता शूटिंग अंतिम टप्प्यात आहे आणि ऑगस्टमध्ये प्रस्तावित अमेरिका शेड्यूल पूर्ण होताच चित्रपटाचे मुख्य चित्रीकरण संपेल. यापूर्वी चित्रपटाचे एक महत्त्वाचे शेड्यूल जॉर्जियामध्ये पूर्ण करण्यात आले होते. चित्रपटाचे बहुतेक चित्रीकरण पूर्ण झाले आहे आणि आता केवळ क्लायमॅक्सचा मोठा ॲक्शन सीक्वेंस चित्रित करणे बाकी आहे. या चित्रपटात शाहरुखसोबत त्याची मुलगी सुहाना खान मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

### 'द ओडिसी' ने सहा दिवसांत कमावले ८० कोटी



**मुंबई :** हॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलन यांचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'द ओडिसी' ला भारतात जबरदस्त प्रतिसाद लाभला आहे. या चित्रपटाची प्रदर्शनाच्या सहाव्या दिवशीच भारतातील कमाई ८०.६५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. 'द ओडिसी'ने भारतात आयमॅक्स प्रदर्शनाच्या बाबतीतही मोठी कामगिरी केली आहे. चित्रपटाने भारतातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या 'आयमॅक्स ओपनर्स'पैकी एक म्हणून नोंद केली असून, त्याने 'मिशनः इम्पॉसिबल - द फायनल रेकनिंग'ला मागे टाकले आहे. जगभरात नोलनचा एक प्रेक्षकवर्ग तयार झाला आहे. ग्रीक कवी होमर याच्या 'द ओडिसी' या महाकाव्यावर आधारीत हा चित्रपट असून ट्रॉयच्या युद्धानंतर ओडिसियसचा पुन्हा घरी परतण्याचा प्रवास यात दाखवला आहे. चित्रपटात मॅट डेमन मुख्य भूमिकेत असून त्याच्या अदाकारीचे कौतूक होत आहे. चित्रपटात टॉम हालँड, ॲने हाथवे, झेंडाया, रॉबर्ट पॅटिन्सन, चार्लिज थेरॉन अशी मोठी स्टारकास्ट आहे.

### 'बटाट्याची चाळ' नव्या संगीतिकेच्या रूपात




**मुंबई :** मराठी साहित्यविश्वातील पु. ल. देशपांडे लिखित 'बटाट्याची चाळ' या अजरामर साहित्यकृतीतील 'एक संगीतक' म्हणजेच संगीत नाट्य स्वरुपात ही संकल्पना नव्या रंगमंचीय रूपात येणार आहे. 'या इथे चाळ बटाट्याची' या दोन अंकी आणि २१ कलाकारांसह गद्य संवाद विरहित मराठी संगीतिका सादर होणार आहे. कार्यक्रमाची निर्मिती कपीश जोशी यांची असून दिग्दर्शन देवेंद्र भोमे, योगेश सप्रे यांचे आहे. संगीत दिग्दर्शन देवेंद्र भोमे यांचे आहे, तर नाट्यरूपांतर योगेश सप्रे यांचे आहे. पंढरीनाथ कांबळे, अजित परब, मिलिंद जोशी, आशुतोष मुंगळे, अंजली मराठे, शमिका भिडे, स्वरांगी मराठे, केतन पवार, वज्रांग आफळे, मधुरा आफळे, तन्वी परांजपे, इशिता सावळे, साक्षी देशपांडे अशी दमदार कलाकारांची फळी या कार्यक्रमातून भेटीस येणार आहे. नेपथ्य संदेश बेंद्रे, प्रकाशयोजना सुजय भडकमकर, वेशभूषा गायत्री चक्रदेव, नृत्य रचना मधुरा आफळे, निर्मिती सूत्रधार नितीन नाईक, पराग पब्लिसिटी तर सूत्रधार मयूर वैद्य आहेत.

# मुख्य आरोपी संजीवला क्लीन चीट

## नीट-यूजी २०२४ पेपरफूट प्रकरण | सीबीआयने पुराव्याअभावी ठरविले निर्दोष



**पाटणा, २३ जुलै**

केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) नीट-यूजी २०२४ पेपरफुटी प्रकरणातील आरोपी संजीव कुमार उर्फ संजीव मुखियाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. एजन्सीने म्हटले आहे की, सखोल आणि संपूर्ण तपासणीदरम्यान नीटची प्रश्नपत्रिका फुटण्यात किंवा वितरित करण्यात सामील असलेल्या संजीव मुखियाच्या विरोधात कोणताही पुरावा आढळला नाही. त्यामुळे, या प्रकरणात कोणतेही आरोपपत्र दाखल करण्यात आले नाही.

२०२४ मध्ये बिहार पोलिसांनी नीट-यूजी २०२४ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची चोरी उघडकीस आणली आणि या संदर्भात गुन्हा दाखल केला. प्राथमिक तपासात संजीव मुखियावर संशय निर्माण झाला होता. कारण तो यापूर्वी अनेक परीक्षा प्रश्नपत्रिका चोरी आणि पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये सामील असल्याचे आढळले होते. या आधारावर, बिहार पोलिसांनी एफआयआरमध्ये त्याचे नाव आरोपी म्हणून नोंदवले. या प्रकरणाचा तपास नंतर सीबीआयकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान प्रश्नपत्रिकेची चोरी, वितरण आणि त्यातून नफा कमावण्यात सामील असलेल्या प्रत्येकाला ओळखण्यात आले. त्यानंतर, सीबीआयने पाटणा येथील सक्षम न्यायालयात एकूण ४५ आरोपींविरुद्ध अनेक आरोपपत्रे दाखल केली. प्रश्नपत्रिका चोरण्याच्या किंवा वितरित करण्याच्या कटात संजीव मुखिया सामील होता हे सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा आढळला नाही. (वृत्तसंस्था)

### सीबीआयने दिला जामीन

तपासादरम्यान संजीव मुखिया फरार होता. नंतर बिहार पोलिसांनी त्याला इतर प्रकरणांमध्ये अटक केली. नीट-यूजी २०२४ प्रकरणाशी संबंधित एफआयआरमध्येही त्याचे नाव होते. त्यामुळे सीबीआयने त्याला या प्रकरणात चौकशीसाठी पोलिस कोठडीत घेतले. मात्र, चौकशी आणि तपासानंतर त्याच्याविरुद्ध कोणताही पुरावा न आढळल्याने सीबीआयने या प्रकरणात त्याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले नाही. त्याला या प्रकरणात जामीन मंजूर करण्यात आला.

## दोन तस्करांना अटक; शस्त्रे जप्त

**चंदीगड, २३ जुलै**

सीमापार अवैध शस्त्र आणि अमली पदार्थांच्या तस्करीच्या टोळीचा पंजाब पोलिसांनी भंडाफोड केला. या प्रकरणात दोन तस्करांना अमृतसरमध्ये अटक करण्यात आली. आरोपींकडून सहा अत्याधुनिक पिस्तूल, १ किलो हेरॉईन, १ किलो अफू आणि १०,००० रुपये रोख रक्कमही जप्त करण्यात आली, अशी माहिती पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी गुरुवारी दिली. आरोपी एका परदेशी सूत्रधाराच्या थेट संपर्कात होते, जो गुन्हेगारी टोळ्यांना वितरणासाठी आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडे अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी सुलभ करत होता, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



हिमालयीन क्षेत्रात सुरू असलेल्या संततधारेमुळे गंगा-यमुनेसह उपनद्या दुथडी भरून वाहत आहेत. पाण्याची पातळी वाढल्याने शेकडो बोटींनी नांगर टाकल्याचे प्रयागराज येथील दृश्य

# रथयात्रेच्या विधींसाठी गुंडीचा मंदिरात प्रवेश बंदी

**पुरी, २३ जुलै**

भगवान जगन्नाथ आणि त्यांच्या बंधू-भगिनींच्या परतीच्या यात्रेच्या, म्हणजेच 'बाहुडा यात्रे'च्या तयारीचा भाग म्हणून, ओडिशाच्या पुरी येथील गुंडीचा मंदिरात गुरुवार संध्याकाळी ६ वाजल्यापासून सार्वजनिक प्रवेश बंद राहील.

बाहुडा यात्रेपूर्वी मंदिराचे शुद्धीकरण आणि इतर विधी सुलभ करण्यासाठी हे मंदिर बंद ठेवणे आवश्यक आहे. या कालावधीत, महत्त्वाचे धार्मिक विधी मंदिराच्या आवारातच पार पाडले जातील. हे विधी सुरळीतपणे पार पडावेत यासाठी भाविकांनी मंदिर प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली आहे, असे श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाने निवेदनात सांगितले.

विधी पार पाडण्यात सहकार्य आणि समन्वय साधल्याबद्दल मंदिर प्रशासनाने सेवकांचे आभारही मानले. रथयात्रेपासून ज्या 'अडपा मंडपा'त हे बंधू-भगिनी राहत आहेत, तेथे भाविकांसाठी देवतांचे 'दर्शन' घेण्याचा हा शेवटचा दिवस होता.

सकाळपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या, कारण देवतांच्या परतीच्या प्रवासाला निघण्यापूर्वी त्यांचा आशीर्वाद घेण्याची अंतिम संधी मानल्या जाणाऱ्या 'संध्या दर्शना'साठीही हा दिवस महत्त्वाचा आहे. (वृत्तसंस्था)

## सोनम रघुवंशीचा जामीन रद्द



**नवी दिल्ली, २३ जुलै**

मधुचंद्राला गेले असताना २०२५ मध्ये पतीची हत्या करणाऱ्या सोनम रघुवंशीला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दणका दिला असून, तिचा जामीन रद्दबातल केला आहे. सोनम रघुवंशीला दिलेल्या जामिनाला आव्हान देत मेघालय सरकारने दाखल केलेली याचिका न्यायालयाने मंजूर केली.

तीन आठवड्यांत पोलिसांना शरण जा, असा आदेश न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. प्रसन्न वराळे यांच्या न्यायासनाने सोनम रघुवंशीला दिला. खटला सहा महिन्यांत पुढे सरकला नाही आणि त्याचा निकाल न लागल्यास सोनम नवीन जामीन अर्ज दाखल करू शकते.

# चुंबकीय शक्तीमुळे रक्तवाहिन्यांची वाढ शक्य

## वैद्यकीय प्रत्यारोपणासाठी पर्यायी अवयव | उती तयार करण्याचा मार्ग मोकळा



**वॉशिंग्टन, २३ जुलै**

शास्त्रज्ञांनी चुंबकीय शक्तींचा वापर करून प्रयोगशाळेत तयार केलेल्या रक्तवाहिन्यांच्या वाढीला नियंत्रीत करण्याची पद्धत संशोधकांनी विकसित केली आहे. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील संशोधकांच्या नेतृत्वाखालील संघाने हे नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. वैद्यकीय प्रत्यारोपणासाठी आवश्यक पर्यायी अवयव आणि उती तयार करण्याचा मार्ग यामुळे मोकळा होऊ शकतो.

प्रयोगशाळेच्या वातावरणात केशवाहिन्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सूक्ष्म रक्तवाहिन्यांची पुनर्रचना करणे, हे जैववैद्यकीय अभियंत्यांसाठी मोठे आव्हान होते. केशिका सूक्ष्म असून त्यांचा व्यास ०.००५ मिलिमीटर इतका पातळ असतो, परंतु त्या सजीवांच्या पेशींना ऑक्सिजन आणि महत्त्वाची पोषक तत्वे पुरवण्यासाठी अत्यावश्यक असतात. रासायनिक वाढ घटक किंवा ३-डी प्रिंटिंगवर अवलंबून असलेल्या पूर्वीच्या पद्धतींमध्ये वास्तववादी, संघटित रक्तवाहिनी जाळे तयार करण्यात अचूकतेचा अभाव होता.

ही नवीन पद्धत, रक्तवाहिन्यांच्या अस्तराचे मूलभूत घटक असलेल्या 'एंडोथेलियल' पेशींनी भरलेल्या आणि 'कोलेजन जेल'मध्ये सोडलेल्या एका लहान चिपवर अवलंबून आहे. संशोधकांनी चिपच्या आत एक सूक्ष्म चुंबक ठेवले आणि बाह्य चुंबकीय क्षेत्रांचा वापर करून जेलला हळुवारपणे त्रिमितीय दिशेने ताणले. चुंबकीय ताणाची वारंवारता आणि तीव्रता समायोजित करून, वाढणाऱ्या केशवाहिन्यांची दिशा, लांबी आणि संख्या अचूकपणे निश्चित करता येते, असे संशोधकांना आढळले. निरोगी मानवी ऊती पूर्णपणे संघटित रक्तवाहिनी जाळ्यांवर अवलंबून असतात, असे संशोधक रितू रमण यांनी स्पष्ट केले. रक्तवाहिनीच्या पेशींना पुढे-मागे ताणल्याने नवीन केशवाहिन्यांच्या निर्मितीला लक्षणीय चालना मिळाली, ज्यामुळे भौतिक नियंत्रण प्राप्त झाले. हे केवळ रासायनिक संकेतांद्वारे कधीही साध्य होऊ शकले नसते, असे संशोधकांना आढळून आले. संघाने या प्रक्रियेमागील जैविक यंत्रणा देखील उघडकीस आणली. पेशींमधील दाब-संवेदनशील वाहिन्यांचे व्यवस्थापन करणारे पीईझेडओ-१ नावाचे जनुक यात महत्त्वाची भूमिका बजावते, असे प्रयोगांमधून दिसून आले. (वृत्तसंस्था)

### संशोधन अजून प्राथमिक टप्प्यात

हे जनुक निष्क्रिय केले गेले, तेव्हा रक्तवाहिन्यांची वाढ झपाट्याने कमी झाली. यावरून यांत्रिक ताणामुळे रक्तवाहिन्यांचे जाळे तयार करण्यासाठी विशिष्ट जैविक मार्ग कार्यान्वित होतात, हे सिद्ध होते. हे संशोधन अजून प्राथमिक टप्प्यात असले तरी, चुंबकाच्या साहाय्याने चालणाऱ्या या रक्तवाहिन्यांमधून रक्त किती प्रभावीपणे वाहते याची चाचणी घ्यावी आणि स्नायूंच्या ऊतींपासून सुरुवात करून, त्यांना प्रयोगशाळेत वाढवलेल्या मोठ्या ऊतींमध्ये समाविष्ट करावे, अशी योजना शास्त्रज्ञांची आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# ...तशीच नोंद व्हावी

जंतर-मंतर मैदानावरील आंदोलनात गेल्या दोन-तीन दिवसांत जे काही घडले, त्यावरून ते प्रश्न सोडविण्याच्या प्रामाणिक उद्देशाने उभे राहिल्याचे वाटत असले, तरी काही प्रश्न निर्माण करणारे घटक तेथे आंदोलकांचा मुखवटा पांघरून वावरत असावेत, अशी शंका घेण्यास वाव आहे. परकीय शक्ती आणि भारतात अस्थिरता निर्माण करणारी तत्त्वे सक्रिय झाल्याची चर्चाही सुरू झाली आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकास आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचा, व्यवस्थेस जाब विचारण्याचा आणि न्याय मिळविण्यासाठी संघटित होण्याचा अधिकार दिलेला आहेच; त्यामुळे हे आंदोलन न्यायासाठीचा संघर्ष ठरले पाहिजे अशी अपेक्षा असताना, त्याआडून सुरू झालेल्या राजकारणाकडे आणि डावपेचांकडे सजगतेने पाहण्याची आवश्यकता आहे. अशा आंदोलनांत राजकारणाचा शिरकाव झाला, तर ती केवळ समस्यांचा संघर्ष न राहता राजकीय हेतूने प्रेरित नियोजनबद्ध मोहीम ठरते. समस्या सुटण्याऐवजी त्या जटिल होतातच; पण त्यामध्ये नव्या समस्यांचीही भर पडते, असे आसपासच्या देशांमध्ये घडलेल्या 'जेन-झी'च्या आंदोलनांतून व त्यानंतर घडलेल्या सत्तांतरातून उघड झालेले आहे. आता देशात सुरू असलेल्या या आंदोलनाच्या निमित्ताने, अन्य देशांतील सत्तापालटानंतरच्या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक ठरते.

जगभरातील तरुणाईच्या मनात खदखदत असलेले काही प्रश्न भारतातील तरुणांसमोर असून त्यांची दखल घेऊन तरुणांना प्रश्नमुक्तीचा प्रशस्त मार्ग दाखविण्याची गरज जंतर-मंतरवरील आंदोलनामुळे अधोरेखित झाली, हे नाकारता येत नाही. नव्या सहस्रकात जन्मलेली 'जेन-झी' पिढी समाजासमोरील समस्या, तरुण पिढीपुढील प्रश्न आणि सत्ताकारणाकडे जागरूकपणे पाहणारी शक्ती म्हणून ती उदयास येऊ लागली आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने, पर्यावरण, सामाजिक न्याय आदी अनेक प्रश्नांवर देशातील यंत्रणांना प्रश्न विचारण्याची ताकद या पिढीने प्राप्त केलेली आहे. आंदोलनाचा हेतू, आंदोलकांच्या मागण्या आणि त्यावरील उपाययोजना यांकडे गांभीर्याने पाहून त्यावर ठोस तोडगा काढण्याची गरज अधोरेखित झाली आहे. पण, त्याची दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची आहे. अन्य काही देशांत जेन-झीच्या आंदोलनांनी तेथील प्रस्थापित सत्तांना हादरे दिले आणि काही ठिकाणी सत्तापालटही घडून आला. कोणतेही आंदोलन हे समस्या निर्माण करण्यासाठी नव्हे, तर सोडविण्यासाठी उभारले गेले तरच त्यास समाजाचा व्यापक पाठिंबा मिळत असतो. या अनुषंगाने अशा आंदोलनांचे जगातील वास्तव पाहिले तर उत्तर फारसे आशादायक नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. अशा आंदोलनांनी सत्तापालट घडवून आणले हे खरे. पण ज्या असंतोषाच्या उद्रेकातून सत्तांतर घडले, त्या असंतोषाची कारणे दूर करणे अत्यंत कठीण झाले असल्याचे दिसते आहे. अशा आंदोलनांमधून प्रकट होणारा तरुणांचा असंतोष संपूर्ण आर्थिक-सामाजिक व्यवस्थेविरुद्ध असेल, तर तो समस्या सोडविण्यास साह्यभूत ठरतो. तो व्यक्तिविरोधी असेल तर मूळ मुद्याचाही संकोच होतो. व्यवस्था बदलण्यासाठी व्यक्तीविरुद्ध दिल्या जाणाऱ्या घोषणांपेक्षा, व्यापक संस्थात्मक सुधारणा आवश्यक असतात, हा अन्य देशांतील आंदोलनांनंतरच्या परिस्थितीने जगाला शिकविलेला धडा आहे. बांगला देशात विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी उभारलेल्या आरक्षणविरोधी व भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचे उदाहरण ताजे आहे. या आंदोलनानंतर सत्तेवर आलेल्या नव्या राज्यकर्त्यांनी डिजिटल स्वातंत्र्य, रोजगारनिर्मिती आणि शिक्षण सुधारणा यांची वारेमाप आश्वासने तरुणांना दिली. काही प्रमाणात पोलिस कारवाईवरील नियंत्रण, ऑनलाईन अभिव्यक्तीवरील निर्बंध कमी करणे आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन अशी पावले उचलली गेली. मात्र, या देशाची वस्त्रोद्योगावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था सत्तांतरानंतरही मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करू शकलेली नाही. श्रीलंकेतील स्थिती फारशी वेगळी नाही. चार वर्षांपूर्वी उभ्या जगाचे लक्ष या देशातील तरुणाईच्या आंदोलनाने वेधले होते. इंधन टंचाई, महागाई आणि आर्थिक संकटातून देश सावरण्याचे आलेल्या अपयशामुळे संतापलेल्या तरुणांनी राष्ट्राध्यक्षांना पदत्यागास भाग पाडले. ही आंदोलने जगाला एक नवी शिकवण देऊन गेली आहेत. ती म्हणजे, रस्त्यावरची क्रांती सरकार बदलू शकते; पण कर्जबाजारी अर्थव्यवस्था आणि निर्ढावलेली यंत्रणा यांमध्ये तातडीचे बदल घडविणे सोपे नसते. लोकांच्या अपेक्षा आणि त्या पूर्ण करणाऱ्या व्यवस्थेचा वेग यांमध्ये अंतर पडले, तर आंदोलनांतील आदर्शवाद आणि सत्तेतील व्यवहारवाद यांच्यात मोठा संघर्ष निर्माण होऊ शकतो. परिणामी तो सातत्यपूर्ण अस्थिरता निर्माण करण्यास कारणीभूतही ठरू शकतो, हे चिली नामक देशात जेन झीच्या आंदोलनानंतर घडलेल्या सत्तांतरावरून स्पष्ट झाले. त्या देशात शिक्षणावरील वारेमाप खर्च, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या आंदोलनातूनच तरुण नेतृत्व सत्तेत आले. नव्या सरकारने किमान वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा, महिलांचे अधिकार आणि पर्यावरणीय धोरणांवर भर दिला. पण आर्थिक मंदी, संसदीय विरोध आणि लोकांच्या अतिउच्च अपेक्षा यामुळे बदलांचा वेग कमी पडला. ट्युनिशिया, इजिप्त, लिबिया यांसारख्या देशांतही तरुणांनी सत्तेविरुद्ध उठाव केले, पण त्यानंतरही अनेक ठिकाणी लष्करी नियंत्रण, यादवी संघर्ष किंवा आर्थिक अस्थिरता कायमच राहिल्याने, व्यवस्थेविरुद्धचा असंतोष आणि अपेक्षाभंगाचे दुःख कायमच आहेत. आजच्या तरुणांचा असंतोष बहुआयामी आहे. त्यांना फक्त नोकरी नको. त्यांना सन्मान, मानसिक आरोग्य, स्वातंत्र्य, पर्यावरणीय सुरक्षा आणि गुणवत्तापूर्ण जीवन हवे आहे. पारंपरिक राजकारणाने ही अपेक्षा समजून घेतली, तर संवादाच्या मार्गाने अपेक्षित बदल घडणे अवघड नसते. मात्र, तसे न झाल्यास, कोणत्याही आंदोलनाचे भविष्यकालीन परिणाम दीर्घकाळ झेलावे लागतात. भारतात सुरू असलेल्या आंदोलनाच्या संयोजकांना याचे भान राखावे लागेल. सत्तापालटाच्या अपेक्षेने आंदोलनांचा राजकीय आखाडा घडवू पाहणाऱ्यांचे पाठबळ मिळविण्याऐवजी, संस्थात्मक बदलाचा व्यापक आराखडा तयार करण्याकरिता सामाजिक सहकार्याचा एल्गार आवश्यक आहे. असा आराखडाच संस्थात्मक पारदर्शकता वाढवू शकतो, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांमधील दुवा म्हणून काम करू शकतो आणि तरुणांना केवळ मतदार म्हणून नव्हे, तर धोरण निर्मितीचा भागीदार म्हणून सहभागी करून घेऊ शकतो. अन्यथा, अपरिपक्व असंतोषातून जन्माला येणारे जे काही असेल, ते देखील अपरिपक्व असते. सध्या केवळ एका परीक्षेतील कथित गैरव्यवहार एवढाच तरुणांमधील असंतोषाचा केंद्रबिंदू राहिलेला नाही.

ढासळती शिक्षण व्यवस्था, रोजगारांच्या संधी, स्पर्धा परीक्षा, व्यवस्थांवरील विश्वास आणि सामाजिक गतिशीलता असे अनेक व्यापक मुद्दे या निमित्ताने जोडले गेले आहेत. ज्या देशांत जेन झीची आंदोलने झाली, त्याहून भारताचे राजकीय आणि सामाजिक वास्तव वेगळे आहे. सरकारवर धोरणात्मक बदलांचा दबाव वाढविण्याचा विधायक मार्ग असेच आंदोलनाचे स्वरूप असावयास हवे. रस्त्यावर उतरून सत्तेला हादरा देण्यापेक्षा, सत्तेला कामाला लावण्यात हे आंदोलन यशस्वी झाले, तर भविष्यातील अस्थैर्याची भीती राहणार नाही आणि एका नव्या, पारदर्शक पर्वाचा शिल्पकार म्हणून तरुण पिढीच्या आंदोलनाची इतिहासात नोंद होईल. या आंदोलनाची नोंद तशीच व्हावी, हीच कुठल्याही राष्ट्रभक्ताची इच्छा असेल. अस्थिरतेच्या अनिष्ट परिणामांची पुनरुक्ती करण्याचे कारण नाही. ■

## अर्थविशेष

**ॲड. हितेश पारसे**

# एआयएसमध्ये आता परदेशी मालमत्तेची माहिती

आजच्या जागतिक युगात शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि गुंतवणुकीसाठी लाखो भारतीय नागरिक परदेशाशी आर्थिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. अनेकांकडे अमेरिकेत, कॅनडा, यूके, ऑस्ट्रेलिया, दुबई किंवा सिंगापूरसारख्या देशांमध्ये बँक खाती, शेअर्स, म्युच्युअल फंड, निवृत्ती निधी किंवा स्थावर मालमत्ता आहे. काही जणांना परदेशातून पगार, व्याज, लाभांश किंवा भाडे उत्पन्न मिळते. यापूर्वी याची माहिती केवळ आयकर विभागाकडे उपलब्ध होती. आता आयकर विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून भारतीय करदात्यांच्या परदेशातील आर्थिक मालमत्ता, उत्पन्नाची माहिती त्यांच्या वार्षिक माहिती विवरणपत्रमध्ये दिसणार आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर भारतीय करप्रणालीतील पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे.

**एआयएस म्हणजे नेमके काय ? :** वार्षिक माहिती विवरणपत्र (एआयएस) म्हणजे करदात्याच्या आर्थिक व्यवहारांचा एक डिजिटल आरसा आहे. यामध्ये बँक व्याज, शेअर व्यवहार, म्युच्युअल फंड व्यवहार, टीडीएस, टीसीएस, मालमत्ता खरेदी-विक्री, उच्च मूल्याचे आर्थिक व्यवहार आदी माहिती याआधी दिसत होती. आता या यादीत परदेशातील आर्थिक माहितीची भर पडणार आहे.

**भारताला ही माहिती मिळते तरी कशी ? :** अनेकांना प्रश्न पडतो की, 'मी परदेशात खाते उघडले, तर भारत सरकारला त्याची माहिती कशी मिळेल?' याचे उत्तर आहे माहितीची स्वयंचलित देवाणघेवाण. ही ओईसीडीच्या सामान्य अहवाल मानक अंतर्गत सुरू करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय माहिती देवाणघेवाण प्रणाली आहे. आज १०० पेक्षा अधिक देश या व्यवस्थेत सहभागी आहेत. प्रत्येक सहभागी देश दरवर्षी आपल्या देशातील परदेशी नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती त्यांच्या मूळ देशाला पाठवतो. उदा. जर एखाद्या भारतीयाने अमेरिकेत खाते उघडले असेल तर अमेरिकेतील वित्तीय संस्था ती माहिती अमेरिकन कर प्राधिकरणाला देते; ती भारताच्या आयकर विभागाकडे पाठविली जाते.

एआयएसमध्ये खालील माहिती भारताला दिसण्याची शक्यता आहे- परदेशातील बँक खात्याचा तपशील, खात्यातील शिल्लक, व्याज उत्पन्न, लाभांश, शेअर्स व सिक्युरिटीजमधील गुंतवणूक, म्युच्युअल फंड, विमा पॉलिसी, आर्थिक मालमत्ता; काही परिस्थितीत स्थावर मालमत्तेची माहिती. आतापर्यंत ही माहिती आयकर विभागाकडे उपलब्ध असली तरी करदात्याला ती दिसत नव्हती. आता हीच माहिती एआयएसमध्ये उपलब्ध झाल्यामुळे करदाता स्वतः आधी तपासू शकेल आणि आवश्यक असल्यास दुरुस्तीही करू शकेल. ही बाब करदात्यांसाठी निश्चितच सकारात्मक आहे.

आयकर विभागाने माहिती अपलोड करण्यासाठी वेळापत्रक निश्चित केले आहे. २०२२ ते २०२४ या कालावधीतील माहिती ८ जुलै २०२६ पासून पुढील ९० दिवसांत एआयएसमध्ये उपलब्ध केली जाईल. २०२५ मधील माहिती प्राप्त झालेल्या महिन्याच्या अखेरीपासून ९० दिवसांच्या आत एआयएसमध्ये दिसेल. २०२६ पासून पुढे दरवर्षी माहिती प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत ती एआयएसमध्ये उपलब्ध होईल.

आजपर्यंत अनेक करदाते असे समजत होते की, परदेशातील मालमत्ता भारताला कळणार नाही. परंतु आता आयकर विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती आणि आपण आयकर विवरणपत्रात दिलेली माहिती यांची थेट तुलना होणार आहे. जर दोन्ही माहितीमध्ये तफावत आढळली तर करदात्याला स्पष्टीकरण द्यावे लागू शकते. म्हणूनच आता 'माहिती उघड करणे हेच सर्वोत्तम धोरण आहे.' हे तत्त्व अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

**कोणत्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी ? :** खालील करदात्यांनी आपल्या आर्थिक नोंदी तातडीने तपासाव्यात- परदेशात नोकरी केलेले भारतीय, अनिवासी भारतीय वरून निवासी बनलेले नागरिक, दुहेरी निवासस्थान असलेले करदाता, परदेशातील बँक खातेधारक, विदेशी शेअर्समध्ये गुंतवणूक करणारे, अमेरिकन ईएसओपी प्राप्त कर्मचारी, परदेशात घर किंवा फ्लॅट असलेले नागरिक, विदेशी लाभांश किंवा व्याज मिळविणारे, ऑनलाईन आंतरराष्ट्रीय गुंतवणूक प्लॅटफॉर्म वापरणारे गुंतवणूकदार. सरकारकडून एकवेळ माहिती जाहीर करण्याची संधी. सरकारने एका विशेष एकवेळच्या प्रकटीकरणाची योजनाची रूपरेषा जाहीर केली आहे. यात दोन प्रकारच्या प्रकरणांचा विचार करण्यात आला.

१. न जाहीर केलेले विदेशी उत्पन्न किंवा मालमत्ता- जर एकूण न जाहीर केलेली रक्कम ₹ १ कोटीपेक्षा कमी असेल तर. ३० टक्के कर; त्या कराच्या १०० टक्के इतका दंड भरून माहिती जाहीर करण्याची संधी मिळू शकते.

२. वैध उत्पन्नातून खरेदी केलेली, पण जाहीर न केलेली विदेशी मालमत्ता- जर विदेशी मालमत्तेचे मूल्य ₹ ५ कोटींपेक्षा कमी असेल तर. ₹ १ लाख निश्चित शुल्क भरून माहिती जाहीर करता येऊ शकते.

या योजनेतून खालील प्रकरणे या सवलतीपासून वगळली जाऊ शकतात- गुन्हेगारी उत्पन्नातून मिळालेली मालमत्ता, काळा पैसा कायद्यांतर्गत आधीच तपास पूर्ण झालेली प्रकरणे, कायद्याने अपात्र घोषित केलेली प्रकरणे. हा बदल लक्षात घेता खालील कृती तातडीने करणे आवश्यक आहे- आपल्या एआयएसची नियमित तपासणी करा. परदेशातील सर्व बँक खाती आणि गुंतवणुकीची यादी तयार ठेवा. मागील काही वर्षांचे आयटीआर आणि अनुसूची एफए पुन्हा तपासा. विदेशी उत्पन्न भारतात करपात्र आहे का, याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घ्या. दुहेरी कर टाळण्याचा करार (डी.टी.ए.ए.) चा लाभ मिळत असल्यास योग्य अंमलबजावणी करा. एआयएस आणि आयटीआरमधील माहितीमध्ये तफावत दुरुस्ती करा.

कधी कधी वित्तीय संस्थेकडून चुकीची माहिती पाठविली जाऊ शकते. उदा. चुकीचा पॅन जोडला जाणे, व्यवहाराची दुप्पट नोंद, चुकीची रक्कम, चुकीची व्यक्ती. अशा परिस्थितीत घाबरण्याचे कारण नाही. एआयएसमध्ये उपलब्ध असलेल्या प्रतिक्रिया सुविधेद्वारे संबंधित माहितीबाबत हरकत नोंदविता येते आणि आवश्यक पुरावे सादर करून दुरुस्ती मागता येते.

**निष्कर्ष :** भारतीय करप्रणाली जागतिक पारदर्शकतेच्या नव्या टप्प्यात प्रवेश करीत आहे. परदेशातील आर्थिक व्यवहार, बँक खाती, गुंतवणूक व मालमत्तेची माहिती आयकर विभागापर्यंत पोहोचत असल्याने ती योग्य प्रकारे आयकर विवरणपत्रात जाहीर करणे ही प्रत्येक करदात्याची जबाबदारी आहे. तज्ज्ञ करसल्ल्याच्या आधारे आपण भविष्यातील कर-विवाद, दंडात्मक कारवाई व अनावश्यक चौकशी सहज टाळू शकतो. कर पालनातील पारदर्शकता हीच जागतिक अर्थव्यवस्थेतील सुरक्षितता आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# जगण्याचा 'फायर' ट्रेंड!

सोशल मीडियाच्या काळात दररोज जगण्याचे नवनवे ट्रेंड व्हायरल होतात आणि चर्चा सुरू होते. उद्याचा दिवस कोणी पाहिला? म्हणून आजचा दिवस तुमच्या हातात आहे तो भरभरून जगून घ्या, हा विचार समाजात विशेषतः कोरोनानंतर जास्त स्थिरावला. 'सातच्या आत घरात'चा ट्रेंड कालबाह्य ठरून, 'वर्क हार्ड, पार्टी हार्डर' स्वीकारून वेगळाच ट्रेंड आपण रुजवला. त्यात खाण्यापिण्यापासून गॅझेट्सपर्यंत अनेक गोष्टींचे ट्रेंड येत-जात राहिले आणि एन्जॉयमेंटच्या साच्यात आपण त्यांना घडवत राहिलो. 'श्यामच्या आई'ची काटकसर तर 'जेन झी'ने पुस्तकातही कदाचितच वाचली असेल. मुळात आपण भविष्याची तरतूद करून ठेवणाऱ्या कष्टाळू मुंग्यांना आदर्श मानणारे! पोटाला चिमटा काढून उद्याची सोय करून ठेवायची, उत्पन्नातून लहानशी का होईना पण बचत करण्याची आपली संस्कृती! पण, पाश्चिमात्यांनी सांगितल्याशिवाय कुठलीच गोष्ट आपल्या गळ्याखाली उतरत नाही. या न्यायाने सध्याच्या 'फायर ट्रेंड'चा वेध घेऊ या!

'फायनान्शियली इंडिपेन्डन्ट, रिटायर अर्ली' एफआयआरई म्हणजे फायर! प्रचंड कष्ट, वेळप्रसंगी दोन-तीन ठिकाणी कामं करून पैसा कमवायचा. मात्र, 'पार्टी हार्डर' न करता उत्पन्नाचा जास्तीत जास्त भाग निवृत्तीनंतरची तरतूद म्हणून गुंतवायचा. यासाठी, कल्पनेपलीकडची काटकसर करायची. आपल्या निवृत्तीची सोय झाली, असं वाटण्याइतके पैसे गुंतवले की निवृत्ती घ्यायची. समाधानकारक जीवनमान असलेल्या लहान देशांमध्ये स्थलांतरित व्हायचं, शेती करायची, गाई-म्हशी पाळायच्या आणि शांत जीवन आनंदाने जगायचं. मात्र, ही निवृत्ती साधारण चाळिशीतच घेण्याची तयारी ठेवायची. हा आहे सध्याचा 'फायर ट्रेंड'! मागच्या शतकात जन्मलेल्या आणि आज ज्यांना 'मिलेनियल' म्हटलं जातं त्या पिढीला कदाचित यात काहीच नवीन वाटणार नाही. कारण खूप कष्ट आणि काटकसर करून जीवन जगायचं, उधळपट्टी हा गुन्हा आहे, खूपच आवश्यक असेल तरच खर्च करायचे हे तर त्यांच्या जीवनाचे मूलभूत नियम होते आणि आहेत.

युरोपियन देशांमध्ये गेल्या दशकभरात सुरू झालेल्या फायर ट्रेंडचे लोण आपल्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. हॉटेलिंग करायचे नाही, घरी स्वयंपाक करून कामावर जाताना सोबत डबा न्यायचा, विविध डिस्काऊंट कुपन्सचा कल्पकतेने वापर करायचा आणि हे सगळे उपाय करून उरणारी रक्कम गुंतवायची. गुंतवणुकीच्या पैशांवर उरलेले आयुष्य निवांत घालवायचे. असा हिशेब मांडताना आजारपण, अपघात आणि महागाईची संकल्पना लक्षात ठेवून नियोजन करण्याचा संदेश फायर चळवळीतील जाणते देतात.

ही एक जागतिक चळवळ असून ठिकठिकाणी या चळवळीच्या समर्थकांचे गट आहेत. नव्याने फायर अंमलात आणणाऱ्यांना, आधीपासून कार्यरत मंडळी उपयोगी टिप्स देतात. त्यात बचतीचे नवनवे पर्याय, चांगला परतावा देणारी गुंतवणूक, शेती-घर खरेदीतील बारकावे यांचा समावेश होतो. काही वित्तीय कंपन्या तर दरमहा मार्गदर्शिकाही प्रकाशित करतात. दुसरीकडे, उशिरा लग्न आणि अपत्यांचे संगोपन, महागाई, घरांच्या वाढत्या किमती आणि कर्जाच्या बोझ्यामुळे भविष्यासाठीच्या गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले आहे. निवृत्तीचे वयही पुरुषांमध्ये ६४.८ आणि त्यापेक्षा जास्त तर महिलांमध्ये ६३.३ पेक्षा जास्त नोंदविण्यात आलं आहे. वाढीव गुंतवणूक करून, लवकर निवृत्ती घेण्याचा विचारही करणे शक्य नाही. उत्पन्न मर्यादित असल्याने गुंतवणुकीवर बंधने आहेत. वित्तीय कंपन्यांच्या मते, बहुतांश ग्राहकांचं लक्ष काम आणि वैयक्तिक आयुष्यात अधिक चांगला समतोल साधण्यावर असतं. त्यामुळे निवृत्ती घेण्याची घाई करण्याऐवजी अर्थपूर्ण व्यावसायिक कारकीर्द आणि आपल्या आर्थिक क्षमतेनुसार जीवनशैलीचा समतोल साधण्यावर ते भर देतात. तुम्ही लवकर निवृत्त झालात पण, तुमचं सामाजिक वर्तुळ, चांगलं आरोग्य किंवा अर्थपूर्ण ध्येय नसेल, तर केवळ लवकर निवृत्तीचं ध्येय खरंच योग्य ठरतं का? निवृत्तीचं उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करतानाच आयुष्याचाही आनंद कसा घेता घेईल, असा सुवर्णमध्य युवा शोधत आहेत. चळवळीचे समर्थक आजही पराकोटीच्या काटकसरीलाच लवकर निवृत्तीचा मुख्य मार्ग मानतात.

चळवळीतील काही तत्त्वं खरोखर उपयुक्त आहेत आणि त्यांचा अवलंब केल्यास अगदी चाळिशीत नाही तरी पन्नाशीत निवृत्ती घेणं शक्य होऊ शकतं. लहान वयापासून बचत सुरू करणं आणि प्रत्येक वेतनवाढीनंतर निवृत्तीसाठीची बचत वाढवणं, असा लवचीक मार्ग अवलंबिता येईल. समतोल दृष्टिकोन स्वीकारल्यास मनावर अनावश्यक ताण न घेता, तुम्हाला हवी तशी आणि हवी त्या वेळी निवृत्ती घेणं शक्य होतं. त्यासाठी कोणत्याही ट्रेंडची नाही तर अधिक संतुलित आणि वास्तववादी दृष्टिकोनाची गरज आहे. ■

९२२३७००२७७

## प्रासंगिक


**वैजयंती वडनेरकर**

# असिधाराव्रत स्वीकारणाऱ्या युगप्रवर्तक

**राष्ट्र सेविका समितीच्या आद्य प्रमुख संचालिका वंदनीय मावशी उपाख्य लक्ष्मीबाई केळकर यांचा आषाढ शुद्ध दशमी (२४ जुलै २०२६) हा जन्मदिवस. समितीमध्ये तो दिवस 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जातो. तसेच राष्ट्र सेविका समितीच्या वाटचालीला यावर्षी ९० वर्षे झाली आहेत. त्यानिमित्त...**

युगप्रवर्तक म्हणजे, समाजातील अराजक वृत्तीतून निर्माण झालेल्या अस्थिर अशांत परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजाच्या, मानवी मनाच्या शक्तीमध्ये सकारात्मक, विचारात्मक, संस्कारात्मक राष्ट्रीय हिताचे ध्येय समोर ठेवून, परिवर्तन घडवून आणून एक समर्थ, समक्ष वैचारिकदृष्ट्या परिपूर्ण समाज घडविण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही संकल्प सिद्ध होऊन धर्माधिष्ठित कार्यासाठी आजीवन असिधाराव्रत स्वीकारून युग परिवर्तनाचे कार्य करणारे व्यक्तिमत्त्व. वंदनीय मावशींचा जन्मदिवस समितीमध्ये 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जातो.

पारतंत्र्याच्या आधीपासूनच अनेक आक्रमणांनी भारतीय अर्थ, राज्य व जीवन व्यवस्थेवर अनेक आघात केले. भारत सतत संघर्षरतच होता. स्त्रीशक्तीवर अन्याय-अत्याचार होत होते. अशा परिस्थितीत देश-धर्म-संस्कृतीच्या विचार, राष्ट्रभक्तीच्या संस्काराच्या मुशीतच ज्या परिवाराची जडणघडण झाली होती अशा दाते परिवारात जन्माला आलेल्या वंदनीय मावशी उपाख्य लक्ष्मीबाई केळकर यांच्या जीवनावर वेगळे संस्कार असणे शक्यच नव्हते. वंदनीय मावशींनी स्वातंत्र्यपूर्व काळातील आजूबाजूच्या समाजाचे बारकाईने अभ्यासपूर्ण निरीक्षण केल्यावर त्यांना स्त्रियांनी संघटित होऊन समाज घडणीच्या व राष्ट्र उभारणीच्या कार्यात संघटित शक्तीच्या रूपात मदत करणे काळाची गरज वाटू लागली. या साक्षात्कारातूनच त्यांनी राष्ट्रसेविका समितीची स्थापना २५ ऑक्टोबर १९३६ साली केली. तत्पूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प.पू. डॉ. हेडगेवार यांचे मार्गदर्शनातून हे विश्वव्यापी पाऊल उचलले. राष्ट्रसेविका समिती विश्वातील सर्वात मोठे महिलांचे स्वयंसेवी संघटन आहे. राष्ट्र सेविका समितीच्या ९० वर्षांच्या वाटचालीत हिंदुत्वाचा विचार, संस्कार व समाज आणि राष्ट्राप्रति असलेल्या समर्पित भावनेच्या कार्यपद्धतीतून समितीचे हे विश्वव्यापी संघटन झाले आहे. त्या माध्यमातून महिलांमध्ये शुद्ध शील-चारित्र्य तसेच शारीरिक-मानसिक-बौद्धिक क्षमता वाढवून कार्यपद्धतीतून सामाजिक समरसता समाजामध्ये निर्माण करते; शिवाय राष्ट्र जागृती संस्कार शिक्षा सेवा सामाजिक व राष्ट्रीय स्वास्थ्याबरोबरच येणाऱ्या आव्हानांना सक्षमपणे तोंड देण्यासाठी महिलांना स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे अभूतपूर्व कार्य समितीच्या संस्कारातून होत असते. समितीचे कार्य पाहून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटले होते की, अन्य महिला संघटनांचे कार्य किंवा राजकीय कार्य हे धो-धो पडणाऱ्या पावसासारखे आहे तर समितीचे कार्य रिमझिम पडणाऱ्या पावसासारखे आहे; जे राष्ट्रीय जीवनात सुसंस्काराचे व सकारात्मक विचारांचे बीजारोपण करते आहे.



समितीचे कार्य तेजस्वी राष्ट्राचे पुनर्निर्माण करण्याचे आहे. वंदनीय मावशी म्हणत, 'स्त्री ही संसार रथाची रथी नसून सारथी आहे आणि तिला आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून श्रीकृष्णासारखे सारथ्य करून कुटुंब परिवार समाज आणि राष्ट्र घडवायचे आहे.' समिती कार्याची विशिष्ट कार्यपद्धती आहे. दैनंदिन शाखेच्या नित्य उपासनेतून अतिशय सरळ सोपी आणि कार्य कुशल कार्यपद्धती आहे. मंत्र छोटा तंत्र सोपे अशा पद्धतीने सेविका ते कार्यकर्ता अशा संस्काराच्या जडणघडणीसाठी दैनंदिन शाखा, एकत्रीकरण, अभ्यास वर्ग, नैपुण्य वर्ग, संमेलने, शिबिरे बैठकी,चर्चा, प्रशिक्षण वर्ग, बौद्धिक वर्ग आदी कार्यपद्धतीतून प्रशिक्षित केले जाते. हे कार्य व्यक्तिनिष्ठ नसून तत्त्व-ध्येयनिष्ठ आहे. राष्ट्र देवो भव या संस्कारातून समिती कार्य करते. त्यासाठी परिचय, सक्रियता, दायित्व, कार्यकर्ता, सेविका अशा दृष्टी विचार विस्तार आणि विकासातून सेविका घडते; त्यासाठी संपर्क संग्रह संस्कार नियोजनाचे कार्य केले जाते. संपर्क हे समिती कार्यात रक्तवाहिन्याचे काम करते. समिती संपूर्ण विश्वाला आपला परिवार मानते. बौद्धिक विभाग, शारीरिक विभाग, व्यवस्था विभाग, सेवा विभाग, धार्मिक विभाग, तरुणी विभाग, घोष विभाग तसेच वर्षप्रतिपदा, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, विजयादशमी, मकर संक्रांत; सोबतच वंदनीय मावशीचा जन्मदिन संकल्प दिन व स्मृती दिन सेवा दिन म्हणून साजरा करून त्याद्वारे समिती कार्याच्या विचारांचा परिचय समाजाला करून दिला जातो. राष्ट्रहिताचे कार्य करणारी समिती देशाच्या प्रगतीसोबतच येणाऱ्या आव्हानांमध्येसुद्धा संपूर्ण शक्तिनिशी देशाच्या पाठीशी समर्थपणे उभी राहत असते. विविध चळवळींसोबतच कोरोना काळातील सेवाकार्य अतुलनीय आहे.

प्रमुख संचालिका म्हणून वं. मावशींनंतर वं. ताई आपटे, वं. उषाताई चाटी, वं. प्रमिलताई व वर्तमान प्रमुख संचालिका वं. शांताक्का अशा पंच दीपांच्या प्रखर तेजस्वी निष्ठावान व श्रद्धावान मातृहृदयी नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली समिती कार्याची वाटचाल सुरू आहे. समितीच्या माध्यमातून आज संपूर्ण भारतामध्ये एकूण २३१० सेवाकार्य सुरू असून त्यात शिक्षा ४३३, स्वास्थ्य २१९, स्वावलंबन १७६, धार्मिक १११० आणि अन्य ३७२, याशिवाय २३ प्रतिष्ठाने कार्यरत आहेत. २३ छात्रावासात आदिवासी दुर्बल आत्महत्याग्रस्त शेतकरी, पूर्वांचलातील म्हणजे देशातील संवेदनशील भागातील मुलींच्या शिक्षणासहित सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य सुरू आहे. विविध सेवाकार्याच्या माध्यमातून समिती तळागाळापर्यंत पोचली आहे. आज समिती क्षेत्र १२, प्रांत ३८ व १०४२ जिल्ह्यात कार्यरत असून संपूर्ण भारतात शाखा संख्या ५००० आहे. कुटुंबाचा, परिवाराचा आधारस्तंभ असलेली मातृशक्ती हीच समितीची प्रेरणादायी शक्ती आहे. समितीच्या ९० वर्षानिमित्त होणाऱ्या वाटचालीच्या कार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून अखिल भारतीय स्तरावर जवळपास २००० सेविकांचे सामूहिक घोषवादन २७ डिसेंबर २०२६ रोजी गुजरात प्रांतात कर्णावती येथे संपन्न होणार आहे. हे वर्ष म्हणजे सेविकांची साधना, समर्पण व राष्ट्र कार्याच्या गौरवपूर्ण प्रवास कार्याची स्मरणगाथा आहे. त्यानिमित्ताने संपूर्ण भारतभर प्रांत संमेलनाच्या आयोजनाचे नियोजन करण्यात आले आहे. हिंदू धर्म संस्कृती मां भारती, हिंदू जीवन मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करीत विश्व कल्याणाची प्रार्थना करीत आवश्यक सप्तशतीने युक्त अशा मातृशक्तीचे संघटन असलेल्या राष्ट्रसेविका समितीच्या कार्यासाठी विश्व जननीला एवढीच प्रार्थना...

**निःश्रेयस्य प्राप्त्यर्थ, अभ्युथनप्रदं शुभम् ।**
**देहि सामर्थ्यम् इशे नो, विश्वमांगल्यकारकय् ।।** ■

९५७९६०९९७५

### पर्यटकांनी स्वयंशिस्त पाळावी

पावसाळा हंगाम म्हटले की सुटीचा दिवस गाठून पर्यटक सहकुटुंब आणि मित्र परिवाराबरोबर नजीकच्या निसर्गरम्य ठिकाणी पर्यटनास जातात. डोंगरातील धबधबे, घाट माथा, तलाव तसेच समुद्र किनारी परिसरात पर्यटक गर्दी करतात. हुल्लडबाजीत निसर्गाचा आनंद लुटताना जनाचे भान न ठेवता बीभत्स प्रकारे सामाजिक वातावरण दूषित करीत असतात. इगतपुरी येथील घडलेला प्रकार ताजाच आहे. पर्यटकांनी अति उत्साह टाळावा. स्वयंशिस्त पाळावी. वन विभाग, पर्यटन विभाग आणि पोलिसांनी समन्वय साधून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीने उपाययोजना कराव्यात. पर्यटन ठिकाणी ऑनलाईन नोंदणी पद्धत सुरू करून नोंदणी केलेल्या पर्यटकांना प्रवेश देण्यात यावा. दुर्ग व पर्यावरण अभ्यासकाकडून जनजागृती करण्यात यावी. हवामान अंदाजाबाबत वेळोवेळी सूचित करण्यात यावे. धबधबा असणाऱ्या ठिकाणी अतिउत्साही पर्यटकांना प्रवेशास बंदी घालवी. सुटीच्या दिवशी पोलिस मनुष्यबळ वाढवून बंदोबस्त चोख ठेवण्यात यावा. धबधबा परिसरात गर्दी वाढू लागली वर मार्गावरील पर्यटकांना सूचित करून गर्दी आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करावेत.

**नितीन कुंभार**/पिंपरी-पुणे

■■

### राजीनाम्याची दुर्दैवी मागणी

'नीट' परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणातील आंदोलनात काही विद्यार्थ्यांच्या खांद्यावर नरेटिव्ह विचारांची बंदूक ठेवून जे काही गलिच्छ राजकारण केले जात आहे कीव करावीशी वाटते. अशा याआधी झालेल्या पेपरफफुटीच्या घटनांतून किती शिक्षणमंत्र्यांनी राजीनामे दिले होते, याचे परीक्षण करण्याची विरोधकांची खरी वेळ आहे. २००४ ते २०१४ या काँग्रेस सरकारच्या काळात पेपरफुटीच्या जवळजवळ ७०-७२ घटना घडल्या होत्या. जेव्हा जे शिक्षणमंत्री होते यापैकी एकाही मंत्र्यांनी राजीनामा दिला नव्हता. मग आजच विरोधक अपेक्षा का करून राहिले. त्यांना केवळ मोदी, आरएसएस आणि भाजपाद्वेष या नशेतून याचा विसर पडलेला दिसतो आहे. एवढेच काय, २००४ ते २०१४ या काळात शरदचंद्र पवार कृषिमंत्री असताना साधारण १,७०,००० च्या वर शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. तेव्हा साहेबांनी राजीनामा दिला होता का? आज ते जंतर मंतरवर भेटी देत आहेत. उठसूट राजीनामा मागायचा नसतो आणि घ्यायचाही नसतो ही तर १२५ वर्षे जुन्या काँग्रेस सरकारची शिकवणूक विसरून कशी चालेल? यासाठीच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी दुर्दैवी आहे असे वाटते.

**अमोल करकरे**/खेड-रत्नागिरी, ९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

■■

### अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा डोंगर

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ नुकतेच सुरू झाले असून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याऐवजी शिक्षकांच्या मानगुटीवर अशैक्षणिक जबाबदाऱ्या टाकल्यामुळे शिक्षकांच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर परिणाम होऊ लागला आहे. मुख्य निवडणूक आयोगाने ३ जुलै २०२६ रोजी शिक्षकांना इतर कोणत्याही अशैक्षणिक कामात गुंतवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले असून शिक्षण विभागाने सर्वेक्षणाची जबाबदारी शिक्षकांवरच सोपवली आहे. राज्यात सध्या शिक्षकांना मतदार यादी सुधारणा कार्यक्रम तसेच बुथ लेवल ऑफिसर ही कामे सोपविलेली असतानाच आता प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १५ ते ३० जुलैदरम्यान शाळाबाह्य अनियमित आणि स्थलांतरित बालकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. या सर्व कामामुळे अशैक्षणिक कामे करायची की विद्यार्थ्यांना शिकवायचे अशा मानसिक तणावातून शिक्षक जात आहेत. शिक्षकांच्या शारीरिक आणि मानसिक परिस्थितीचा विचार करता शासनाने शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून दूर ठेवले पाहिजे. संस्थाचालक, ग्रामस्थ हे शिक्षकांकडून चांगल्या गुणवत्तेची व निकालाची नेहमीच अपेक्षा करतात. अशावेळी शिक्षकांना जर विद्यार्थ्यांपासून दूर ठेवून अशीच अशैक्षणिक कामांची जबाबदारी दिली जात असेल तर आपण शिक्षणात अग्रेसर असलेल्या केरळ राज्याकडून काहीच बोध घेतला नाही, हे सिद्ध होते. शिक्षकांनी ही कामे केले नाही तर अधिकारी वर्ग कारवाईची भाषा करत असतात. हे थांबणे आवश्यक आहे अन्यथा शिक्षण क्षेत्रातून उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही.

**शशिकांत जाधव**/पुणे

■■

### विचलित करणारे आंदोलन

देशात अराजकता पसरविणे हाच उद्देश समोर ठेवून वावरणारे विरोधक व त्यांचे तथाकथित तरुण नेतृत्व या मार्गाने देशाची सत्ता हस्तगत करू शकतील काय? निश्चितच नाही. मात्र, समाजकंटकांना मोकळे रान उपलब्ध करून देऊ शकतील. तरुण विद्यार्थ्यांना वापरून घेण्यात हे तरबेज आहेत. सरकार मात्र विद्यार्थ्यांचा रोष लक्षात घेऊन कारवाई करण्यास कमी पडले असे वाटते वा जी पाउले उचलली ती असंतोष कमी करण्यात पर्याप्त ठरली नाहीत असे दिसते. कारवाई पारदर्शक व समाज मनाला पटणारी असावी. नैतिक जबाबदारी कोणाची असेल तर ते दिसावयास नको काय? काही झाले तरी सरकारने सक्त राहून हुडदंग माजवणारे चिन्हित करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. ■

**संजय वेलणकर**

# जंतर-मंतरवरील विद्यार्थी हल्ल्याच्या निषेधार्थ अकलूज, माळीनगर परिसरात कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि.२३ जुलै-**

दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर सुरु असलेल्या विद्यार्थी आंदोलन कर्त्यांवर पोलीसांनी केलेल्या अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित आघाडीने पुकारलेल्या सर्व पक्षीय बंदला प्रतिसाद देत अकलूजसह परीसरात अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दैनदिन व्यवहार व्यापारी वर्गांनी बंद ठेवुन कडकडीत बंद पाळला. यावेळी अकलूज व माळीनगर परीसरातील सर्व संविधान समर्थकांनी अकलुजच्या प्रांत कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले.



महाराष्ट्र बंदच्या आंदोलनास पाठींबा देत माळशिरस तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. अकलूजसह परीसरातील माळीनगर, यशवंतनगर, संग्रामनगर व परीसरातील सर्व दैनदिन व्यवहार बंद ठेवुन महाराष्ट्र बंद पाळण्यात आला. माळीनगर येथील लोकशाहीवादी समर्थकांनी रमामात कॉलनी ते अकलूज येथुन पायी मोर्चा काढला होता. हा मोर्चा अकलुज येथील डॉ. आंबेडकर चौकात पोहचल्यानंतर डॉ. आंबेडकर स्मारकास अभिवादन करुन अकलुज व परीसरातील सर्व नागरिक या मोर्चात सहभागी झाले. वंदे मातरम, जय शिवाजी जयभीम, जय संविधान अशा घोषणा देत मोर्चा अण्णाभाऊ साठे स्मारकापासून, सदभाऊ चौक मार्गे प्रांत कार्यालयावर धडकला. प्रांत कार्यालय येथे मोर्चाचे निषेध सभेत रुपात्तंर झाले. यावेळी दिल्लीच्या आंदोलनात सहभागी होवून परतलेल्या अकलुजच्या विद्यार्थीनी तनुजा साळुंखे व वैष्णवी खिलारे यांनी आंदोलनात झालेल्या पोलीस हल्ल्याचा थरारक अनुभव सांगितला.

आंदोलन कर्त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर केले. अव्वल कारकुन शशिकांत शिंदे यांनी सदरचे निवेदन स्विकारून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.या मोर्चात माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, विठ्ठलराव गायकवाड, वंचितचे अभिजीत गायकवाड,अभिमान जगताप,नंदकुमार केंगार,ॲड. सोमनाथ वाघमोडे,भानुदास सालगुडे,मुक्तार कोरबु,ॲड. सुमीत सावंत,स्वप्नील वाघमारे, किरण धाईंजे,किरण साठे, धनाजी साखळकर,सुरेश गंभीर, प्रकाश काले नगरसेवक नाशिक सोनवने,विशाल मोरे,प्रतिभा गायकवाड,मनिषा तिकोटे, प्रियंका गायकवाड,भारतीय बौद्ध महासभेचे नागेश लोंढे,नंदेन तिकुटे गुरुजी आदी उपस्थित होते.


## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**ट्रॅक्शन संपत्तीची देखभाल**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, सोलापूर विभागातील सहाय्यक ट्रान्सफॉर्मर (AT), सीएलएस पॅनेल, AT केबल, ट्रॅक्शन बाँड, अर्थ पिट, नंबर प्लेट इत्यादी संपत्तीचे दुरुस्ती/बदली करून आणि रंगकाम करून पुनर्वसन करणे या कामासाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योर्मेंट संकेतस्थळ www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत (पुन्हा मागवलेली निविदा). निविदा क्रमांक: SUR/TD/T/2026/08R. कामाचे नाव: सोलापूर विभागातील सहाय्यक ट्रान्सफॉर्मर (AT), सीएलएस पॅनेल, AT केबल, ट्रॅक्शन बाँड, अर्थ पिट, नंबर प्लेट इत्यादी संपत्तीचे दुरुस्ती/बदली करून आणि रंगकाम करून पुनर्वसन करणे. अंदाजित खर्च: 1,18,21,729/-. निविदा सुरक्षा (बयाणा रक्कम): 2,36,400/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. प्रस्तावाची वैधता: 60 दिवस. संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 17.08.2026 रोजी 15.00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), सोलापूर**
EXP-34
तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**आरयूबीचे बांधकाम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत: (1) निविदा सूचना क्रमांक: 17-2026-एसआरडीईएनएस. कामाचे नाव: एडीईएन/केडब्ल्यूव्ही/बीजी अंतर्गत डीडी-केडब्ल्यूव्ही विभागातील बीआरबी-एमएलएम स्टेशन दरम्यान पुश पद्धतीद्वारे रेल्वे किमी 278/5-6 वर आरयूबीचे बांधकाम (बॉक्स आकार 6.0m x times5.50m). (ठेव अटी). कामाची अंदाजित किंमत: 64026433.54, बयाणा रक्कम: 1280500.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 48 महिने. (2) निविदा सूचना क्रमांक: 18-2026-एसआरडीईएनएस. कामाचे नाव: मोहोळ-वाडी विभागात किमी 431/9-432/0, किमी 450/4-5, ओएचई मस्ट 465/12-14 आणि ओएचई मस्ट 592/16-18 येथे अतिरिक्त जलमार्गासाठी अतिरिक्त पुलाच्या तरतुदीसाठी टोपोग्राफिकल सर्वेक्षण, हायड्रोलॉजिकल आणि हायड्रोलिक अभ्यास. कामाची अंदाजित किंमत: 3422000.00, बयाणा रक्कम: 68400.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 03 महिने. देखभाल कालावधी: लागू नाही. www.ireps.gov.in या संकेतस्थळावर कोट केलेली निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 07.08.2026. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 07.08.2026 रोजी 17.30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक नोंदवण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार संकेतस्थळाला भेट देण्याचा सल्ला दिला जातो. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

EXP-33 डीआरएम (कामे), सोलापूर
तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा


# जंतर-मंतर प्रकरणी टेंभुर्णीत निषेध मोर्चा



## वंचित बहुजन आघाडीसह वडार परिवर्तन सेनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ जुलै-**

विद्यार्थी व आंदोलनकर्त्यांवर कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ गुरुवार (दि. २३) रोजी टेंभुर्णीत विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, व्यापारी, वकील, डॉक्टर आणि शेकडो युवकांच्या सहभागाने भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.

टेंभुर्णीतील वंचित बहुजन आघाडीचे राहुल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून रॅली काढण्यात आली. अत्यावश्यक सेवा वगळता व्यापाऱ्यांनी बंदला शंभर टक्के प्रतिसाद दिला. मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत निषेध मोर्चा काढला. आंदोलनादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

कुर्डूवाडी चौक येथे सर्वपक्षीय पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांच्या उपस्थितीत सभा झाली. त्यानंतर वडार परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार धोत्रे यांनी मंडल अधिकारी शेळवणे यांना निवेदन सादर करून लाठीहल्ल्याचा निषेध नोंदविला.

आंदोलनात माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाटील चांदजकर, प्रमोद कुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, संभाजी ब्रिगेडचे सचिन जगताप, वंचित बहुजन आघाडीचे महेंद्र सोनवणे, डॉ. राहुल पाटील, विशाल नवगिरे, औदुंबर देशमुख, ॲड. तुकाराम राऊत, डॉ. ज्योती अनंतकवळस, महेंद्र वाक्षे, क्रांती लोंढे, सुनील ओव्हाळ, वैभव कुटे, डॉ. पांडुरंग गायकवाड, भीमराव बंडगर, सुरेश लोंढे, कोंडार भागतील नेते गोविंद भाऊ पवार, नारायण गायकवाड, हरीभाऊ माने,बाबा चंदनकर, संतोष खैरमोडे,प्रशांत सोनवणे,गणेश केचे, सुनील ओहोळ ,विकास बंदपट्टे आदी सहभागी झाले होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज क्र. १७/२०२६
पुढील नेमलेली तारीख: २९/०८/२०२६
निशाण क्र. ६

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साहेब, यांचे कोर्टात

१) **श्रीमती सुवर्णा सूर्यकांत राऊत,**
वय - ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी,
रा. हांडे गल्ली, कसबा पेठ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर.

२) **चि. सुयश सूर्यकांत राऊत,**
वय - २१ वर्षे, व्यवसाय - नोकरी,
रा. हांडे गल्ली, कसबा पेठ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

— **अर्जदार**

विरुद्ध

**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील सूर्यकांत वसंत उर्फ वसंतराव राऊत हे दि. ११/०८/२०२४ रोजी बार्शी, ता. बार्शी येथे निधन झाले असून, अर्जदार क्र. १ व २ हे मयत कै. सूर्यकांत वसंत उर्फ वसंतराव राऊत यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. सूर्यकांत वसंत उर्फ वसंतराव राऊत हे मृत्युसमयी प्रयोगशाळा परिक्षक म्हणून श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे कायमस्वरूपी नोकरीस होते. त्यांचे मृत्युपश्चात शासनाकडून भविष्य निर्वाह निधी/भनिन याची रक्कम देय होती व आहे. सदर रक्कम मिळणे करीता अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसांच्या आत किंवा पुढील नेमलेल्या २९/०८/२०२६ या तारखेस न्यायालयात हजर राहून कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजून सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य तो निर्णय पारित करतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे. दि. २२/०७/२०२६

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**कनिष्ठ लिपीक**<br>**दिवाणी न्यायालय**<br>**वरिष्ठ स्तर, बार्शी** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-**<br>**सहाय्यक अधीक्षक**<br>**दिवाणी न्यायालय**<br>**वरिष्ठ स्तर, बार्शी** |

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयइन : : **L17111PN1907PLC000258**
नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर,महाराष्ट्र - ४१३००१
दूरध्वनी **+९१ २२ २२८७२४०१**, वेबसाइट www.jamshri.in, ईमेल आयडी : **jammill1907@gmail.com**

**३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. लाख)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | 30.06.2026 (अलेखापरिक्षित) | 31.03.2026 (लेखापरिक्षित) | 30.06.2025 (अलेखापरिक्षित) | 31.03.2026 (लेखापरिक्षित) |
| 1 | परिचलनातून एकूण उत्पन्न | 168.71 | 151.74 | 183.78 | 712.01 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/ (तोटा) | 18.00 | (30.16) | 10.01 | (13.86) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्चात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | 18.00 | (30.16) | 10.01 | (13.86) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | - | 10.24 | (1.01) | (4.76) |
| 5 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | - | 10.24 | (1.01) | (4.76) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश) नफा/ (तोटा) करपश्चात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन्न (करपश्चात) | 18.00 | (10.19) | 9.00 | (8.88) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रू. 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत अखंडित परिचलन | 0.26 | (0.43) | 0.14 | (0.20) |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत खंडित परिचलन | - | 0.15 | (0.01) | (0.07) |

**टिप :**
अ) उक्त अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरिक्षित समितीने आढावा घेतला आहे. संचालक मंडळाने त्यांच्या जुलै 23, 2026 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्याला मंजुरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारित असल्याप्रमाणे आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचावयाच्या कंपन्या आधिनियम 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचित केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी ऐस) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिताचा वित्तीय निष्कर्षाचा बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीख : 23.07.2026
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही
राजेश दामाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

## भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

### WALK-IN-INTERVIEWA

Walk in interview will be held on **17/08/2026 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | National Agriculture Innovation Fund Scheme (IPR) | Young Professional-II | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.in

**Sd/-**
**DIRECTOR**

## श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

**श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड,सोलापूर-४१३००५ फोन नं. ०२१७-२३७४६७८**
**Email ID - ampmcsolapur@gmail.com / am_solapur@msamb.com**

**जा.न. प्रसिध्दीकरण/५२९** **दिनांक २३/०७/२०२६**

### जाहीर नोटीस

### सभागृह भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे

श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर यांचे मालकीचे सहकार महर्षी कै. वि.गु. शिवदारे आण्णा सभागृह काही अटीस अधिन राहून चालविणेस देणेचे आहे. ज्यांना सदरचे सभागृह चालविणेचे असेल त्यांनी आपले दरपत्रक दि. ०३/०८/२०२६ पर्यंत बाजार समितीच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत. सभागृह भाडेतत्वावर देणेबाबतचे नियम व अटी मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

**सही/-**
**सभापती**
**बाजार समिती, सोलापूर**

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११
### (महाराष्ट्र शासन उपक्रम)

**कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ८, सोलापूर यांचे कार्यालय सिंचन भवन, गुरुनानक चौक, क्लब कँटीन जवळ, सोलापूर**
**दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७३२८५३ ई-मेल - ucd8.solapur@gmail.com**

**दुबार ई निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर,** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**कामाचे नाव :-** एकरुख उपसा सिंचन योजना जलद कालवा १ ते ९ कि.मी. मधील यांत्रिकी पद्धतीने अस्तरीकरणाचे काम.
**जिल्हा :-** सोलापूर
**निविदेची किंमत रुपये :-** २१३७.६६ लक्ष
**१. निविदा उपलब्ध कालावधी :-** दि. २४/०७/२०२६ ते दि. ०४/०८/२०२६
**२. निविदा उघडण्याचा दिनांक :-** दि. ०६/०८/२०२६ रोजी

| | |
|---|---|
| **जा.क्र. उकावि-८/**<br>**निविदा/३२०३/२०२६**<br>**उजनी कालवा विभाग क्र.८,**<br>**सोलापूर दि. १६/०७/२०२६** | **सही/-**<br>**कार्यकारी अभियंता**<br>**उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर** |

## Office Of The Returning Officer, Saraswat Co-Operative Bank Ltd., Mumbai & Collector and District Magistrate, Mumbai City

Email : collector.mumbaicity@maharashtra.gov.in Tel. No :- 022-22662440

**Ref. : Order dated 27/05/2026 received from Director-CEA,Government of India, Ministry of Co-Operation,The Co-Operative Election Authority**

In the exercise of the powers conferred by the Section 45 K(1) of the Multi State Co-operative Societies Act 2002 read with the Rule 19F(a) of the Multi State Co-operative Societies Rules 2002, as amended with MSCS Rules in 2023, an election is schedule where, **Collector & District Magistrate, Mumbai City is the Returning Officer,** who is appointed to conduct the election of the Board of Directors of **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai-400025**.

| | |
|---|---|
| **Office of the Returning officer** | **Collector & District Magistrate, Mumbai City, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400 001.** |
| **Registered Office of the Society** | **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan,953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai-400025.** |

**ELECTION OF DIRECTORS FOR THE TERM 2026-2031**
**(Bye-law No.55)**

| Sr. No. | Category | No. of Directors |
|---|---|---|
| 1 | **General**<br>1) Candidates for fourteen seats from amongst the members of the Society residing in and or carrying on business and or engaged in gainful occupation within limits of State of Maharashtra.<br>2)Candidates for Two seats from amongst the members of the society residing in and or carrying on business and or engaged in gainful occupation outside the limits of State of Maharashtra but within the area of operation of the bank. | 14<br>02 |
| 2 | **Women**<br>Candidate for two reserved seats for women amongst the members of the society residing in any State or Union Territories in the Union of India, where the Bank has or may have its Branches. | 02 |
| 3 | **Schedule Caste/Schedule Tribes**<br>Candidate for one reserved seats for Scheduled Caste/Schedule Tribes from amongst the members of the society residing in any State or Union Territories in the Union of India, where the Bank has or may have its Branches. | 01 |
| | **Total** | 19 |

**ELECTION PROGRAMME**

| SR | STAGES | DAY/DATE | TIME | PLACE |
|---|---|---|---|---|
| 1 | Publication of provisional List of Members / Eligible to Votes on website and notice Board | 27/07/2026 (Monday) | 5.00 P.M. | Office of the Returning Officer, **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai- 400001)**, & Registered office of the Bank and all the branches. |
| 2 | Time Window for Raising ObjectionTo the Provisional List | 28/07/2026 To 31/07/2026 (Tuesday to Friday) | 11.00 A.M. To 03.00 P.M. | Office of the Returning Officer, **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001).** |
| 3 | Scrutiny of objection received to the Provisional List (if any) | 03/08/2026 To 07/08/2026 (Monday to Friday) | 11.00 A.M. To 03.00 P.M. | Office of the Returning Officer, **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001).** |
| 4 | Publication of Final List of Members / Delegates, eligible to vote on website & notice board of the society | 07/08/2026 (Friday) | 05.00 P.M | Office of the Returning Officer **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001).** & Registered office of the Bank and all the branches. |
| 5 | Issue and filing of Nomination Form | 17/08/2026 To 21/08/2026 (Monday to Friday) | 11.00 A.M. To 03.00 P.M. | **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi,Mumbai - 400025** |
| 6 | Display of nomination received by Returning Officer on website & notice board of the society. | 21/08/2026 (Friday) | 05.00 P.M. | Office of the Returning Officer **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** & Registered office of the Bank and all the branches. |
| 7 | Scrutiny of Received Nomination Forms | 24/08/2026 (Monday) | 11.00 A.M. onwards | Office of the Returning officer. **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** |
| 8 | Publication of List of Valid Nomination Forms | 24/08/2026 (Monday) | By 5.00 P.M | Office of the Returning officer. **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** & Registered office of the Bank and all the branches. |
| 9 | Withdrawal of Nominations | 25/08/2026 (Tuesday) | 11.00 A.M To 03.00 P.M | **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, ,Mumbai - 400025** |
| 10 | Publication of Final list of Contesting candidates | 25/08/2026 (Tuesday) | 05.00 P.M | Office of the Returning officer. **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** & Registered office of the Bank and all the branches |
| 11 | Date of Polling if Necessary | 08/09/2026 (Tuesday) | 08.00 A.M.To 04.00 P.M (and all those who entered polling station at 04.00 p.m or before should be allowed to cast vote). | Place will be declared later. |
| 12 | Counting of Votes | 11/09/2026 (Friday) | From 08.00 a.m Onwards | Place will be declared later. |
| 13 | Submission of Form 19 M with reommendation for Seeking approval of CEA before declaration of BOD | 11/09/2026 (Friday) | -- | -- |
| 14 | Declaration of Results of Board of Directors | On or before 18/09/2026 | -- | -- |

**Election Programme of Office Bearers (After Declaration of Result of Board Members Election)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Announcement of Election Schedule | 21/09/2026 (Monday) | **Bank's Registered Office at Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi,Mumbai 400025** |
| | (I) Time window for filing Nomination | 09.30 am to 11.30 am | |
| | (II) Scrutiny of nomination papers | 12.30 pm to 02.00 pm | |
| | (III) Time and date for Withdrawal | 02.00 pm to 04.00 pm | |
| | (IV) Display of list of contesting candidate | 05.00 pm | |
| 2 | Meeting of Newly Constituted Board & Publication of List for valid Nominations, Polling (if required) | 22/09/2026 (Tuesday) 11.00 a.m. Onwards | Office of the Returning Officer, **(Add :-Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001)**. |
| 3 | Declaration of Result of Election of | On or before 28/09/2026 at 11.00 am. | Office of the Returning Officer(As above). |

**NOTES :-**

1. A copy of Voters list will be supplied by the society to any Regular member on payment of such fee as may be specified by the Board of Directors of the society.
2. The Nomination Forms duly completed as prescribed therein shall be presented in person by the candidate or through any person authorized by him/her, at the registered office of the bank, **Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai-400025**, so as to reach him not later than 03.00 p.m. on 21/08/2026. Nomination forms received thereafter shall not be accepted.
3. As per Bye Laws No.55A, Candidates contesting for directorship shall hold fifty fully paid shares on the last date of nomination and should have been a member for a minimum period of twelve months immediately preceding the date of such election or appointment. The contesting candidate should have an operative savings/current/term deposit account of Rs. 50,000/- in the Bank for a minimum period of twelve months continuously prior to the date of nomination and shall continue till he/she remains a Director of the Board. A member who is indebted to the Society as a borrower, except by way of advance against his deposits with the Bank, shall not be eligible for election on the Board.
4. As per bye laws No.55B of the bank "A candidate who wishes to contest the election to the Board of Directors of the Bank is required to deposit Rs.25000/- as security deposit at the time of filing the nomination.Provided that if a candidate withdraws his nomination or if his nomination is rejected, the deposit will be refunded within 15 days of his withdrawal/rejection. The deposit shall be forfeited, if at an election where a poll has been taken,the candidate is not elected and the number of valid votes polled by him does not exceed one-tenth of the total number of valid votes polled by all the candidates or, in the case of election of more than one member at the election one-tenth of the number of valid votes so polled divided by the number of members to be Selected. In other cases Security Deposit will be returned."
5. A Regular member who gets disqualified under any of the provisions specified in Section 43 and 44 of the Multi State Co-operative Societies Act, 2002 and/ or Byelaw No.55A of the Society, shall not be eligible for being nominated for a seat on the Board.
6. After the close of the poll, the ballot boxes used for poll shall be sealed at respective polling centers and the same shall be brought to place of counting.
7. Any changes mentioned above will be conveyed by publishing the same on Society's website and/or by publishing in the newspapers.
8. A Company, Partnership firm or any other Body Corporate constituted under any law, which is a shareholder of the Bank, may appoint any of its Directors/ Partners/ Officers to vote on its behalf. There resolution / letter of such appointment must be produced by the authorized person intending to vote on behalf of such company / any other body Corporate/ firm alongwith Polling Notice and identification of the person.
9. The candidate filing Nomination form under the category of reserve seats for Scheduled Caste & Scheduled Tribe should attach copy of caste certificate duly attested by self, with his/her nomination form.
10. Withdrawal of Nomination (if any), shall be made by a notice in writing and submit in person by the Candidate or by person authorised on his/her behalf as per election programme. A notice of withdrawal of nomination once given shall be irrevocable.
11. Place of polling stations (If election contested) will be declared later. Voters are advised to bring any one of their own original Photo Identity Card issued by Government Authorities like Passport, Driving License, Voter card issued by the Election Commission, Aadhaar Card & PAN Card during voting to prove their identity if called upon by the Officer on Election Duty.

**Place : Mumbai**
**Date : 23 / 07/2026**

SEAL

**(Aanchal Goyal)**
**Returning Officer &**
**Collector & District Magistrate,**
**Mumbai City.**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### महिला दुहेरी प्रकारात भारताचा माल्टावर विजय

**ग्लासगो :** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेची विजयी सुरुवात करताना, भारताने 'बोल्स' महिला दुहेरी प्रकारात माल्टाचा पराभव केला.



गुरुवारी झालेल्या या सामन्यात, 'बोल्स' महिला दुहेरी प्रकारात भारताने माल्टावर रोमांचक 'टाय-ब्रेकर'मध्ये विजय मिळवून स्पर्धेची विजयी सुरुवात केली. रूपा राणी तिर्की (लीड) आणि पिंकी (स्किप) या भारतीय जोडीने पहिला सेट ७-१ असा जिंकला, परंतु दुसरा सेट ३-४ असा गमावला; त्यामुळे 'सेक्शन बी'मधील पहिल्या फेरीचा हा सामना 'टाय-ब्रेकर'पर्यंत गेला. भारतीय खेळाडूंनी संयम राखत 'टाय-ब्रेकर'मध्ये विजय मिळवला आणि पिंकीने आपल्या शेवटच्या 'बोल'द्वारे (चेंडूद्वारे) विजयावर शिक्कामोर्तब केले.

### महिला व्हीलचेअर बास्केटबॉल संघाचे पदकाचे लक्ष्य

**ग्लासगो :** येथे गुरुवारपासून सुरू होणाऱ्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील ३x३ व्हीलचेअर बास्केटबॉल प्रकारात भाग घेणाऱ्या भारतीय संघातील चार खेळाडूंमध्ये महाराष्ट्राची मीनाक्षी जाधव आणि मणिपूरची रितू चानू यांचा समावेश आहे. संघातील इतर दोन सदस्य महाराष्ट्राची रीना गुप्ता आणि कर्नाटकची लक्ष्मी रयन्नवर आहेत. या संघाचे देशासाठी पदक जिंकणे, हेच लक्ष्य आहे. बर्मिंगहॅम येथील २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच समाविष्ट करण्यात आलेल्या ३x३ व्हीलचेअर बास्केटबॉल प्रकारात, एका वेळी मैदानात तीन खेळाडू खेळतात. १० मिनिटांच्या या सामन्यादरम्यान एका खेळाडूला 'सबस्टिट्यूट' (पर्यायी खेळाडू) म्हणून वापरले जाते. थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या २०२५ च्या 'आयडब्ल्यूबीएफ' (आंतरराष्ट्रीय व्हीलचेअर बास्केटबॉल फेडरेशन) आशिया-ओशनिया चॅम्पियनशिप द्वारे भारतीय संघाने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. मी महाराष्ट्रातील एका गावातील एक सामान्य मुलगी होते. पण २०१२ मध्ये, वयाच्या २३ व्या वर्षी, मी झाडावरून पडले आणि माझ्या पाठीच्या कण्याला दुखापत झाली, असे संघाची कर्णधार मीनाक्षीने सांगितले.

# भारताचा झिम्बाब्वेवर विजय

## वैभव सूर्यवंशी सर्वात तरुण अर्धशतकवीर, भारताची पराभवाची मालिका खंडित

**हरारे, २३ जुलै**

वैभव सूर्यवंशीचे विक्रमी अर्धशतक आणि मयंक यादव व प्रिन्स यादवच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारताने झिम्बाब्वेरुद्धच्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात झिम्बाब्वेवर ४० चेंडू शिल्लक ठेवित ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. सूर्यवंशी, मयंकमुळे भारताची पराभवाची मालिका खंडित झाली. या विजयाबरोबरच भारताने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी मिळविली. १८ धावांत २ बळी टिपणारा मयंक यादव सामनावीर ठरला तसेच वैभव सूर्यवंशी सर्वात तरुण अर्धशतकवीर ठरला.भारताने टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद यशस्वीपणे राखल्यानंतर श्रेयस अय्यरने सूर्यकुमार यादवकडून कर्णधारपदाची धुरा स्वीकारली. मात्र, त्याच्या नेतृत्वाखालील सुरुवातीच्या काळातच संघाला आयर्लंडविरुद्ध २-० अशा मालिका पराभवाला आणि त्यानंतर इंग्लंडमध्ये ४-० अशा दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. सूर्यवंशी आणि मयांक यांच्यामुळे भारताची टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील पराभवाची मालिका खंडित झाली. मार्चमध्ये टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताने



वैभव सूर्यवंशीचे पहिले अर्धशतक



सामनावीर मयंक यादव

आपला पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना जिंकला.

झिम्बाब्वेविरुद्धच्या या टी-२० मालिकेच्या यशस्वी सुरुवातीदरम्यान, भारताचा युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी याने अवघ्या १८ चेंडूंत आपले पहिले आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले. या कामगिरीबरोबरच सूर्यवंशी सर्वात तरुण अर्धशतकवीर ठरला.

२०२६ च्या १९-वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ८० चेंडूंत १७५ धावांची खेळी करणाऱ्या सूर्यवंशीने पुन्हा एकदा त्याच मैदानावर चमकदार कामगिरी करत, विजयासाठी आवश्यक असलेल्या माफक धावसंख्येचा पाठलाग सहजपणे पूर्ण केला.

श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.भारताच्या अननुभवी गोलंदाजी आक्रमणासमोर झिम्बाब्वेला ७ बाद १२५ धावाच करता आल्या. मयंक यादव व प्रिन्स यादवने झिम्बाब्वेच्या फलंदाजीच्या अव्वल फळीला सुरुवातीलाच कोलमडून टाकले; त्यानंतर मधल्या आणि खालच्या फळीतील फलंदाजांनी काही प्रमाणात योगदान दिले.

मयंक व प्रिन्सने आपल्या प्रत्येकी चार षटकांच्या कोट्यात मिळून केवळ ३७ धावा दिल्या आणि प्रत्येकी २ बळी टिपलेत. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी प्रति षटक आठ किंवा त्यापेक्षा कमी धावा देण्याचा शिस्तबद्ध मारा केला.

लक्ष्याचा पाठलाग करताना तिसऱ्याच षटकांत सलामीवीर अभिषेक शर्मा एक धाव काढून बाद झाला, परंतु त्यानंतर वैभव सूर्यवंशी व ईशान किशनने दुसऱ्या गड्यासाठी ४५ धावांची भागीदारी करून डाव सावरला. रिचर्ड न्गारावाच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी वैभव सूर्यवंशीने अवघ्या १९ चेंडूंत प्रत्येकी ४ चौकार व षट्कारांसह ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. आपले पहिले टी-२० अर्धशतक झळकावताच त्याने टी-२० अर्धशतक झळकावणारा सर्वात तरूण क्रिकेटपटू ठरला. ईशान किशनने २४ चेंडूंत ३५ धावांचे योगदान दिले. श्रेयस अय्यर (नाबाद २८) व तिलक वर्माने (नाबाद ६) नाबाद खेळी करत भारताला १३.२ षटकांत ३ बाद १२६ धावा काढून विजय मिळवून दिला.

### अशोक शर्माचे टी-२० मध्ये पदार्पण

भारताकडून अशोक शर्माने पदार्पण केले. झिम्बाब्वेने फलंदाज बेन करन आणि डावखुरा वेगवान गोलंदाज न्यूमन न्यामहूरीला पदार्पणाची संधी दिली.अशोक शर्मा हा राजस्थानचा आहेत. जयपूरजवळील एका गावात जन्मलेल्या या २४ वर्षीय वेगवान गोलंदाजाने गुजरातला जाण्यापूर्वी देशांतर्गत स्पर्धांमध्ये राजस्थान क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले होते. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय युवा संघाने कसोटी मालिका जिंकली

## दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेवर २११ धावांनी विजय




कसोटी मालिकेच्या विजेतेपदाच्या चषकासह भारताचे युवा क्रिकेटपटू

**कोलंबो, २३ जुलै**

रोहित यादवने घेतलेल्या चार बळींच्या जोरावर भारताने श्रीलंकेच्या तळाच्या फळीतील फलंदाजांचा प्रतिकार मोडून काढला आणि आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या 'युवा कसोटी' (कनिष्ठ गटातील कसोटी) क्रिकेट सामन्यात २११ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयासह भारतीय युवा संघाने दोन सामन्यांची कसोटी मालिका १-० अशी जिंकली. पहिला कसोटी सामना अनिर्णीत राहिला होता.

सामन्याच्या चौथ्या आणि अंतिम दिवशी भारताला विजयासाठी सहा बळींची आवश्यकता होती. सकाळच्या सत्रात यश मिळविण्यासाठी भारताला १८ षटकांची वाट पाहावी लागली, कारण विमथ दिनसारा व कविजाने पाचव्या गड्यासाठी चिवट भागीदारी करत २६.३ षटकांत ४० धावा जोडल्या. अखेरीस लेग-स्पिनर यादवने ही भागीदारी तोडली आणि श्रीलंकेचा कर्णधार दिनसाराला (१२९ चेंडूंत ६४ धावा) बाद केले.

उर्वरित पाच बळी मिळविण्यासाठी भारताला फारसा संघर्ष करावा लागला नाही; हे बळी पुढील २३.१ षटकांच्या कालावधीत पडले. यादवने यापैकी तीन बळी घेतले, यात गमागेचा (१५२ चेंडूंत ३६ धावा) समावेश होता; गमागेची ही खेळी श्रीलंकेच्या डावातील सर्वात दीर्घकाळ चाललेली खेळी ठरली.

सामना संपत आला असताना सेठमिका सेनेविरात्नेने आक्रमक फटकेबाजी केली; त्याने सहा चौकार आणि एक षट्कार हाणला आणि अखेरीस ४९ चेंडूंत ४२ धावा करून बाद होणारा तो शेवटचा फलंदाज ठरला. ◂ (वृत्तसंस्था)

# महिला मुष्टियोद्धे पदके जिंकणार

### मोहम्मद अली कमर यांना विश्वास

**नवी दिल्ली, २३ जुलै**

ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी देशाने आतापर्यंतचा सर्वोत्तम महिला संघ पाठविला आहे व त्यातील सातही खेळाडू पदक जिंकून परतण्यास सक्षम आहेत, असा विश्वास भारताचे दिग्गज बॉक्सर आणि माजी प्रशिक्षक मोहम्मद अली कमर यांनी व्यक्त केला.

खूप काही गोष्टी महिला खेळाडूंना मिळणाऱ्या सामन्यांच्या वेळापत्रकावर अवलंबून असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारताने १४ सदस्यांचा संघ निवडला असून यात सात पुरुष आणि सात महिलांचा समावेश आहे. राष्ट्रकुल स्पर्धेतील मुष्टियुद्ध स्पर्धा शुक्रवारी सुरू होणार आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मुष्टियुद्धामध्ये भारताने नेहमीच पदके

ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धा



जिंकली आहेत. यावेळीही जे खेळाडू सहभागी होत आहेत, ते अत्यंत अनुभवी आहेत. त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये पदके जिंकली आहेत. त्यामुळे राष्ट्रकुल स्पर्धेत भारताची कामगिरी चांगली होईल, असा विश्वास अली यांनी व्यक्त केला. अली हे टोकियो ऑलिम्पिकसह जवळपास सहा वर्षे महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक होते.

२००२ च्या मॅन्चेस्टर क्रीडा स्पर्धेत 'लाइट फ्लायवेट' गटात विजेता होऊन राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारे कमर हे पहिले भारतीय मुष्टियोद्धा होते. त्यानंतर नाकाला झालेल्या दुखापतीमुळे त्यांची कारकीर्द अकाली संपली; प्रशिक्षक होण्यापूर्वी त्यांनी राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य म्हणूनही काम केले होते. ते आता महिलांच्या प्रशिक्षक पथकाचा भाग नाहीत.

टोकियो ऑलिम्पिकसाठी मी ज्या अनेक बॉक्सरना तयार केले होते, त्यातील जैस्मिन लंबोरिया (५७ किलो) व लवलिना बोरगोहेन (७५ किलो) यांसारख्या खेळाडू या राष्ट्रकुल स्पर्धेत जात आहेत. आम्ही अरुंधती चौधरी (७० किलो) हिची सराव जोडीदार म्हणून निवड केली होती. प्रिया (६० किलो) ही युवा गटातून वरिष्ठ गटात आली आहे, पण आता ती चांगली कामगिरी करत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# वोझिन्हाला मिळाले कष्टाचे फळ

## फिफा विश्वचषकाच्या ड्रीम टीममध्ये स्थान

**झुरिच, २३ जुलै**

केप वर्देचा गोलरक्षक वोझिन्हाला फिफा विश्वचषतकात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे फळ मिळाले आहे. वोझिन्हा आणि नॉर्वेचा आक्रमक खेळाडू अर्लिंग हालंड यांची चाहत्यांनी मतदान केलेल्या फिफा विश्वचषक ड्रीम टीममध्ये निवड झाली असून, दोघांनाही त्यांच्या संघांच्या अनपेक्षित विजयाच्या मालिकेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कृत करण्यात आले आहे. या दोघांसोबत किलियन एमबाप्पे, लिओनेल मेस्सी आणि ज्यूड बेलिंगहॅम यांसारखे स्टार खेळाडू संघात आहेत.

विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या केप वर्दे संघासाठी एकापाठोपाठ एक प्रभावी कामगिरी केल्यानंतर, वोझिन्हा ३९.६ टक्के मतांसह गोलरक्षकांच्या यादीत अव्वल ठरला. फिफाच्या तांत्रिक



केप वर्देचा गोलरक्षक व्होझिन्हा

गटाद्वारे निवडला जाणारा गोल्डन ग्लोव्ह स्पेनच्या उनाई सायमनने जिंकला असूनही हे घडले.

स्पर्धेपूर्वी पोर्तुगीज सेकंड-टियर संघ चावेस सोडल्यानंतर क्लबविना असलेल्या या ४० वर्षीय खेळाडूने, केप वर्देने अंतिम विजेते स्पेनला गोलशून्य बरोबरीत रोखताना सात बचाव केले.

त्याने अंतिम फेरीत पोहोचलेल्या अर्जेंटिनाला शेवटच्या ३२ संघांच्या फेरीत अतिरिक्त वेळेपर्यंत पोहोचण्यासही मदत केली. नॉर्वेला त्यांच्या पहिल्या विश्वचषक उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवल्यानंतर हॉलंडने २७.५ टक्के फॉरवर्ड मते मिळविली.

मॅन्चेस्टर सिटीच्या या आक्रमक खेळाडूने पाच सामन्यांमध्ये सात गोल केले, यात नॉर्वेने अंतिम १६ संघांच्या फेरीत पाच वेळच्या विजेत्या ब्राझीलला २-१ ने हरवताना केलेल्या दोन गोलांचा समावेश आहे, पण इंग्लंडविरुद्ध त्यांचा प्रवास तिथेच संपला.

**फिफा विश्वचषक २०२६ ड्रीम इलेव्हन :** गोलरक्षक : वोझिन्हा (केप वर्दे). बचावपटू : पेड्रो पोरो (स्पेन), लिसँड्रो मार्टिनेझ (अर्जेंटिना), दायोत उपमेकानो (फ्रान्स), मार्क कुकुरेला (स्पेन). मधली फळी : रॉड्री (स्पेन), मायकल ओलिसे (फ्रान्स), ज्यूड बेलिंगहॅम (इंग्लंड). आक्रमक फळी : लिओनेल मेस्सी (अर्जेंटिना), एर्लिंग हॉलंड (नॉर्वे), किलियन एमबाप्पे (फ्रान्स). ◂ (वृत्तसंस्था)




# ज्ञानासोबत खेळाचीही गरज आहे

## जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे

**सोलापूर, दि. २३ जुलै -**

दयानंद शिक्षण संस्थेत हँडबॉल दिनाचा कार्यक्रम थाटात पार पडला. श्री प्रकाश मोहारे सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तसेच श्री नदीम शेख क्रीडा अधिकारी,सोलापूर यांच्या हस्ते हँडबॉल दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानिक प्रशासक डॉ.विजयकुमार उबाळे प्राचार्य डॉ. बी.एच.दमजी, प्राचार्य डॉ. एस.बी क्षीरसागर, प्राचार्य शिंदे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, पर्यवेक्षका सुनिता गवळी, डॉ.किरण चोकाकर, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्रमोद कुनगुलवार यांनी करून दिले तर सूत्रसंचालन नवनाथ हराळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी दयानंद हँडबॉल परिवारातील सर्व खेळाडूंनी परिश्रम घेतले.

# सोलापूरच्या यश बोरामणी व समर्थ दोरनाल यांची महाराष्ट्र संभाव्य क्रिकेट संघात निवड

**सोलापूर, दि. २३ जुलै -**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या वयोगटानुसार संभाव्य महाराष्ट्र संघात सोलापूरच्या यश बोरामणी व समर्थ दोरनाल यांनी आपल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर स्थान मिळवले आहे. यश याची २३ वर्षाखालील संभाव्य संघात, तर समर्थची १९ वर्षाखालील संभाव्य संघात निवड झाली आहे.





यश याने यापूर्वी -१४ व -१६ मध्ये महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले आहे. २०२२ मधील -१९ कूच बिहार व विनू मांकड ट्रफीमध्ये त्याने २ शतके आणि २१ विकेट्स घेतल्या होत्या. अलीकडील ओपन इनव्हिटेशन टूर्नामेंटमध्ये ४८७ धावा (२ शतके, २ अर्धशतके) आणि १२ विकेट्स अशी कामगिरी केली असून, सध्या तो सोलापूर वरिष्ठ संघाचे नेतृत्व करत आहे.

दुसऱ्या बाजूला, समर्थने विविध वयोगटातील स्पर्धांमध्ये अष्टपैलू खेळ करत आपले स्थान निश्चित केले आहे. २०२५-२६ च्या १९ वर्षाखालील आमंत्रितांच्या स्पर्धेत त्याने ८ डावांत २६० धावा आणि २८ बळी टिपले. तसेच २०२४-२५ च्या खुल्या वर्गातील स्पर्धेत १०९ धावा व ७ बळी, तर २०२३ च्या १६ वर्षाखालील स्पर्धेत २०९ धावा व २१ बळी अशी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या दोन्ही खेळाडूंचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष दिलीप माने, संयुक्त सचिव खासदार धैर्यशील मोहिते पाटील व चंद्रकांत रेम्बर्सो यांनी अभिनंदन केले.



# सिंधूचा चेन युफेईकडून पराभव

**चांगझू, २३ जुलै:**

चीनच्या चेन युफेईने गुरुवारी शानदार पुनरागमन करीत भारताच्या पी. व्ही. सिंधूचा १६-२१, २२-२०, २१-१८ असा पराभव केला आणि चायना ओपन २०२६ बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

दुसऱ्या गेममध्ये सिंधूकडे चार 'मॅच पॉइंट्स' होते, परंतु चेनने जोरदार मुसंडी मारत सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. अंतिम गेममध्ये सुरुवातीला भारतीय खेळाडूचे वर्चस्व होते, मात्र शेवटी चेनने वेगवान खेळ करीत सामना आपल्या नावे केला. २०२० ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या चेनचा उपांत्यपूर्व फेरीत रचानोक इंतानोन व गुयेन थुय लिन्ह यांच्यातील विजेत्याशी सामना होईल.

भारताचा युवा खेळाडू आयुष शेट्टीचे आव्हानही 'अंतिम सोळा'मध्येच संपुष्टात आले; त्याने पहिला गेम जिंकून आघाडी घेतली होती, तरीही त्याला आयर्लंडच्या न्हात गुयेनकडून २१-१५, १३-२१, २०-२२ असा पराभव स्वीकारावा लागला. दुसरा गेम गमावल्यानंतर जागतिक क्रमवारीतील २८ व्या स्थानावर असलेल्या शेट्टीने निर्णायक गेममध्ये १९-१५ अशी आघाडी घेऊन सावरल्याचे संकेत दिले होते, परंतु त्या स्थितीतून त्याला प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविता आला नाही.

त्यानंतर लक्ष्य सेनचा कॅनडाच्या व्हिक्टर लाईकडून १९-२१, ११-२१ असा पराभव झाल्याने या स्पर्धेतील भारताचे आव्हान पूर्णपणे संपुष्टात आले. तत्पूर्वी, चौथ्या मानांकित चेनने सुरुवातीच्या गेममध्ये १२-६ अशी आघाडी घेत सामन्यावर वर्चस्व गाजवले होते. मात्र, सिंधूने सामन्यात पुनरागमन करत १६-१६ अशी बरोबरी साधली आणि त्यानंतर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पहिला गेम २१-१६ असा जिंकला. भारतीय खेळाडूने सामन्यावरील आपले नियंत्रण कायम ठेवले होते आणि दुसऱ्या गेममध्ये २०-१७ अशा स्थितीत चार 'मॅच पॉइंट्स' मिळवून सामना जिंकण्याची संधीही निर्माण केली होती.

# डॉ.कराड यांचे लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य

### श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेचे उद्घाटन

## हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांचे विचार

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. २३ जुलै-**

लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले आहे. त्यांनी शक्तिची पूजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, त्यांच्यामुळे वाखरी फुलली आहे. ''असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या ''श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.



विश्वनाथ दा.कराड यांच्या आशीर्वादाने व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, नजरुद्दीन नायकवडी आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर, ह भ प तुळशीराम दा कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. हनुमंत तुळशीराम कराड, राष्ट्रीय कुस्तीगीर महेश वरूटे, सुरजीत सिंग, श्रीकांत देशमुख, सामाजिक कार्यकर्ता सालगुडे पाटील, कदम पाटील, सरकार निंबाळकर, कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, भीमराव आदलिंग, शिवाजीराव काळे, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारकरी संप्रदाय परंपरा ७५० वर्ष जुनी आहे. या परंपरेचे पाईक विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांनी समाज घडविण्यासाठी विश्वशांती केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून सर्व संतांची शिकवण पुढे चालू ठेवली आहे. यातून आत्मचिंतनाची दिशा दाखवली आहे. वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. याच कार्याचा भाग म्हणजे ही कुस्ती स्पर्धा आहे.

श्रीकांत देशमुख म्हणाले, संस्कृती आणि परंपरा टिकवणारी ही प्रथा पुढे चालवत डॉ. विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात कुस्तीचे आयोजन केले. वारकरी हा काटक आहे. डॉ. कराड यांच्या कार्यासमोर सर्व पुरस्कार नगण्य असून त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक व कुस्ती स्पर्धांचे नियोजन केले.बाबा निम्हण यांनी धावते समालोचन केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘उजनी’त ३२,९५० क्युसेकने आवक; उपयुक्त पाणीसाठा ५६.९४ टक्क्यांवर



## सिंचनासाठी कालव्यातून २ हजार क्युसेक विसर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ जुलै -**

भीमा तसेच कृष्णा नदीच्या खोऱ्यातील पर्जन्य क्षेत्रात संततधार पाऊस सुरु आहे. गेल्या दोन दिवसांपासून उजनी धरणात पाण्याच्या आवकेत लक्षणीय वाढ झाली आहे. गुरुवारी संध्याकाळी ६ वाजता उजनीत ३२,९५० क्युसेक वेगाने पाणी येत असून धरणातील उपयुक्त पाणीसाठा ५६.९४ टक्क्यांवर पोचला आहे.

गुरुवार (२३ जुलै) रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या धरण प्रशासनाच्या अहवालानुसार, उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा ८६३.९६ दशलक्ष घनमीटर (३०.५१ टीएमसी) इतका झाला आहे. तो धरणाच्या उपयुक्त क्षमतेच्या ५६.९४ टक्के आहे. धरणातील एकूण पाणीसाठा २६६६.७७ दशलक्ष घनमीटर (९४.१७ टीएमसी) इतका नोंदवला आहे. धरणाची जलपातळी ४९४.७०० मीटर असून, जलपृष्ठ विस्तार २७८.९९ चौरस किलोमीटर इतका झाला आहे.

दौंड येथील नदी मापन केंद्रावर नदीची पातळी ५००.१७० मीटर इतकी असून, तेथून उजनी धरणात ३२,९५० क्युसेक वेगाने पाणी दाखल होत आहे. कालच्या तुलनेत धरणातील आवकेत मोठी वाढ झाल्याने पुढील काही दिवस पाणीसाठ्यात आणखी वाढ होणार आहे.

धरणातून सध्या मुख्य कालव्यातून २,००० क्युसेक पाणी खरीप हंगामातील सिंचनासाठी सोडण्यात येत आहे. त्याचबरोबर वीजनिर्मिती केंद्रातून १,६०० क्युसेक, भिमा-सीना बोगद्यातून ९०० क्युसेक, सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी २८० क्युसेक आणि दहीगाव उपसा सिंचन योजनेसाठी ९० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. विशेष म्हणजे सांडव्यातून तसेच नदी स्लुईसमधून कोणताही विसर्ग सुरू नसल्याने धरणातील अतिरिक्त पाणी नदीपात्रात सोडले जात नाही. जुलै महिन्यात भीमा खोऱ्यात सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे उजनी धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांसाठी आवश्यक सिंचन, पिण्याच्या पाण्याचा साठा आणि औद्योगिक वापरासाठीची उपलब्धता अधिक बळकट होत आहे. मुख्य कालव्यातून सुरू असलेल्या पाण्यामुळे सोलापूर, पुणे आणि उजनीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ऊस, सोयाबीन, मका, भाजीपाला व इतर खरीप पिकांना त्याचा लाभ होणार आहे.

दरम्यान, भीमा नदीच्या वरच्या भागात पावसाचा जोर कायम राहिल्यास उजनी धरणातील आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. परिस्थितीनुसार धरण प्रशासनाकडून पाणीविसर्गाचे नियोजन केले जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून दिली आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तारण गोदामात चोरी

## ४० हजारांहून अधिक किमतीच्या शेतमालाची चोरी; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२३ जुलै -**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील शेतमाल तारण योजना गोदामात अज्ञात चोरट्याने खिडकीची जाळी व काच फोडून शेतमालाची चोरी केली. घटनेत ४० हजार ७२५ रुपयांची तूर व ज्वारी चोरीला गेल्याची तक्रार बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

श्रीशल्य घाणेगावकर (वय ५५, रा. कासारवाडी रोड, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. ते गेल्या २५ वर्षांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी येथे पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. २० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता त्यांनी सहकाऱ्यांसह मुख्य बाजार आवारातील गट क्रमांक १९५ मधील शेतमाल तारण योजना गोदाम बंद केले होते. त्यावेळी गोदामातील सर्व शेतमाल सुरक्षित व व्यवस्थित होता. दि. २२ जुलै रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास गोदाम उघडून पाहणी केली असता, गोदामातील पाच कट्टे पांढरी तूर आणि तीन कट्टे ज्वारी, असे एकूण आठ कट्टे शेतमाल गायब झाल्यसचे दिसले. गोदामाच्या एका खिडकीची जाळी व काच फोडल्याचे आढळून आल्याने चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

चोरीस गेलेल्या मालामध्ये ३० हजार किमतीची पाच कट्टे पांढरी तूर आणि १० हजार ७२५ किमतीचे तीन कट्टे ज्वारी, असा एकूण ४० हजार ७२५ रुपयांचा शेतमाल आहे.

## माझ्याकडे का बघतोस? म्हणत तरुणाला बेदम मारहाण; ८ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै -**

मित्रासह दुचाकीवरून घराकडे निघालेल्या एका तरुणाला तू माझ्याकडे का बघतोस? अशी कुरापत काढून लोखंडी पाईप, लाथाबुक्यांनी आणि दगडाने जीवघेणा हल्ला करण्यात आला. ही घटना सोरेगाव येथील व्ही.व्ही.पी कॉलेजसमोर १८ जुलै रोजी दुपारी घडली. दरम्यान याप्रकरणी आठ जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

संदेश हरिदास जमादार (रा. ४२, स्वामी विवेकानंद नगर, सैफुल, सोलापूर) यांनी फिर्यादी दिली आहे. ऋषी जाधव (रा. मुळेगाव तांडा, सोलापूर), यश वाकसे व इतर ६ साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. संदेश जमादार हे १८ जुलै रोजी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास सोरेगाव येथील व्ही.व्ही.पी. कॉलेजमधील पेपर संपवून मित्र सुरज हजारी याच्यासह दुचाकीवरून जात होते. कॉलेजच्या गेटसमोर आले असता, ऋषी जाधवने त्यांची दुचाकी अडवली. ‘तू माझ्याकडे का बघतोस?‘ असे म्हणत फिर्यादीची गच्ची पकडली आणि त्यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळ केली. तसेच जीवे मरण्याची धमकी देत यश वाकसे व इतर ६ जणांनी मिळून फिर्यादीला मारहाण सुरू केली. या हल्ल्यादरम्यान जमावातील एकाने फिर्यादीच्या दिशेने दगड फेकून मारला, तर दुसऱ्याने लोखंडी पाईपने फिर्यादीच्या डाव्या बरगडीवर जोरात प्रहार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास फौजदार काजळे करत आहेत.

## महत्वाचे...

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीला अपघात; युवक जखमी

**सोलापूर,दि. २३ जुलै-**

दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत असताना अचानक कुत्रा आडवा आल्याने खाली कोसळून मुलगा जखमी झाला. हा अपघात अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगरात आज गुरुवारी दुपारच्या सुमारास घडला. फिरोज नदाफ (वय १६ रा. मल्लिकार्जुन नगर) असे जखमी मुलाचे नाव आहे. तो दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत होता. त्याला उपचारासाठी वडिलांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

---

### शेतातून लाईट घेतल्याची विचारणा केल्याने मारहाण

**सोलापूर,दि. २३ जुलै-**

तू आमच्या शेतातून लाईट का घेतली? अशी विचारणा केल्याने दगड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत भीमराव शेळके (वय ५५) हे जखमी झाले. ही घटना हराळवाडी (ता.मोहोळ) येथे आज गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्यांना प्रकाश ढगे आणि गिरीधर ढगे या दोघांनी मारहाण केली. त्यांना कामती येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात राहुल (मुलगा) याने दाखल केले.

---

### थांबलेल्या ट्रकला पाठीमागून दुचाकीची धडक; दोघे जखमी

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडकल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. हा अपघात अक्कलकोट मार्गावरील वळसंग टोलनाक्याजवळ बुधवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडला. अकबर अमीन पटेल (वय २४) आणि साहिल शेख (वय २५ दोघे रा.जेऊर, ता. अक्कलकोट) अशी जखमींची नावे आहेत. रात्री आठ वाजेच्या सुमारास ते दोघे दुचाकीवरून सोलापूर ते अक्कलकोटकडे निघाले होते. टोल नाक्याजवळ थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडकल्याने दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात ॲम्ब्युलन्समधून दाखल करण्यात आले.

---

### बोरामणी शिवारातील गटारीत अनोळखी इसमाचा कुजलेला मृतदेह

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

एका अनोळखी इसमाचा कुजलेला मृतदेह बोरामणी शिवारातील एका गटारीमध्ये बुधवारी सकाळी सात वाजता मिळून आला. विजय दास यांच्या शेतासमोरील बांधाजवळ गटारीतील चिलारीच्या आडोशाला एक अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह बुधवारी सकाळी स्थानिक लोकांना आढळून आला. मृतदेहाला मुंग्या लागल्या होत्या. ही खबर गावच्या पोलीस पाटील यांना समजली. त्यानंतर त्यांनी सोलापूर तालुका पोलिसांना ही खबर दिली. त्याप्रमाणे पोलीस हवालदार एम. आर. कटकधोंड यांनी घटनास्थळी पोहोचून शेतगड्याच्या मदतीने मृतदेह एका रुग्णवाहिकेतून शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी साडेदहा वाजता दाखल केला. मयत इसम हा सडपातळ, ४५ ते ५० वयोगटातील असून त्याने निळा रंगाचा टी-शर्ट आणि निळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट परिधान केलेली आहे. तरी मयत इसमाबाबत माहिती असणाऱ्यांनी पोलीस निरीक्षक कुंदन गावडे (मो .नं . ८८८८८०१७७७ ) यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले आहे.

## परवाना संपूनही औषधांची बेकायदा विक्री

### कंदलगावात एफडीएकडून १ लाखांचा औषध साठा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २३ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील एका मेडिकल स्टोअरवर अन्न व औषध प्रशासनाकडून छापा टाकण्यात आला. छाप्यात परवान्याविना औषधांची खरेदी करून त्याची साठवणूक करत विक्री केल्याचे तपासणीत उघड झाले आहे.

छाप्यादरम्यान दोन प्रकारच्या औषधांचे नमुनेही तपासणीसाठी जप्त केले आहेत. एफडीए विभागाला प्राप्त झालेल्या माहितीनुसार जय लक्ष्मी मेडिकल अँड जनरल स्टोअर्स या औषध विक्री केंद्रातून १ लाख १३ हजार ८०० रुपयांचा ॲलोपॅथिक औषधसाठा जप्त करण्यात आला. तपासणी दरम्यान संबंधित औषध विक्री केंद्राच्या औषध विक्रीच्या परवान्याची मुदत १९ मार्च २०२५ रोजी संपुष्टात आल्यानंतर संबंधितांकडून त्याचे नूतनीकरण केली नसल्याची बाब उघड झाली. संबंधित व्यावसायिकाकडून परवान्याविना ॲलोपॅथिक औषधांची खरेदी करून त्याची साठवणूक व विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले. सदर बाब औषध व सौंदर्यप्रसाधने कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन मानून एफडीएने संपूर्ण औषधसाठा जप्त केला.

कारवाई दरम्यान पुढील तपासासाठी दोन औषधांचे नमुने घेण्यात आले आहेत. त्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाणार आहे. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. एफआयआर दाखल करण्याबाबतची कार्यवाहीही सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही कारवाई सहाय्यक आयुक्त (औषधे) अरुण गोडसे यांनी केली. कारवाईला पुणेचे संयुक्त आयुक्त (औषधे) गिरीश हुकारे यांचे मार्गदर्शन लाभले.

## पंचशील नगरात तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

अज्ञात कारणावरून तरुणाने घरातील लाकडी वाशाला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुमठा नाका परिसरात पंचशील नगरात गुरुवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली. शिवकुमार ठोंबरे (वय २३, रा.५०५/बी पंचशील नगर, कुमठा नाका, सोलापूर ) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. आज गुरुवारी सकाळी शिवकुमार याने घरातील देव घरामध्ये गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले . नातेवाईकांच्या साह्याने शिवकुमार यास गळफास सोडवून खाली उतरविले . दरम्यान हि खबर समजताच सदर बझार पोलिस ठाण्याच्या महिला पोलीस हवालदार एस एस चव्हाण यांनी घटनास्थळी पोहोचून शिवकुमार यास येथील शासकीय रुग्णालयात दुपारी साडेबारा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# धम्मयात्रेचे अकलूजमध्ये स्वागत




**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जुलै-**

परम पूजनीय भंते ज्ञानज्योती महास्थवीर व भिक्खू संघ यांच्या (ताडोबा अभयारण्य चंद्रपूर) यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक क्रांती अभियाना अंतर्गत भिमा कोरेगांव ते पंढरपूर पदयात्रेचे अकलूजमध्ये स्वागत करण्यात आले.यावेळी अकलुजच्या सारनाथ बुध्द विहारात दिर्डी मुक्काम राहील्यानंतर भंत्ते ज्ञानज्योती यांचे प्रवचन झाले.

आषाढी एकादशी निमित्त सर्व संताच्या पालख्या पंढरपूरकडे वाटचाल करीत आहे.याच दरम्यान सामाजिक क्रांतीचे अभियान हाती घेतलेले भंते जी भदंत ज्ञानज्योती महास्थवीर यांच्या नेतृत्वाखाली १२ जुलैला भीमाकोरेगाव हुन पायी निघालेली धम्मयात्रेचे अकलूज शहरात आगमन झाले. यावेळी गांधी चौक येथे नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, नगरसेविका मनिषा तिकोटे, प्रियंका गायकवाड यांच्यासह सारनाथ बुध्द विहाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. तदनंतर पदयात्रा अकलूज शहरातुन सारनाथ बुध्द विहारात पोहचल्यानंतर बुध्द वंदना होवून भंत्ते ज्ञानज्योती यांचे प्रवचन झाले. यावेळी बोलताना भंत्ते ज्ञानज्योती म्हणाले पंढरपूरचा पांडुरंग हा बुध्द आहे तर विठ्ठल मंदिर हे प्राचिन बुध्द विहार आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठाम पणे सांगितले होते.ते सिध्द करण्यासाठी कामाच्या व्याप्तीमुळे बाबासाहेब आंबेडकरांना वेळ भेटला नाही, परंतु बाबासाहेंबाचं अपुर्ण काम पुर्ण करण्याचा प्रयत्न या पदयात्रेतून करत आहे.ही लढाई मंदिर मागण्यासाठी नाही तर प्राचिन इतिहास सिद्ध करण्यासाठी आहे, आम्ही सिद्ध करायला चाललो आहे असे ते म्हणाले. यावेळी पदयात्रेतील सर्व भंत्ते यांना बौध्द उपासकांनी फळे व मिठाई दान केली. सोमवारी धम्मयात्रेचा सारनाथ विहारात मुक्काम झाला व त्यानंतर खंडाळी वेळापूर येथे विसावा घेत पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.

# आषाढीनिमित्त पंढरपुरात एअर ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षिततेला प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाच्या वतीने पंढरपूर येथे अत्याधुनिक एअर ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ही सेवा जेटसर्व्ह एव्हिएशन, एअर रेस्क्यूअर्स ॲम्बुलन्स आणि विश्वराज एव्हिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यान्वित करण्यात आली असून, आपत्कालीन परिस्थितीत गंभीर रुग्णांना तातडीने उच्चस्तरीय वैद्यकीय उपचारासाठी स्थलांतरित करण्याची सुविधा या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे.




एअर ॲम्बुलन्स हेलिकॉप्टर पंढरपूर येथे दाखल होताच वैमानिक, वैद्यकीय पथक आणि ऑपरेशनल टीमचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी डॉ. भगवान पवार, डॉ. अमोल भोर, डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. राखी माने , विवेक कुमार पांडे, डॉ. संजय मिश्रा, विश्वराज चाकोते उपस्थित होते.

# सिन्नुर गावाजवळ ट्रकला अपघात; चालक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

धावत्या ट्रकला अपघात झाल्याने एका ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सायंकाळी सात वाजता अक्कलकोट-अफजलपूर मार्गावर सिन्नुर गावाजवळ घडली.

रवी सुधाकर गवळी ( वय ३८, रा. अहिल्यानगर,मुळेगाव सोलापूर) असे मयत ट्रकचालकाचे नाव आहे. तो बुधवारी सायंकाळी सात वाजता अफजलपुरकडून अक्कलकोट कडे एका ट्रकमधून येत होता. तेव्हा वाटेत सिन्नुर गावाजवळ ट्रकला अपघात झाला. यात गंभीर जखमी होऊन तो जागेवरच मयत झाला. दरम्यान नातेवाईक अनिकेत यांनी रवी गवळी यास येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री दाखल केले. तेव्हा डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयत रवी हा मित्राबरोबर फिरायला जातो असे सांगून घरात सांगून गेला होता. त्याच्या पक्षात आई, वडील, पत्नी व तीन मुली असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.




# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ७३८ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा बार्शी शहर व तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ७३८ बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले. बार्शी येथील भगवंत रक्तपेढीच्या माध्यमातून हे रक्त संकलन करण्यात आले.

आमदार राजाभाऊ राऊत व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड.रणवीर राजेंद्र राऊत यांनी स्वतः या शिबिरात रक्तदान केले. आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, एका बाटली रक्ताने तीन जीव वाचू शकतात. आज ७३८ बाटल्या रक्त संकलन झाले म्हणजे आपण किमान २००० पेक्षा जास्त गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. रक्तदान हीच खरी समाजसेवा आहे.

भगवंत रक्तपेढीच्या सहकार्याने हे शक्य झाले. यापुढेही असे उपक्रम आम्ही राबवत राहू, असेही आमदार राजेंद्र राऊत म्हणाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा बार्शी शहर व तालुका पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भगवंत रक्तपेढी बार्शी, सिव्हील हॉस्पिटल रक्तपेढी सोलापूर, रामभाई शहा रक्तपेढी बार्शी, हेडगेवार रक्तपेढी सोलापूर येथील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बहुजनांचं, बहुआयामी नेतृत्व : दीपक दादा घोडके



अणदूर परिसरातील १८ पगड जातीना बरोबर घेऊन त्यांच्या जीवनात नवी पहाट निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे, भारतीय जनता पक्षाचे अणदूर शहर अध्यक्ष तथा धाराशिव जिल्हा ओबीसी सेल चे उपाध्यक्ष दीपक दादा घोडके यांचा आज वाढदिवस त्या निमित्त त्यांच्या जीवन कार्याचा थोडक्यात आढावा, आई वडील दोघेही शिक्षक त्या मुळे दादांवर खूप चांगले संस्कार त्यांनी केले, आपल्याजवळ जे काही आहे त्यातील काही भाग आपण समाज कार्यासाठी देऊ शकतो त्या शिवाय समाजातील गरिबी हटणार नाही, या उदात्त हेतूने त्यांचे सामाजिक कार्य चालू असते, दीपक दादा मित्र मंडळ च्या माध्यमातून त्यांनी व त्यांच्या मित्रांनी अनेक सामाजिक उपक्रम अणदूर मध्ये राबविले आहेत, धार्मिक कार्यात त्यांचा सतत सहभाग असतो श्रावण मास,धोंडेदान, पंढरपूर वारकरी सेवा असे अनेक धार्मिक कार्यक्रम त्यांनी घेतले आहेत, अन्नदान हा दादांचा आवडीचा विषय वर्षभरात वेगवेगळ्या कारणाने त्यांच्या घरी अन्नदान चालूच असते, भारतीय जनता पक्षाचे ते अत्यंत निष्ठावान कार्यकर्ते आहेत, आमदार राणा दादा यांचे ते कट्टर कार्यकर्ते असून,पक्ष जो काही आदेश देईल त्या आदेशाचे पालन ते करणारच, नुकतीच त्यांची धाराशिव जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चाच्या उपाध्यक्ष पदी पक्षाने निवड केली आहे.देव,धर्म,गुरु यांची सातत्याने सेवा करणे हा त्यांचा स्वभावगुण, कोणालाही मदतीचा हात देणे, पीडित, वंचित अडलेल्या माणसाला दादांनी कायम मदत केली, त्यांचे आपल्या धनगर समाजाविषयी विशेष प्रेम मेंढपाळांचे अनेक किचकट प्रश्न त्यांनी सोडवले आहेत, दादांचा मित्रपरिवार ही खूप मोठा त्यात गरिबापासून श्रीमंतापर्यंत सगळ्यांचा वावर त्यांच्या घरी असतो, त्याच बरोबर प्रसंग कितीही अवघड असला तरी त्याची उकल दादांकडे हमखास होते हे जनतेला चांगले माहित असल्याने अडले,नडले यांचा कायम दादांकडे गोतावळा असतो, गाव पातळीवरील निवडणुकीत दादांना खूप मोठे स्थान असून,भांडण,तंटे मिटविणे, समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी लीलया सोडवले आहेत, राजासारख मन मनासारखा राजा अशा या अणदूर रत्न असलेल्या चालत फिरतं न्यायालय असलेल्या नेतृत्वाचा वाढदिवस त्यांच्या हातून असेच सामाजिक कार्य घडो आई तुळजाभवानी,ग्रामदैवत श्री खंडोबा चरणी प्रार्थना आमच्या दीपक दादांना उदंड आयुष्य लाभो हीच भावना या प्रसंगी.

**-बालाजी कुलकर्णी,**
**अणदूर**

## निधन वृत्त...

### शोभा देवकते

**सोलापूर, दि. २३ जुलै-**



कल्याण नगर येथील शोभा दिगंबर देवकते (वय ६७) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. सांयकाळी त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रीय खो-खो खेळाडू प्रभाकर देवकते यांच्या त्या मातोश्री होत.

## महत्वाचे...



### २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या कायमबाबत लवकरच विशेष बोर्ड

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेतील २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव २० जुलै रोजी झालेल्या महापालिका सभागृहाच्या बैठकीत न आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची भेट घेऊन चर्चा केली. याबाबत लवकरच विशेष सभा घेण्यात येईल असे आश्वासन पदाधिकाऱ्यांनी दिले आहे, अशी माहिती युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी दिली. यावेळी सभागृह नेते व उपमहापौर यांनी आयुक्त आणि उपायुक्त यादव यांच्याशी चर्चा केली असता, संबंधित प्रस्ताव सभागृह सुरू असताना उशिरा सादर झाल्यामुळे तो त्या दिवसाच्या कामकाजात समाविष्ट होऊ शकला नसल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी लवकरच या विषयावर विशेष बोर्ड बोलावून प्रस्ताव मंजूर करण्यात येईल आणि त्यानंतर तो शासनाकडे पाठविण्यात येईल, असे आश्वासन महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी ट्रेड युनियनचे अध्यक्ष तथा कामगार नेते बापूसाहेब सदाफुले आणि पदाधिकाऱ्यांना दिले.याप्रसंगी ट्रेड युनियनचे मार्गदर्शक इकबाल तडकल, अरुण मेत्रे, धनाजी लोंढे, सुनील शिंदे, बिभीषण गायकवाड यांच्यासह बदली रोजंदारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चक्कर येऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

अचानक चक्कर येऊन रस्त्यावर पडल्याने एका ३७ वर्षीय तरुणाचा जागेवर मृत्यू झाल्याची घटना कन्ना चौक येथे घडली. गौरव प्रवीण शहा (रा.कन्ना चौक, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री कन्ना चौक येथील बाकळे दुकानाजवळ थांबला असताना चक्कर आल्याने पडून तो बेशुध्द झाला होता. याबाबतची खबर स्वप्निल जानगवळी यांनी जेलरोड पोलिसांना दिली. हवालदार एस.यु.माने यांनी घटनास्थळी दाखल होत गौरव शहा यास शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### तणनाशक पिलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

तणनाशक औषध पिलेल्या आगरखेड गावच्या व्यक्तीचा उपचारादरम्यान सोलापुरातील शासकीय रुग्णालयात गुरुवारी दुपारी दोन वाजता मृत्यू झाला. निंगप्पा सिध्दप्पा सावळे (वय-४२, रा.देवीगोठा, ता.अक्कलकोट मुळ रा.अगरखेड जि.विजापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. अज्ञात कारणावरुन त्यांनी बुधवारी सायंकाळी राहत्या घरी तणनाशक औषध पिले होते. याचा त्रास होऊ लागल्याने मुलगा नागेश सावळे यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला.

# घरंदाज लावणी, जात्यावरच्या ओव्या, भक्तीच्या रसाळ आविष्काराने अक्कलकोटकर भारावून गेले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ जुलै-**

फोक आख्यान हा सध्याच्या तरुण कलाकारांचा एक लोकप्रिय संच आहे, तो सध्या मराठी लोकसंगीताचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवत आहे. यामध्ये पारंपरिक वाद्ये, शाहिरी बाणा आणि लोककलेचा मेळ घालून अतिशय ऊर्जेने कथा सादर केल्या जातात. या चमूने आपल्या ठसकेबाज आवाजाने आणि सादरीकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला आहे. जुन्या लोककलांना त्यांनी आधुनिक काळाशी जोडून एक नवा 'थाट' दिला आहे. आख्यानांमध्ये संत, अवतारी पुरुष आणि देवदेवता यांची चरित्रे, पौराणिक कथांचा समावेश असतो. लोककलेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील इतिहास, शूरवीरांच्या गाथा, महाराष्ट्राच्या मातीतील भावना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम आख्यान करत आहे. या घरंदाज लावणी, जात्यावरच्या ओव्या आणि भक्तीचा रसाळ आविष्काराने अक्कलकोटकर भारावून गेले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. गुरुवारी सायंकाळी 'फोक आख्यान' या कार्यक्रमाने पाचवे पुष्प संपन्न झाले. प्रारंभी सोलापूर महापालिकेचे महापौर विनायक कोंड्याल, धनश्री विनायक कोंड्याल, आयुक्त सचिन ओंबासे, अस्मिता सचिन ओंबासे, प.पू. धनंजय पुजारी, शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, चंद्रशेखर रेड्डी, ओंकार पवार, नगरसेविका संगीता जाधव, मुकुंद पंडित, नीलकंठ बँकेचे अध्यक्ष धनराज नोगजा, बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर मानस झा, गिरीष कणेकर, योगेश अहंकारी, राजेंद्र लिंबीतोटे, सरपंच नितीन चव्हाण, निहार आडकर, समीर लोंढे, इम्तीजात कमिशनर, राहुल भंडारी, दामोदर देवसानी, डॉ. विनायक बुदले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

'फोक आख्यान' ही महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशात रुजलेली एक प्रभावी लोकसंगीत आणि कथाकथनाची परंपरा आहे. यामध्ये संगीत, कथन आणि नाट्यमय अभिव्यक्ती यांचा मिलाफ साधून शौर्य, भक्ती आणि ऐतिहासिक कथांचे राकट पण तल्लीन करणारे सादरीकरण संपन्न झाले. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, विश्वंभर पुजारी मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. सतीश पवार, राजू पवार, पानमंगरूळ, मोहित आंटद, अक्कलकोट, प्रेम नोगजा, सोलापूर यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, सरोजनी मोरे, स्वाती निकम, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, अक्षता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, तृप्ती बाबर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, संतोष भोसले, मनोज निकम, शरणप्पा पुजारी, अरविंद शिंदे, प्रवीण देशमुख, प्रा.शरणप्पा आचलेर, अतिश पवार, निखील पाटील, शिवराज स्वामी, रोहित खोबरे, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, ज्ञानेश्वर भोसले, सर्फराज शेख, कांत झिपरे, सिद्धेश्वर मोरे, बाबुराव कुलकर्णी, सायबण्णा जाधव, रोहित मोरे, बालाजी पाटील, संतोष फुलारी, श्रीशैल कुंभार, ओंकार पवार, किरण साठे, संकेत पवार, वैभव मोरे, ॲड. फहीम पिरजादे, विवेक जाधव, नितीन कोबन, स्वामीनाथ बाबर, योगेश पवार, राजाराम पवार, अभिषेक चव्हाण, निखील शिंदे, अमित कोळी, लक्ष्मण शिंदे, मुन्ना कोल्हे, दरेप्पा जकापुरे, शुभम सावंत, भूषण मोहरे, विनायक भोसले, गोविंदराव शिंदे, बाळासाहेब घाटगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, संतोष माने, असद फुलारी, रमेश हळसंगी, बसवराज क्यार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, समर्थ चव्हाण, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून शुभेच्छा

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापन दिन आणि श्री गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे समजून आनंद झाला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व त्यांच्या संलग्न संस्थांमार्फत सुरू असलेले समाजसेवेचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. गरीब, गरजू, भाविक आणि यात्रेकरूंना भोजन देण्याचे कार्य हे केवळ उदरभरण नव्हे, तर मानवसेवेचा आदर्श आहे. या कार्यामागील निःस्वार्थ सेवा, श्रद्धा, शिस्त आणि प्रभावी व्यवस्थापन यांमुळे ''स्वामी अन्नछत्र मंडळ'' हे राज्यातील सेवाभावी संस्थांसाठी आदर्शवत ठरले आहे. अन्नदानासोबतच शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि अध्यात्म या क्षेत्रांमधील मंडळाचे योगदान समाजाच्या सर्वांगीण विकासाला मोठा हातभार लावणारे आहे. समाजसेवेच्या मार्गावर निष्ठेने आणि सातत्याने कार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त, तसेच मंडळाच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

### धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाक्षेत्रास महत्व

दि.२६ जुलै रोजी रविवार पहाटे ५.३० ते ९.३० वा पर्यंत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''आरोग्य ते अध्यात्म'' हा प्रेरणादायी संदेश देणारी ही ''भक्ती रन'' स्पर्धा रविवार दि. २६ जुलै २०२६ रोजी अक्कलकोटच्या पावन भूमीत आयोजित करण्यात आली असून, शारीरिक तंदुरुस्ती, अध्यात्मिक उन्नती आणि भक्तीमय वातावरणाचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळणार आहे. 'अक्कलकोट १० भक्ती रन' या आगळ्यावेगळ्या मॅरेथॉन स्पर्धेच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन लिंकचे उद्घाटन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आले होते.

**आज कीर्तनसेवा -** शुक्रवार दि. २४ जुलै रोजी सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'किर्तन' राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचा कार्यक्रम होणार आहे.

### नियोजित महाप्रसाद गृहाच्या इमारतीचे सादरीकरण

नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सध्या गेल्या नोव्हेंबर-२०२४ पासून सदरचे काम प्रगतीपथावर आहे, येत्या २ वर्षात हे महाप्रसादगृह भक्तांच्या सेवेत असणार आहे. या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले.

### सादरकर्ते याप्रमाणे

दवंडी पुत्र - अभिजीत लोंढे, शुभम साळवी, सौरभ कापसे निर्मिती व्यवस्थापक : अमोल टापरे आणि शैलेश थोरात अधिकृत छायाचित्रकार : जयदीप इनामदार, दिवटा:- तेजस देवधर, साऊंड :- आदित्य करंबेळकर चित्रीकरण व प्रसारण व्यवस्थापक : सचिन पाटील कपडे पट:- तुकाराम कमठेवार रंग भूषाकार :-विशाल निघोल झिलकरि :- दीपक उकिरडे आणि विनायक उकिरडे (थेरवडि), रोहित डाके (मुंबई) सागर खवले, (जामखेड), लोक वाजंत्री मंडळ:- पृथ्वीराज देशमुख (आळंदी), अभिषेक नायबळ (आळंदी), ऋतुराज रास्ते (अकलूज), गौरव बत्तीसे (मालेगाव), नयन गतिर (नाशिक, इगतपुरी), विश्वजीत लोंढे (पिंपरी), अर्णव कोटकर,(सांगवी), मानस साखरपेकर (चिपळूण), कुंदन ठाकूर (मालेगाव),राजेंद्र साळुंके (चारकोप बोरिवली), लोक वाघ्या मुरळी मंडळ : ऋषीकेश रिकामे (नाशिक इंचुरगवळी), अनुजा देवरे (नाशिक), चंद्रकांत माने (शिरुर), ऋचा कुलकर्णी (अंबेजोगाई), आख्यान मुकादम :- रणजीत गुगळे (जामखेड) बांधणी, रचना आणि लमाण बंधु, ईश्वर अंधारे (जामखेड), मूळ संकल्पना आणि संगीत कारभारी हर्ष विजय व सहकारी. प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

# अतिसाराची लागण झालेल्या 'त्या' इमारतीत महापालिकेचे नव्हे तर खासगी बोअरचे पाणी

### उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

आसरा चौक परिसरातील एसबी प्लाझा या इमारतीत अतिसाराने एका महिलेचा बळी घेतला आहे. दूषित पाणीपुरवठ्यामुळे मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे. महापालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, त्या इमारतीत महापालिकेचे पाणी नाही तर खाजगी बोअरचे पाणी वापरले जाते, असे स्पष्टीकरण महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिले.

आफरीन मुजफ्फर शेख (वय-४९) असे मृत महिलेचे नाव असून त्यांच्यावर शहरातील यशोधरा रुग्णालयात उपचार सुरु होते. मागील तीन दिवसांपासून त्यांना दूषित पाणी पिल्यामुळे उलट्या व जुलाबाचा तीव्र त्रास होत होता, असा आरोप रहिवाशांनी केला. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. एसबी प्लाझा इमारतीतील दूषित पाणीप्रकरणामुळे एकूण ४० रहिवाशांना विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. काही रुग्णांची प्रकृती सुधारली असली, तरी या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या



इमारतीत दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी अनेकवेळा महापालिका प्रशासनाकडे केल्या होत्या. मात्र त्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली नाही. प्रशासनाने वेळेत उपाययोजना केली असती, तर हा दुर्दैवी मृत्यू टाळता आला असता, असा आरोप नागरिकांनी केला आहे.संबंधित महिलेचा मृत्यू अतिसाराने झालेला असला तरी तेथील नागरिक जे पाणी वापरतात ते महानगरपालिकेचे नाही. त्यांचे स्वतंत्र बोअरिंग आहेत. घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेचे पथक घटनास्थळी भेट देत सुरक्षात्मक उपाययोजना तसेच औषध गोळ्यांचे वाटपही केले होते, असे महापालिका आरोग्य अधिकारी डॉ.राखी माने यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या घटनेशी महापालिकेचा काहीही संबंध नाही. या इमारतीमध्ये त्यांचे स्वतःचे बोअरिंग आहेत, असे सार्वजनिक आरोग्य उप अभियंता रामचंद्र पेंटर यांनी सांगितले.

# 'विश्वकर्मा-अहिल्यादेवी'च्या वतीने २ ऑगस्ट रोजी 'उद्योजक व्हा' शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

विश्वकर्मा फाउंडेशन व अहिल्यादेवी बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था मर्यादित सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी उद्योजक व्हा शिबीराचे आयोजन करण्यात आले. अधिक माहितीसाठी १२ अ रेल्वे लाईन भैय्या चौक गायकवाड बिल्डिंग सोलापूर येथे समक्ष किंवा ९४२२०६५८५७ / ८०८०९३३२०२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले.

या शिबिरामध्ये उद्योग करु शकतो का? उद्योग करण्यासाठी कोणते गुण हवेत ते गुण नसेल तर ते कसे आत्मसात करावे? कोणकोणत्या उद्योग संधी आपल्या शहरात उपलब्ध आहेत? कोणकोणते उद्योग आपण करु शकतो? बँक लोन कसे मिळते? त्यासाठी काय काय कागदपत्रे लागतात? शासनाची कोणकोणती महामंडळ आहेत? सबसिडी किती मिळते? मुद्रा लोन, स्टार्टअप योजना, स्टँडिंग इंडिया, विश्वकर्मा योजना आदींविषयीची माहिती दिली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.




# होटगी रस्त्यावरील कामामुळे पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था बाधित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

होटगी रोडवरील रस्त्याचे काम तांत्रिकदृष्ट्या चुकीच्या पध्दतीने होत असून यामुळे पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था बाधित होत असल्याची तक्रार 'एमआयएम'चे नगरसेवक अजहर हुंडेकरी यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. होटगी रोडच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती आहेत. या भागातील ड्रेनेज लाईन, पाणीपुरवठ्याच्या भूमिगत पाईपलाइनवर अनेक ठिकाणी रस्त्याचे बांधकाम करण्यात आले आहे. ड्रेनेज चेंबर्ससाठी आवश्यक जागाही न सोडल्याने भविष्यात देखभाल आणि दुरुस्तीची अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने या तक्रारीची दखल घेत घटनास्थळाची पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी कामातील त्रुटींवर आक्षेप नोंदवत एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना आवश्यक बदल करण्याच्या सूचना दिल्या.

महापालिकेने सुमारे ९ कोटी रुपयांचा दुरुस्ती आराखडा तयार करून एमएसआरडीसीकडे सादर केला असून या दुरुस्तीचा खर्च एमएसआरडीसीकडून करण्यात येणार आहे, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# नीट परीक्षेतील गैरव्यवहार, लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ सोलापुरात ‘आंदोलन-पे-आंदोलन’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार, विद्यार्थ्यांची आत्महत्या, पर्यावरणवादी तथा समाजसेवक सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततेत सुरु असलेल्चा आंदोलनकर्त्या विद्यार्थी-युवकांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ सोलापूर शहर-जिल्ह्यात गुरुवार, दि.२३ जुलै २०२६ रोजी करण्यात आलेल्या आंदोलनास मोठा प्रतिसाद मिळाला होता. या आंदोलनाच्या दरम्यान प्रजा नाट्य मंदिरच्या कलावंतांनी विविध क्रांतीगीते सादर केली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करण्यात आली. शिक्षण व्यवस्थेतील गैरकारभार, केंद्र शासनाचे चुकीचे धोरण आदींच्या विरोधात आंदोलनकर्त्यांशी आगपाखड केली. गगनभेदी घोषणा देत विविध मार्गावरुन रॅली काढण्यात आली. सर्वत्र कडकडीत बंद पाळण्यात आला. या आंदोलनाच्या निमित्ताने विद्यार्थी-विद्यार्थिनी व युवाशक्ती रस्त्यावर उतरुन तीव्र संताप व्यक्त करीत होते. निषेधाचा ठराव मांडण्यात आला. बाजारपेठांवर या बंदचा मोठा परिणाम झाल्याचे दिसून आले. एकूणच, काय तर गुरुवारी सोलापूर शहर व जिल्ह्यात ‘आंदोलन-पे-आंदोलन’ असेच जणू चित्र दिसून आले.



## ‘लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारी बाब’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-युवकांवर लाठीमार करणे, अश्रुधूराचा वापर करुन आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करणे ही लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारी बाब आहे, असे रोखठोक प्रतिपादन माजी आमदार नरसय्या आडम यांनी केले.

नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार, विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटना आणि दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततेत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-युवकांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुनम गेट येथे करण्यात आलेल्या आंदोलनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी केंद्र सरकारच्या शिक्षण धोरणाविरोधात घोषणाबाजी करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, शिक्षण व्यवस्था पारदर्शक आणि विद्यार्थीहिताची करण्याची मागणी करण्यात आली. प्रजा नाट्य मंडळाच्या कलापथकाने क्रांतिकारी गीतांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवत वातावरण तापवले.

या आंदोलनात ‘माकपा’चे राज्य सचिव मंडळ सदस्य एम.एच. शेख, जनवादी महिला संघटनेच्या राज्य अध्यक्षा नसीमा शेख, युसुफ शेख, ॲड.अनिल वासम, दत्ता चव्हाण, सुनंदा बल्ला, शेवंता देशमुख, व्यंकटेश कोंगारी, विक्रम कलबुर्गी, अतुल फसाले, मल्लेशम कारमपुरी यांच्यासह माकपाचे पदाधिकारी-कार्यकर्ते, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सामील झाले होते.

## ‘बार्शी’त व्यापक पाठिंबा; शाळा, महाविद्यालय, भाजी मंडई, अत्यावश्यक सेवांना वगळण्यात आले

**तसा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

दिल्लीस्थित जंतर-मंतर येथे सुरु असलेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ बार्शी येथे करण्यात आलेल्या आंदोलनास सर्वस्तरांतून व्यापक पाठिंबा मिळाला होता. दरम्यान, शैक्षणिक विषयाशी संबंधित आंदोलन असल्यामुळे विद्यार्थी व पालकांची गैरसोय होऊ नये; या भूमिकेतून शाळा, महाविद्यालये, भाजी मंडई आणि अत्यावश्यक सेवा यांना या बंदमधून वगळण्यात आले होते.



वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड.विवेक गजशिव यांच्या नेतृत्वाखाली सदर आंदोलन करण्यात आले. व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे पदाधिकारी रस्त्यावर उतरले होते. दरम्यान, बार्शी तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू न देता, पूर्णपणे शांततापूर्ण, सनदशीर आणि लोकशाही मार्गाने आंदोलन पार पडले.

तहसील कार्यालय परिसरात झालेल्या निषेध सभेत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रा.तानाजी ठोंबरे, वंचित बहुजन आघाडीचे ॲड.विवेक गजाशिव, अनिरुध्द नकाते, प्रहार जनशक्ती पक्षाच्या संजीवनी बारंगुळे, शिवसेनेचे नगरसेवक आकाश राऊत, नगरसेवक महेदिमिया लांडगे, युवासेनेचे शहरप्रमुख ॲड. हर्षवर्धन पाटील, समता परिषदेचे नितीन भोसले, दलित पँथरचे स्वप्नील वाघमारे, विनोद जाधव, शरद बनसोडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

या आंदोलनात सोनाली गायकवाड, किरण भालशंकर, आकाश चाबुकस्वार, सचिन पालके, गौतम वाघमारे, प्रवीण आखाडे, सुनील बगाडे, सुभाष सरवदे, लक्ष्मण बगाडे, बाळासाहेब सरवदे, विजय शिंदे, पांडा समिंदर, पंकज खुने, अतिश बनसोडे, निखिल लंकेश्वर, बंटी शिंदे, यश खुने, सुमित खुरुंगळे, सूर्या मस्के, दिपक जानराव, यशपाल ननवरे, संदीप खुने, अजय शिंदे, मनोज शिंदे, शंतनू खुने, शुभम अलाट, सुहास भालेराव, दिपक कसबे, रोशन शिंदे, संकेत कांबळे आदी सामील झाले होते.

## कांदा बाजाराला बसला ‘बंद’चा फटका



### शेतकरी बसले होते हताशपणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

नीट परीक्षेतील गैरव्यवहार, विद्यार्थ्यांची आत्महत्या आणि जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-युवकांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ गुरुवारी पुकारण्यात आलेल्या ‘बंद’चा फटका श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथील कांदा बाजारला बसला होता. आजच्या बंदमुळे शेतकरी हताशपणे कांद्याच्या पोत्यावर बसले होते. काही काळ याठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

गुरुवारी सुमारे १०० ट्रक कांदा विक्रीसाठी दाखल झाला होता. मात्र माथाडी कामगार संघटनांनी पुकारलेल्या बंदमुळे सकाळी कोणती लिलाव प्रक्रिया सुरु झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत, रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. बाजार समिती प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेत दुपारी ४ नंतर कांद्याचे लिलाव सुरु केले. दुपारनंतर बाजार सुरळीतपणे सुरु झाला होता.

**प्रक्रिया वेळेत सुरु झाली नाही**

बाजार समितीत सकाळच्या सत्रात कांदा लिलाव झाला नाही. कामगारांनी बंद पुकारल्याने लिलाव प्रक्रिया वेळेत सुरु झाली नाही. मात्र दुपारी ४ वाजता कांदा लिलाव सुरळीत करण्यात आला, असे श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव अतुलसिंग राजपूत यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या बंदमुळे बाजार समितीत सकाळच्या सत्रात व्यापार ठप्प झाले होते. बाजारात कांद्याची आवक सुमारे १०० ट्रक इतकी झाली होती. दुपारनंतर कांदा लिलाव सुरु करण्यात आले, असे कांदा अडत व्यापारी सादिक बागवान यांनी सांगितले.

**आर्थिक हिताचा प्रश्न ऐरणीवर**

शेतकऱ्यांनी एकजूट दाखवत आपल्या आर्थिक हिताचा प्रश्न ऐरणीवर आणला. शेतकऱ्यांच्या या एकजुटी मुळे प्रशासनाला लिलाव सुरु करण्याचा निर्णय घ्यावा लागला, असे कांदा उत्पादन शेतकरी संभाजी भोसले यांनी सांगितले.



### अभिनव संस्थेच्या वतीने राष्ट्रपतींना पाठविले निवेदन

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

नवी दिल्ली येथील जंतर मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी अमानुषपणे लाठीचार्ज आणि मारहाण केल्याच्या विरोधात अभिनव सामाजिक संस्थेच्या वतीने नायब तहसीलदार स्मिता गायकवाड यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्याकडे निवेदन पाठविण्यात आले. अभिनव’च्या अध्यक्षा मिनल दास यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, शांततापूर्ण मार्गाने विद्यार्थी आंदोलन करत असताना पोलिसांनी लाठीचार्ज आणि मारहाण करणे ही अत्यंत निंदनीय, अन्यायकारक व लोकशाहीच्या मूल्यांना काळीमा फासणारी घटना आहे. याप्रसंगी जिल्हा संघटक अनिता वाघमारे, शहर संघटक अरुणा जाधव, शहर उत्तर अध्यक्ष सुरेखा लंगरे, शहर उत्तर उपाध्यक्ष अन्नपूर्णा स्वामी, शहर उपाध्यक्ष कमल देशमुख, शहर दक्षिण अध्यक्ष कविता ससाणे आदी उपस्थित होते.



### माळशिरस बार असोसिएशनकडून निषेध

**माळशिरस, दि.२३ जुलै-**

जंतर-मंतरवर शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराच्या घटनेचा माळशिरस बार असोसिएशनने तीव्र निषेध केला आहे. या प्रकरणातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी महसूल नायब तहसीलदार सिध्दनाथ जावीर यांच्याकडे दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. याप्रकरणी दिल्लीचे पोलिस आयुक्त यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, असे या निवेदनात म्हटले आहे.

## नीट पेपरफुटीप्रकरणी ‘माळशिरस’मध्ये पाळण्यात आला बंद

**माळशिरस, दि.२३ जुलै-**

नीट पेपर फुटी प्रकरणी दोषींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंदला माळशिरस शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आठवडा बाजार दिवस असून सुध्दा व्यापाऱ्यांनी दुपारपर्यंत आपली दुकाने बंद ठेवून बंदमध्ये सहभाग नोंदवला. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिल्ली येथील जंतर-मंतरवर सुरु असलेल्या विद्यार्थ्यांच्या करण्यात आलेला लाठीहल्ल्याची घटना निंदनीय आहे, असे यावेळी सांगण्यात आले. दरम्यान, सदाशिवनगर येथेही बंद पाळण्यात आला



## माढा शहरात पुकारण्यात आला कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२३ जुलै-**

नीट पेपर फुटीसह जंतरमंतर येथील आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशावरुन गुरुवार, दि.२३ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला होता. माढा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. माढा तहसील कार्यालय येथे सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांनी लोकशाही मार्गाने आपल्या न्याय मागण्या मांडत असताना त्यांच्यावर बळाचा वापर करणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. विद्यार्थ्यांवरील अमानुष लाठीमाराची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी.



याप्रसंगी सुधीर लंकेश्वर, गणेश मोरे, किरण पवार, प्रविण पवार, अतिश लंकेश्वर, अभिजीत पवार, प्रमोद भोळे, किरण बा. पवार, फारुख शेख, आकाश सरतापे, राजाभाऊ खंडागळे उपस्थित होते.

## ‘अक्कलकोट’मध्ये ‘बंद’ला उत्स्फुर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ जुलै-**

‘जंतर-मंतर’वर सुरु असलेल्या आंदोलनप्रसंगी विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या अमानुष लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या ‘बंद’ला अक्कलकोट शहर व तालुक्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

जंतर-मंतरवर संविधानानुसार शांततापूर्ण आंदोलन करीत असताना सरकार हिटलरशाही प्रमाणे त्यांच्यावर अमानुषपणे निर्दयपणे लाठीचार्ज करत अश्रूधुरांचे नळकांड्या फोडले. ही घटना लोकशाहीला काळीमा फासणारी आहे, असे यावेळी सांगण्यात आले.



वंबआचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली पुकारण्यात या आंदोलनमध्ये देवानंद अस्वले, विशाल ठोंबरे, साहिल कांबळे, शिवाजी चौगुले, नागेश हरवाळकर, संतोष बाळशंकर, दादा गायकवाड, नरसिंह गायकवाड, बबन गायकवाड, अमृत सोनकांबळे, माणिक गायकवाड, सचिन गजदाने, संदीप गजदाने, प्रताप वाघमारे, दयानंद गायकवाड, लालू बनसोडे, यशवंत शेटे, राजकुमार वाघमारे, गौतम सीताफळे, कृष्णा इंगळे, राजकुमार इंगळे, सोपान इंगळे, शंकर इंगळे, कटप्पा सोनकांबळे सामील झाले होते.

## श्रीपूरमध्ये बंद पाळून केंद्र सरकारचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२३ जुलै-**

नीट परिक्षेचा पेपर फुटल्याप्रकरणी कॉक्रोच पार्टीने जंतर मंतरवर आंदोलनात वांगचुंग यांनी आमरण उपोषण करत आहेत. यावेळी पोलिसांकडून लाठीहल्ला करण्यात आला. याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने श्रीपूरमध्ये कडकडीत बंद पाळून केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला.



शहरातील प्रमुख मार्गावरुन मोर्चा काढण्यात आला. दरम्यान, आजच्या आंदोलनास रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियानेही पाठिंबा दर्शविला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आरपीआयचे ज्येष्ठ नेते शामराव भोसले, प्रा.नरेंद्र भोसले, भारत आठवले, किशोर आठवले, सचिन धाईंजे, सागर आठवले यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या.

## शिवसेना ‘उबाठा’कडून निषेधाचा ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

नीट परीक्षेतील गैरव्यवहार, समाजसेवक सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथील जंतरमंतर सुरु असलेल्या आंदोलनप्रसंगी विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना ‘उबाठा’कडून निषेधाचा ठराव मांडत तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला.

शिवसेना उबाठाच्या सोलापूर शहर व जिल्हा बैठकीत हा ठराव पारित करण्यात आला. पोलिसांमार्फत झालेला अमानुष हल्ल्याला संपूर्ण जबाबदार हे केंद्रातील मोदी सरकार आहे. सदरहु हल्ला पाहता लोकशाही नव्हे तर हुकूमशाही आहे असे दिसून आले, असे यावेळी सांगण्यात आले.



याप्रसंगी जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकर, विष्णू कारमपुरी, सुरेश जगताप राजाभाऊ कुसेकर, शिवा ढोकळे, संदीप बेळमकर, संताजी भोळे, अनिल दंडगुळे, जर्गीस मुल्ला, प्रसाद जगताप, राम वाकसे, तुषार आवताडे, निरंजन बोध्दुल, तुषार खंदारे, दिनेश चव्हाण, बाळासाहेब गायकवाड, विठ्ठल कुऱ्हाडकर आदी उपस्थित होते.

## ‘वंचित’च्या वतीने काढण्यात आला तिरडी मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ वंबआ अर्थात वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या ‘महाराष्ट्र बंद’ला सोलापुरात संमिश्र प्रतिसाद मिळाला. दरम्यान, शहरातील प्रमुख मार्गावरुन तिरडी मोर्चा काढून या घटनेचा निषेध करण्यात आला.



माजी नगरसेवक रवी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाळीवेस, टिळक चौक, मधला मारुती, मेकॅनिक चौक, दत्त चौक, नवी पेठ, सरस्वती चौक या मार्गावरुन तिरडी मोर्चा काढण्यात आला. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मोर्चाचा समारोप करण्यात आला. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, अनिरुध्द वाघमारे, विनोद इंगळे, सुहास कदम, सचिन गायकवाड, प्रशांत गोणेवर, सुहास सावंत, पल्लवी सुरवसे, सईद शेख, यशपाल सरवदे, विजयानंद उघडे, गौतम ठांपते, रवी थोरात, अनिरुध्द वाघमारे आदी सामील झाले होते. युवा पँथरचे संस्थापक आतिश बनसोडे, चंद्रकांत सुरवसे सहभागी झाले होते.

**संवेदनशील भागात अतिरिक्त पोलिस फौजफाटा**

आजच्या बंदच्या पार्श्वभूमीवर शहर व जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. संवेदनशील भागांत अतिरिक्त पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आले होते. मात्र, आज दिवसभर कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘आयटी पार्क’साठी पाटबंधारे विभागाची जमीन ‘एमआयडीसी’ला देण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सोलापूरकरांना प्रतीक्षा लागून राहिलेल्या आयटी पार्कसाठी होटगी येथील पाटबंधारे विभागाची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला विनामोबदला देण्याचे आदेश बुधवारी निघाले. या आदेशामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्याने आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.

सोलापूरकरिता होटगी येथे आयटी पार्क करण्याचा निर्णय झाल्यानंतर या आयटी पार्कला जागा मिळवून देण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी शासन दरबारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. मुंबई येथे झालेल्या बैठकांमध्येही आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूरच्या आयटी पार्कचा विषय उचलून धरला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच सोलापूरच्या आयटी पार्कसाठी जलसंपदा खात्याची जमीन विना मोबदला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे वर्ग करण्याचा शब्द अधिवेशन काळात झालेल्या भेटीप्रसंगी दिला होता.

बुधवारी पाटबंधारे विभागाने आदेश काढून होटगी येथील लघु पाटबंधारे तलावाची गट नंबर ५७६ मधील २० हेक्टर जागा आयटी पार्कसाठी विना मोबदला हस्तांतरित करण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. याबाबतचे पत्र लघुपाटबंधारे विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिले आहे. होटगी येथील जागा हस्तांतरणाचा प्रश्न अनेक दिवसांपासून रखडला होता. त्यामुळे आमदार देवेंद्र कोठे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडेही याबाबत पाठपुरावा केला होता. बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर जिल्ह्यात येण्यापूर्वी याबाबतचे त्वरित आदेश काढण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांनी संबंधितांना दिल्या होत्या. त्यानुसार बुधवारी सायंकाळी याबाबतचा आदेश निघाला. बुधवारी झालेल्या या निर्णयामुळे सोलापुरातील आयटी पार्क होटगी येथेच होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सोलापूरकरांना वाढदिवसाचे रिटर्न गिफ्टच**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोलापूरच्या विकासाची तळमळ पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. हा आदेश म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी त्यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूरकरांना दिलेले रिटर्न गिफ्टच आहे. सोलापूरकरांचे आयटी पार्कचे स्वप्न आता लवकरच सत्यात उतरणार आहे. सोलापुरातील उच्चशिक्षित तरुणांना सोलापुरातच काम मिळवून देण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात भाजपाने दिलेला आणखी एक शब्द आम्ही लवकरच पूर्ण करत आहोत.

**- देवेंद्र कोठे,** आमदार, शहर मध्य

## ज्ञानामृत आनंदलहरी १५११

कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ।

जीभ हे अतिशय महत्वपूर्ण असे शस्त्र आहे. या शस्त्राने माणसं जोडलीही जाऊ शकतात व तोडलीही जाऊ शकतात. या शस्त्राने घातलेले घाव सहजासहजी बुजत नसतात. त्याचबरोबर या शस्त्राने मनवाची मनं अत्यंत चांगल्या प्रकारे जोडता येतात. त्यामुळे या शस्त्राचा वापर कसा करावा आणि किती करायचा हे ज्याचे त्याच्यावर अवलंबून असते. जाणून-बुजून बोलला काय किंवा अनावधानाने बोलला काय, परिणाम मात्र होणार तो होणारच. त्यासाठी काळजीपूर्वक बोलणे अत्यंत महत्वाचे असते. आपली जीभ इतरांशी मैत्रीही करु शकते, त्याचबरोबर शत्रूत्वालाही निर्माण करू शकते. हे सर्वांना माहिती असूनही अनेक लोक आपल्या जीभेला अत्यंत सैल सोडतात. जीभेचा हा सैलपणा



बऱ्याचवेळा आपल्यासाठी घातक ठरतो. कांहीची जीभ इतकी सैल सुटलेली असते की तिला आवरणे त्यांच्याही हातात राहिलेले नसते. वाट्टेल ते व वाट्टेल तेव्हा बोलणारे लोक समाजात आहेत. कांहींची जीभ तर निव्वळ टाकून बोलणारी, इतरांना कमी लेखणारी, स्वत:चे मोठेपण सांगणारी असते. अशा लोकांच्या तोंडून कधीच सात्विक विचार, शब्द बाहेर पडत नाहीत. सत्यापासून कोसो दूर राहणारी, लोकांबद्दल सदैव अपशब्द बोलणारी वाचा व्यर्थ असते. अशी व्यर्थ वाणी बोलणारा किंवा इतरांना सदैव कमी लेखणारा व्यक्ति अत्यंत खालच्या स्तराचा असतो. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ।

अकारण इतरांना नाव ठेवणारे लोक समाजात कमी नाहीत. आपला काहींही संबंध नसतांनाही येणाऱ्या जाणाऱ्यांबद्दल लोक अपशब्द बोलत असतात. इतरांची टिंगळ-टवाळी करण्यात किंवा इतरांना नावे ठेवण्यात असे लोक आनंद मानतात. जवळपास सर्वच क्षेत्रात चांडाळचौकडी असते. तो असा, ती अशी, त्याने हे केले, त्याने ते केले, त्याचे-तिचे तुम्हाला काय माहिती आहे, ते-ती फार... प्रकारचे आहेत, वगैरे बोलण्यात आनंद मानणारे वेडे लोक समाजात आहेत. म्हणूनच अनेकांच्या हृदयाला, भावनेला तडे जातात. कधी-कधी ही वाईट वाचा एखाद्यासाठी जीवघेणी ठरते. रॅगिंग नावाचा प्रकार अशा वाचेचाच एक भाग आहे. लोकांना नांव ठेवण्यात पुढाकार घेणारी ही वाचा स्वत:ला मोठेपणा घेण्यात अजिबात मागे नसते. मी म्हणजे सर्वस्व असे म्हणणारी वाचाच मूळात वाईट असते. कोणी कसाही वागला तर त्याला नाव ठेवलेच जाते. लग्नाच्या अगोदर कांही जोडपी एकमेकांच्या ज्या वाचेने कौतुक करतात, त्याच वाचेने लग्नानंतर एकमेकांबद्दल वाईट बोलतात. प्रेमाणे एकत्र येणारे अनेक लोक वाचाळ बोलून एकमेकांपासून दुरावतात. वाचा ही मानवी मनं जोडण्याचे अत्यंत महत्वपूर्ण माध्यम आहे. या माध्यमाचा सदुपयोग केला तर आपल्यासारखा दुसरा कोणी भाग्यवान नाही. वाचेने चांगले बोलता आले नाही तरी चालेल; पण कोणात्याही परिस्थितीत वाईट तरी बोलू नये. ज्ञानोबा माऊली, तुकोबा माऊलींच्या भक्तांना याबाबत वेगळे सांगण्याची आवश्यकता नसावी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**



## भाजपा शहर मध्य विधानसभातर्फे चार ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहर मध्य विधानसभा यांच्या वतीने शहरातील चार ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

बोल्ली मंगल कार्यालय (अशोक चौक), पूर्व विभाग श्रीराम मंदिर (दाजी पेठ), इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय (एम्प्लॉयमेंट चौक) तसेच भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहर कार्यालय येथे सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर घेण्यात आले. महापौर विनायक कोंड्याल यांनी विविध केंद्रांना भेट देऊन रक्तदात्यांचे अभिनंदन केले.

पूर्व विभाग श्रीराम मंदिर येथे त्यांच्या हस्ते रक्तदात्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच भाजप शहर कार्यालयातील शिबिरात रक्तदान करणाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भाजपचे ज्येष्ठ माजी नगरसेवक रामचंद्र जन्नू, अविनाश महागावकर, नगरसेवक मेघनाथ येमूल, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, मंडलाध्यक्ष तथा नगरसेवक अक्षय आजीखाने, नगरसेवक विजय चिप्पा, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगरसेवक प्रशांत पल्ली, नगरसेविका वाडेकर, मंडलाध्यक्ष नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, मनोज पिस्के, सिद्धाराम खजूरगे उपस्थित होते.

## सम्राट चौकातील धोकादायक झाडाची छाटणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सम्राट चौक येथील महेश नगर परिसरातील नागरिक वस्तीत असलेल्या धोकादायक झाडामुळे संभाव्य दुर्घटनेचा धोका निर्माण झाला होता. या संदर्भात सुजाण नागरिकांनी महापालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाला माहिती दिल्यानंतर यंत्रणेने तातडीने घटनास्थळी धाव घेत मोठी दुर्घटना टाळली.

आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या पथकाने उद्यान विभाग व विद्युत विभागाच्या समन्वयाने धोकादायक अवस्थेतील झाडाच्या फांद्या सुरक्षितपणे काढून टाकल्या. त्यामुळे झाड कोसळून होणारी संभाव्य जीवितहानी व वित्तहानी टळली. कारवाईदरम्यान आवश्यक ती सुरक्षा खबरदारीही घेण्यात आली. महापालिकेच्या तत्पर आणि समन्वयपूर्ण कामगिरीमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. आपत्कालीन नियंत्रण कक्षातील अधिकारी, कर्मचारी, मजूर सेवक तसेच उद्यान व विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानून त्यांच्या त्वरित प्रतिसादाचे कौतुक केले. नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि महापालिकेच्या जलद कृतीमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. उद्यान अधीक्षक कोमल काशीद, आपत्कालीन नियंत्रण कक्षातील उप अभियंता संगम नाथ उप्पीन यांच्या समन्वयाने आपत्कालीन कक्षातील कनिष्ठ अभियंता सागर सादिगले व आदर्श गायकवाड यांच्या उपस्थितीत हे काम पूर्ण करण्यात आले.



## १७० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप; गजानन महाराज मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधत श्री गजानन महाराज (शेगाव) सांस्कृतिक मंडळ, सोलापूर व समस्त गजानन भक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिका कॅम्प प्रशालेतील इयत्ता नववी व दहावीतील १७० गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात आले.

सोरेगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरात झालेल्या कार्यक्रमात महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निर्मला जंगम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वितरण करण्यात आले. यावेळी महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे प्रमुख उपस्थित होते.मंडळाचे कार्यवाह गुरुलिंग कन्नूरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मंडळाचे नारायण जोशी, राजीव घाटे तसेच महानगरपालिका कॅम्प प्रशालेचे सिद्राम आरकेरी, गोकुळ कांबळे, नागेश पाटील, पल्लवी खरबस, महादेवी बिराजदार, संगमेश्वर रंगदाळ उपस्थित होते. मुख्याध्यापिका प्रमिला हंचाटे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन पल्लवी खरबस यांनी केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार,
दि. २४ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - आषाढ शु. दशमी
ऋतु - वर्षा ।
नक्षत्र- अनुराधा (२८.३६)
योग - शुक्ल (२०.१०)
करण - वणिज (२२.२२)
राहू काल : शुक्रवार
स. १०.३० ते १२.००

दिनविशेष : २००७ : भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून प्रतिभा पाटील यांनी पदभार स्वीकारला.
१९७८: इंग्लंडमध्ये लुईस जॉन ब्राऊन या जगातील पहिल्या टेस्ट ट्युब बेबीचा जन्म झाला.
१९८४: सोव्हिएत संघाच्या 'स्वेतलाना साव्हित्स्काया' अंतराळात चालणाऱ्या पहिल्या महिला अंतराळवीर बनल्या.



## लोकमान्य टिळकांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी : डॉ. येळेगावकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे कर्तव्यनिष्ठेचे मेरुमणी, द्रष्टे विचारवंत, प्रखर राष्ट्रवादी नेते आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रेरणास्थान होते. त्यांच्या विचारांमध्ये राष्ट्रनिर्मितीची दृष्टी होती. त्यामुळे लोकमान्य टिळकांचे जीवन व कार्य आजच्या पिढीसाठी सदैव प्रेरणादायी आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टसब, कॉमर्स आणि सायन्स येथील इतिहास विभाग आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा-जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने, सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीचे औचित्य साधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ‘लोकमान्य टिळक यांचे जीवन व कार्य’ या विषयावर प्रमुख वक्त म्हणून डॉ. येळेगावकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. भीमाशंकर शेटे होते. त्यांनी अध्यक्षीय मनोगतात टिळकांच्या विचारांची आजच्या काळातील गरज अधोरेखित केली. या प्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, डॉ. डी. एस. सूत्रावे, प्र. प्राचार्य डॉ. ए. बी. वळसंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. प्रास्ताविक प्रा. डॉ. एस. जे. बावगे यांनी करून दिला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एम. बी. पाटील, डॉ. शुभदा उपासे, डॉ. हृषिकेश धनवे, डॉ. विनायक अडकून, डॉ. महादेव कांबळे, डॉ. दामोदर बनसोडे, डॉ. अनिता बिराजदार, प्रा. वसंत मणुरे, प्रा. महेश स्वामी, प्रा. अश्विनी बिरोळी, प्रा. स्वाती पाटील, प्रा. लक्ष्मीपुत्र गोटे, डॉ. असीम चाफळकर, प्रा. बसवराज रुगी, प्रा. ऐश्वर्या म्हस्के, प्रा. आदिती म्हस्के, प्रा. शगुफ्ता नदाफ, प्रा. वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एस. एस. शिखरे यांनी केले, तर प्रा. सी. पी. उमरजकर यांनी आभार मानले.

## सोलापुरात शाहिरी महोत्सव सोमवारपासून

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्राच्या समृद्ध शाहिरी परंपरेचा गौरव करणाऱ्या ‘शाहिरी महोत्सवा’चे आयोजन सोमवार, २७ जुलै ते बुधवार, २९ जुलै या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदिर, येथे करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी ७.०० वाजता होणाऱ्या या महोत्सवातून महाराष्ट्राच्या लोकजीवनाशी, सामाजिक प्रबोधनाशी आणि राष्ट्रभक्तीच्या भावनेशी नाते सांगणाऱ्या शाहिरी कलेचा जागर करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी दिली.

सोमवार, २७ जुलै रोजी शाहीर सूरज किरणसिंग राऊळ व सहकारी, शाहिरा मंगल दळवी व सहकारी तसेच शाहीर कल्याण काळे व सहकारी यांचे सादरीकरण होणार आहे. मंगळवार, दि. २८ जुलै रोजी शाहीर गणेश गलांडे व सहकारी, शाहिरा प्रा. संगीता हेमंतराजे मावळे व सहकारी तसेच शाहीर राजेंद्र कांबळे व सहकारी आपली कला सादर करणार आहेत.

बुधवार, दि. २९ जुलै रोजी शाहीर संतोष साळुंखे व सहकारी, शाहीर बजरंग आंबी व सहकारी तसेच शाहीर सुभाष गोरे व सहकारी यांच्या सादरीकरणातून महोत्सवाची सांगता होणार आहे.

## जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

जंतर-मंतर येथे आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वाहतूक संघटना संयुक्त महासंघ यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



या निवेदनाद्वारे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जची तीव्र शब्दांत निषेध नोंदविण्यात आला. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार असून, विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे हे निषेधार्ह असल्याचे महासंघाने म्हटले आहे. महासंघाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हे निवेदन केंद्र सरकार व संबंधित राज्य शासनाकडे पाठविण्याची विनंती केली आहे. विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.



## जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांचे वृक्षारोपण अभियान संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**


जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज-नाणीज धाम यांच्या प्रेरणेने ‘एक भक्त एक वृक्ष‘ या पर्यावरण संरक्षणाच्या संकल्पातुन केवल १५ दिवसात दिनांक ५ ते १९ जुलैपर्यंत संपूर्ण भारत भर भव्य वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले होते. या आभियानाच्या माध्यमातुन सोलापूर शहर व जिल्ह्यांमध्ये १२ हजार ५७१ इतके झाडे लावण्यात आली तर संपूर्ण भारत देशामध्ये सहा लाख १८ हजार नऊ इतकी झाडे लावून एक मोठा विक्रम करण्यात आला. सोलापूर परिसरात बाळू मामा मंदिर बेलाटी. स्वामी नारायण गुरुकुल प्रशाळा कुंभारी. हिरज, मार्डी, पाथरी, बीबी दारफळ, नान्नज, विडी घरकुल आदी ठिकाणी झाडे लावण्यात आली. या अभियान दरम्यान शहर प्रमुख दिगंबर आवताडे महिला अध्यक्ष ऐश्वर्या उत्तरकर, युवा प्रमुख विनायक कांबळे, दादासाहेब नागटिळक बाळू कदम, निखिल मठे, विजय गाडे, विशाल चव्हाण, सुधाकर फंड, मोहिते बुवा यांनी परिश्रम घेतले.

## आंतरराष्ट्रीय वाळवी संशोधनासाठी विजय बाहेती यांची निवड

**सोलापूर, दि. २३ जुलै-**



महाराष्ट्रातील प्रगतशील कीटकनियंत्रण तज्ज्ञ आणि संशोधक विजय दयाराम बाहेती यांची मलेशियातील जागतिक दर्जाच्या Termite Research Laboratory, FRIM (Forest Research Institute Malaysia) येथे आयोजित आंतरराष्ट्रीय वाळवी संशोधन व सखोल अभ्यास प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. हे प्रशिक्षण दि. २६ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत मलेशियामध्ये आयोजित करण्यात आले असून, जगभरातील निवडक संशोधक आणि कीटकनियंत्रण तज्ज्ञ या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.




## नवले सिंहगड महाविद्यालयात अजित पवारांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव कॅम्पसमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. २२) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली जयंतीनिमित्त महाविद्यालय परिसरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. एस. एच. पवार, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, डॉ. विजय बिरादार, प्रा. प्रदीप तपकिरे, हरीष गुरमे, अनंतराव पाटील, माणिक शिंदे, हेमंत लगदिवे, शशिकांत जगताप, विनायक पालमूर, ग्रंथपाल, गणेश घोगले, विद्यानंद बाबर, लिपिक नवनाथ भडंगे, गौरव साबळे तसेच जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे उपस्थित होते.

## १७० विषयांच्या विक्रमी मंजुरीने लोकविश्वासाची जपणूक

### नालेसफाई कंत्राटातील भ्रष्टाचार आरोप प्रकरणी कारवाईची अपेक्षा

सोलापूर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने यावेळी इतिहास घडवला. एका बैठकीत तब्बल १७० विषयांना मंजुरी देत शहराच्या विकासाला नवी गती देण्याचा निर्धार सभागृहाने दाखवून दिला. विविध विकासकामे, नागरी सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, सामाजिक योजनांसह अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांना हिरवा कंदील मिळाला. ही कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आहे. या विक्रमी कामगिरीसाठी महापौर विनायक कोंड्याल आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांचे विशेष अभिनंदन. विषयांचा वेगाने निपटारा करत विकासकामांना गती देण्याचा त्यांचा प्रयत्न शहराच्या दृष्टीने सकारात्मक आहे. आता त्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणीही जबाबदारी सत्ताधाऱ्यांवर आली आहे.

याच सभेत नालेसफाई कंत्राटातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दाही तितक्याच ताकदीने पुढे आला. नगरसेवक अनंत जाधव यांनी कागदपत्रांच्या आधारे उपस्थित केलेले प्रश्न आणि जनतेच्या पैशांचा हिशेब मागण्याची भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. आरोप सिद्ध झालेले नसले, तरी गंभीर शंका उपस्थित झाल्यानंतर निष्पक्ष चौकशी होणे ही प्रशासनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे.यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित नगरअभियंत्यांना पदावरून दूर ठेवावे, अशी अनंत जाधव यांनी केलेली मागणी ही कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविण्याची भूमिका नसून, चौकशीवर कोणताही प्रभाव पडू नये आणि पारदर्शकता अबाधित राहावी, या तत्त्वावर आधारित मागणी आहे. त्यामुळे या मागणीचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा महापालिका वर्तुळात व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, महापालिका प्रशासनात यापूर्वी अनेक प्रकरणांमध्ये चौकशीवर परिणाम होऊ नये म्हणून




कनिष्ठ कर्मचाऱ्यांपासून लिपिकांपर्यंत अनेकांना निलंबित किंवा बाजूला करण्यात आले आहे. मग या प्रकरणात चौकशी समिती नेमूनही संबंधित




अधिकाऱ्यांबाबत तोच निकष का लागू करण्यात आलेला नाही, असा स्वाभाविक प्रश्न उपस्थित होत आहे. नियम व्यक्ती पाहून बदलता कामा नयेत; तो सर्वांसाठी समान असला पाहिजे. हाच सुशासनाचा पाया आहे. महापौरांनी चौकशीचे आदेश दिले, आयुक्तांनी त्रिसदस्यीय समिती नेमली, ही सकारात्मक बाब आहे. आता चौकशी जलद, निष्पक्ष आणि निर्भीडपणे पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई झाली, तर नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. विकासासाठी विक्रमी निर्णय जितके आवश्यक आहेत. सोलापूरकरांना केवळ विकासकामेच नकोत, तर त्या कामांमागील प्रत्येक रुपयाचा प्रामाणिक हिशेबही हवा आहे. विकास आणि पारदर्शकता हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत; त्यापैकी एकही बाजू कमकुवत होता कामा नये.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### माढ्यात ५०० वारकऱ्यांना रेनकोटसह उपयुक्त साहित्यांचे वाटप

**माढा, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त माढा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा ॲड मिनल साठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रियदर्शिनी महिला विकास मंडळ व राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने पावसाळी पार्श्वभूमीवर ५०० हून अधिक वारकर्यांना रेनकोट, फळे, बिस्कीट, औषधे, शाल तसेच महिलांसाठी उपयुक्त वस्तूंचे वाटप आज करण्यात आले. वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा मानून वारकरी संप्रदायाची सेवाभावी वृत्ती अंगीकारत समाजसेवा आणि मानवतेचा संदेश जपण्यासाठी प्रियदर्शनी महिला विकास मंडळ आणि राष्ट्रवादी महिला काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे नगराध्यक्षा मिनल साठे व राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अर्चना राऊत यांनी सांगितले. या प्रसंगी उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, सभापती रेश्मा लंकेश्वर, माजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) महिला अध्यक्षा अर्चना राऊत, महिला मंडळाच्या सदस्या अपर्णा मेहता, अरुणा देशपांडे, गीतांजली देशमुख दीपाली गुंड, रेहाना शेख, मालती शहा उपस्थित होत्या.



### सोलापुरातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रिपाइंची बैठक

**अक्कलकोट, दि. २३ जुलै-**

रिपाइं आठवले गटाचे प्रदेशाध्यक्ष राजा सरवद यांच्या नेतृत्वाखाली २६ जुलै रोजी सोलापुरात होणाऱ्या आंदोलनासंदर्भात अक्कलकोट तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक झाली. तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. शहराध्यक्ष अजय मुकणार अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, सामुदायिक बुद्धवंदना झाली. अविनाश मडिखांबे यांनी आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात आयोजित निदर्शनामागील कारणे स्पष्ट केली. अजय मुकणार यांनी आंदोलनाविषयी सविस्तर माहिती दिली. बैठकीस तालुका उपाध्यक्ष अंबादास गायकवाड, रमेश बनसोडे, चंद्रकांत गायकवाड, युवक तालुकाध्यक्ष आप्पा भालेराव, राजू बोरगाव, नितेश मडिखांबे, विलास गायकवाड, चंद्रकांत गायकवाड,रमेश धोडमणी आदींसह प्रमुख सदस्य,पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन विजय पोतेनवरू यांनी केले.




### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन

**पिलीव, दि.२३ जुलै-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समीतीचे सदस्य संजय पाटील यांच्या हस्ते स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक मासाळ, ज्येष्ठ शिक्षक सत्यवान वाघमारे उपस्थित होते.

# आषाढीनिमित्त विविध शाळांमध्ये बालदिंडी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३जुलै-**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून शहर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये आज बालदिंडी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात शाळकरी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी पोशाख, तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांची हुबेहूब वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टाळ-मृदंगाचा गजर आणि 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या विठूनामाच्या जयघोषात चिमुकल्यांनी संपूर्ण परिसर भक्तिमय करून सोडला. डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या सुंदर रूपातील बालके या पालखी सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली.


उत्कर्ष विद्यालय, सांगोला



## न्यू इंग्लिश स्कूल, करकंब

न्यू. इंग्लिश स्कूल करकंब या प्रशालेमध्ये आषाढी वारी तसेच प्रशालेत येणाऱ्या श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त प्रशालेमध्ये बाल वारकरी दिंडी उत्साहात पार पडली. विठ्ठल, रखुमाई, वारकरी रुपातील विद्यार्थांकडे पाहिल्यानंतर साक्षात विठ्ठल, रखुमाईच करकंबमध्ये अवतरल्याचा भास होत होता. प्रशालेतून निघालेली बालदिंडी एसटी स्टँड समोरील चौकात विविध प्रकारची भक्ती गीते,भारुडाचे सादरीकरण करून परत शाळेत आली. वारकरी दिंडीची सुरुवात श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यातील ज्येष्ठ वारकऱ्यांच्या हस्ते करून या दिंडीची सांगता संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे यांच्या हस्ते झाली.याप्रसंगी संस्थेचे सचिव देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापक श्रीकांत लऊळकर पर्यवेक्षक शिक्षिका शिंदे उपस्थित होते.

## सोजर इंग्लिश स्कूल, बार्शी

सोजर इंग्लिश स्कूल, प्राथमिक विभागाच्यावतीने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विठ्ठल नामाच्या गजरात हभप मांजरे महाराज, हभप देशपांडे महाराज तसेच मुख्याध्यापिका रिटा नेटके यांचे हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या मुर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्यावतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी हभप मांजरे महाराज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शिक्षिका दिपाली देशमुख यांनी केले. यानंतर मुख्य दिंडी सोहळ्यात विठ्ठल-रुक्मिणी या बरोबरच संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपानदेव, चांगदेव, संत एकनाथ, मुक्ताबाई, जनाबाई, मीराबाई यांसारख्या संतांच्या वेशभूषा परिधान करुन विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. शाळेचे पालक रमेश मोरे यांनी पालखीचे सपत्नीक पूजन केले. तसेच दिंडीतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक विभागाच्या नेतृत्वाखाली शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## उत्कर्ष विद्यालय, सांगोला

सांगोल्यातील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेली बालदिंडी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षिका पल्लवी भंडारे यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी संत, श्री विठ्ठल-रुक्मिणी तसेच वारकरी यांची आकर्षक व पारंपरिक वेशभूषा परिधान करून वारकरी संप्रदायाची भक्तिमय परंपरा साकारली. विद्यार्थ्यांच्या हस्ते पालखी पूजन व विठुरायाची आरती करण्यात आली. यावेळी इ.१ लीने चंद्रभागेच्या तिरी, इ.२ रीने हरिनामाची शाळा भरली, इ.३ रीने अशी पंढरी पंढरी तर इ.४ थीने या पंढरपुरात सोन्याचं बाशिंग या गीतांवर नृत्य सादर केले. या विद्यार्थ्यांना संगीत शिक्षिका शुभांगी कवठेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा दमयंती कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शिक्षिका वर्षा रास्ते यांनी केले.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करांडेवस्ती

माळिशरस तालुक्यातील करांडे वस्ती पिलीव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा आषाढी दिंडी सोहळा विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि पारंपरिक वारकरी विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेत संपन्न झाला. या सोहळ्यात चिमुकल्या बालिका नी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात परीसरामधे शोभायात्रा काढून उपस्थितांची मने जिंकली. या दिंडी सोहळ्यामधे रुक्मिणी म्हणून खुशी भैस तर विठ्ठल म्हणून वल्हभ भिसन बनले होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रमोद भैस, मुख्याध्यापक प्रमोद करडे, उपशिक्षिका वंदना ऐवळे, मोहन करांडे, भगवान बगाडे, नवनाथ करांडे, अश्विनी करांडे, सुजाता सुळे,अंगणवाडी सेविका कविता देशमुख, श्रीमती जिजाई बगाडे, आशा करांडे, कल्पना चोबे,शितल सुळे, वर्षा भैस,प्राजक्ता भिसन, सोनम भैस, द्रोपदी भैस, शालन करचे, पुजा बोडरे उपस्थित होते.

## कर्मयोगी विद्यानिकेतन, पंढरपूर

कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूर येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने बाल वारकरी आषाढी वारी दिंडी सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी पारंपरिक वारकरी पोशाखात नटलेल्या विद्यार्थ्यांनी 'जय हरी विठ्ठल' आणि 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय करून सोडला. विद्यार्थ्यांनी हातात टाळ-मृदंग घेऊन आणि सामाजिक संदेश देणारे विविध प्रबोधनात्मक फलक हाती धरून साक्षरता व



सामाजिक जनजागृतीचा संदेश दिला. या दिंडी सोहळ्याचा शुभारंभ श्री. व सौ. धोकटे आणि श्री. व सौ. कांबळे या पालकांच्या हस्ते पालखीचे पूजन करून करण्यात आला. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण भव्य 'रिंगण सोहळा' ठरले. दिंडीची सांगता रिंगण सोहळ्याने झाली. या पारंपारिक दिंडी आणि रिंगण सोहळ्याचे औचित्य साधून प्राचार्या प्रियदर्शिनी सरदेसाई म्हणाल्या, 'शेकडो वर्षांपासून सुरू असलेल्या या धार्मिक व सांस्कृतिक उत्सवाची परंपरा कर्मयोगी विद्यानिकेतनने आजही जपून ठेवली आहे. याप्रसंगी श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, रजिस्ट्रार गणेश वाळके उपस्थित होते.



## उमाबाई श्राविका विद्यालय, सोलापूर

उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आषाढी एकादशीचे औचित्य साधून 'वारकरी दिंडी' सोहळा पार पडला. या दिंडीने संपूर्ण परिसर विठ्ठलमय करून टाकला. सुरुवातीस श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करून दिंडीला सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापिका अश्विनी पंडित, उपमुख्याध्यापिका माधवी खोत, मार्गदर्शिका दीप्ती शहा व पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती. मूर्ती पूजनानंतर प्रशालेच्या प्रांगणातून शहरातील मुख्य रस्त्यांवरून दिंडी रॅली काढण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीसह विविध संतांच्या हुबेहूब वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. हातात टाळ-मृदंग घेऊन अभंग आणि गवळणी गात विठुरायाचा गजर करत विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी रेखाटलेले विठ्ठलाचे रेखीव चित्र या दिंडीचे आकर्षण ठरले. सहशिक्षिका पल्लवी खांडवे व सोनाली उंडे यांनी सादर केलेल्या विविध अभंग गायले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख अनुप कस्तुरे, जयश्री आगरखेड, प्रीती वऱ्हाडे, सुहास छंचुरे, अभिजीत पाटील, मीनाक्षी बेळळे, प्रियंका जैन आदींनी परिश्रम घेतले.

## मेहता प्राथमिक शाळा, जुळे सोलापूर

माऊली माऊली विठ्ठल माऊली या जयघोषात कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळा,जुळे सोलापूर येथे नयनरम्य असा दिंडी सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, हभप शिवाजी पोतदार, सुरेशबाबु मंकणी, मुख्याध्यापिका सौ. सीमा कोरवलीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळा समिती अध्यक्ष अनिल बरवे यांनी आषाढी एकादशी निमित्त सगळ्यांना शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन, संतमंडळींचे पूजन, वठ्ठल-रुक्मिणी पूजन करण्यात आले. श्रुती कुलकर्णी, मधुरा छत्रे यांच्या विठ्ठलाच्या गजरावर सर्वांनी ताल धरला. तिसरीच्या बालवारकऱ्यांनी बघ उघडून दार या अभंगाचे सादरीकरण केले. तसेच इ ४ थी च्या विद्यार्थ्यांनी रिंगणातील खेळ सादर केले. सूत्रसंचालन व अतिथींचा परिचय मयुरी दुरुगकर यांनी केले. तर आभार स्वाती मोहरे यांनी मानले. विठ्ठलाच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली व शेवटी सर्वांना प्रसाद देण्यात आला.



# आषाढी एकादशीला शनिवारी पंढरपुरात वारकरी महाअधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

वारकरी संप्रदायाच्या विविध प्रलंबित मागण्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी तसेच वारकरी ऐक्य अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आषाढी एकादशीला शनिवार दि. २५ जुलै रोजी दुपारी १२.३० ते ३.३० या वेळेत पंढरपूर येथे भक्तीमार्गावरील सद्गुरू श्री गंगागिरी महाराज मठात एक दिवसीय वारकरी महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत दिली. अधिवेशनाचे अध्यक्षस्थान आचार्य पूज्यपाद श्री १००८ दंडी स्वामी अमृताश्रम महाराज भूषविणार असून, महंत प.पू. रामगिरी महाराज यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या अधिवेशनात ज्येष्ठ कीर्तनकार संतवीर ह.भ.प. बंडातात्या कराडकर, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वरशास्त्री महाराज आणि सचिव ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे (पंढरपूर) विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. माणिक महाराज मोरे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान (आळंदी) चे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, अखिल भारतीय संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती महाराज मार्गदर्शन करतील. तसेच्च, शिवसेना आध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष श्री. अक्षय महाराज भोसले, भाजप आध्यात्मिक समन्वय आघाडीचे प्रदेशप्रमुख तुषार भोसले, राष्ट्रीय वारकरी परिषदेचै ह.भ.प. मारुती महाराज तुनतुने, ह.भ.प. बापू महाराज रावकर, हभप निवृत्ती महाराज हल्लूयाळीकर आणि हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांसह अनेक मान्यवर संत, महंत, धर्माचार्य आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रमुखही आपले विचार मांडणार आहेत. या पत्रकार परिषदेला राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. मारुती महाराज तुनतुने, प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे धर्माधिकारी प्रसाद पंडित, हिंदु जनजागृती समितीचे दत्तात्रय पिसे, ह.भ.प. निवृत्ती महाराज हल्लूयाळीकर आदी उपस्थित होते.

# नाझरे मठ येथे वारकऱ्यांना लाडू-चिवडा, डाळिंब व केळीचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ जुलै-**

पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलनामाचा गजर करत पायी निघालेल्या वारकऱ्यांना सांगोला तालुक्यातील नाझरे मठ येथे चोपडी येथील पोपट यादव, राजू यादव, हनुमंत बाबर, अमोल बाबर, संजय पाटील यांच्या वतीने लाडू-चिवडा, डाळिंब व केळीचे तसेच अक्षय सपताळ यांच्याकडून चहा वाटप करण्यात आला. यावेळी भिकाजी बाबर, अमोल यादव, शुभम यादव, विकास यादव, सचिन खळगे, विलास बाबर, बापूराव यादव, बाळासाहेब यादव, प्रतापराव पाटील, विकास गिड्डे, विनायक जावीर, बंडू मेखले, राजू मेखले, उमाजी चव्हाण, नवनाथ खळगे, विजय बाबर, गणेश यादव, कुलदीप यादव, प्रीतम यादव उपस्थित होते. या सेवाकार्याचे वारकरी तसेच ग्रामस्थांनी कौतुक केले.

# पालखी सोहळे आज पंढरीत होणार दाखल

## ‘वाखरी’मध्ये शेवटच्या मुक्कामासाठी विसावा; वारकऱ्यांना लागली ‘पंढरी’ची ओढ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जूलै -**

**कन्या सासुऱ्यासी जावे । मागे परतोनि पाहे ।। तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटसी केशवा ।।** या तुकोबारायांच्या अभंगाप्रमाणे आषाढी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांची अवस्था झाली आहे. विठुरायाच्या भेटीसाठी आतुर झालेल्या लाखो वैष्णव आपल्या संतांच्या पालखी सोहळ्यांसह गुरुवारी वाखरी मुक्कामी दाखल झाले.



संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगतगुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी (दिंडी) सोहळ्याचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश झाला आहे. गुरुवारी संध्याकाळी हे दोन्ही पालखी सोहळे, दिंडी सोहळ्यातील शेवटच्या मुक्कामासाठी वाखरी येथे दाखल झाले. त्यामुळे पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना आता पुण्यनगरी पंढरीकडे येण्याची ओढ लागली आहे. वारकरी सांप्रदायामध्ये सर्वात मोठा उत्सव म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो; तो आषाढी यात्रेचा सोहळा अवघ्या दोन दिवसांवर आलेला आहे. शनिवारी (दि.२५ जुलै) आषाढी एकादशीचा महा उत्सव होत आहे. दरम्यान संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकोबारायांचे पालखी सोहळे शेवटच्या मुक्कामासाठी गुरुवारी (दि. २३) संध्याकाळी वाखरी मुक्कामी दाखल झालेले आहेत.

आषाढी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी लाखों वैष्णव पंढरीच्या दिशेने येवू लागलेले आहेत. यात्रेच्या मुख्य दिवसांमध्ये गर्दीमुळे श्री विठ्ठल-रुक्मिणीचे व्यवस्थित दर्शन घडत नसल्यामुळे अनेक वारकरी दर्शन घेण्यासाठी पालख्यांमधून अगोदरच पुढे येत आहेत. त्यामुळे शहरातील रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत. जसजसे हे पालखी सोहळे पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करु लागलेले आहेत. तसतशी या सोहळ्यांमध्ये सहभागी वारकरी, भाविकांची विठ्ठल दर्शनाची भूक वाढू लागलेली आहे. दरम्यान आषाढी यात्रेसाठी येथील व्यापारी तसेच फक्त यात्रा,जत्रें मध्येच व्यापार करुन उपजिविका चालविणारे बाहेरगावच्या व्यापाऱ्यांची देखील दुकाने थाटण्यासाठी सध्या लगबग दिसत आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, मुख्य स्टेशन रस्त्यावरील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची आपआपल्या दुकानांमधून यात्रेसाठी माल लावण्याची तयारी अंतिम टप्प्यात आलेली दिसत आहे. पालखी सोहळ्याबरोबर चालणारे भाविक सध्या पालखी सोहळ्यामधून पुढे येथे येवून येथील मठ, धर्मशाळा तसेच मंदिर परिसरातील मोठ्या वाड्यांमधून आपल्या खोल्या आरक्षित करीत आहेत. आपल्याबरोबर आणलेले सामान या खोल्यांमधून ठेवून चंद्रभागा स्नान, विठुरायाचे दर्शन, नगर प्रदक्षिणा करुन पुन्हा पालख्यांमधून सहभागी होत आहेत. त्यामुळे एकंदरीतच पंढरीत संपुर्ण वातावरण भक्तीमय झाले आहे. दरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकोबारायांचे पालखी सोहळे दशमीच्यादिवशीशुक्रवारी(दि.२४)संध्याकाळी पंढरपूरात दाखल होत आहेत. दरम्यान संत मुक्ताबाईसह तसेच इतर अनेक संतांचे पालखी सोहळे येथे दाखल झालेले आहे.

**उपनगरांमधून देखील वारकऱ्यांची वर्दळ**

जिल्हा प्रशासनाने यात्रेच्या काळात गर्दी टाळण्यासाठी प्रयत्न केले आहेत. वारकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पंढरपूर शहरात रस्त्यांवरील अतिक्रमणे, आवश्यकता तेथे एकेरी वाहतूक, मंदिर परिसरात नो व्हेईकल झोन, फेरीवाल्यांना रस्त्यांवर बसण्यास मज्जाव केला आहे. त्यामुळे शहरात गर्दी असूनही रस्त्यांवर वारकऱ्यांना चालताना कोणताही गर्दीचा त्रास जाणवत नाही. प्रशासनाच्या या काटेकोर नियोजनामुळे वारकऱ्यांची वाहने तसेच वारकऱ्यांनी आपला मोर्चा उपनगरांकडे वळवल्याचे दिसत आहेत. दरवर्षीपेक्षा उपनगरांमधून विशेष: रेल्वे स्टेशन, गणेश नगर, टाकळी रोड, मनिषा नगर, इसबावी भागातील उपनगरे, लिंकरोड परिसरातील उपनगरे आदीं भागात वारकऱ्यांची वाहने अधिक प्रमाणात दिसत आहेत. वारकरी भाविकांचे जथ्थेही येथे वास्तव्यास आहेत.

# आषाढी यात्रेत ढोलकींना मागणी
## उत्तरप्रदेशातून कारागीर ‘पंढरी’त दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ जुलै-**

आषाढीयात्रेमध्ये ढोलकी विकून चार पैसे मिळवण्यासाठी खास उत्तरप्रदेशातून काही कारागीर मंडळी पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत. पंढरपूरात खास यात्रेमध्ये ढोलक्यांची विक्री करण्यासाठी ही मंडळी येथे आलेली आहेत.



आषाढी यात्रेच्या काळात वारकऱ्यांकडून भजन, कीर्तनासाठी विविध प्रकारच्या वाद्यांना चांगलीच मागणी असते. त्यामुळे आम्ही गेल्या चार वर्षापासून येथे येत आहोत. भारतामध्ये बऱ्याच राज्यातून आम्ही यात्रांच्या काळात आमची ढोलकी विकलेली आहेत, असे या कारागीर मंडळींकडून सांगण्यात आले.

शहराच्या विविध भागामधून खास यात्रेसाठी वास्तव्यास असलेली ही मंडळी सध्या ढोलकी तयार करण्याचे काम करीत आहेत. लाकडाऐवजी खास प्रकारच्या पुठ्यापासून ही ढोलकी बनवली जातात. ही ढोलकी वजनाला हलकी असल्याने अगदी लहान मुलांनाही ते गळ्यात अडकावून वाजविता येतात. सुमारे २५०, ३०० रुपयांपासून ते ५०० ते ६०० रुपयांपर्यंतची विविध आकारातील आणि रंगातील ढोलकी विक्रीस उपलब्ध आहेत.

लहान मुले, संगीत शिकणारे कलावंत तसेच संगीतप्रेमी मंडळींकडून आमच्या ढोलक्यांना मागणी असते. या मंडळींच्या घरातील जे बुजूर्ग, अनुभवी लोक आहेत ते सध्या ढोलकी बनविण्याचे काम करताना दिसत आहेत. त्यांना कुटुंबियही मदत करत आहेत.

## ग्लोबल दिंडीमध्ये श्वानाचाही सहभाग; मुक्या प्राण्यांनाही श्री विठ्ठलाची ओढ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जुलै-**

६ जूनपासून तब्बल ११ देशांमधून प्रवास करीत पहिली ग्लोबल दिंडी पंढरपूरात दाखल झाली आहे. विशेष म्हणजे या ग्लोबल वारीमध्ये लंडन ते पंढरपूर प्रवासात एक निरागस श्वान गेल्या ५ दिवसांपासून, जवळपास ६० ते ७० किमी अंतर या दिंडीतील भाविकांसोबत चालत आहे.



नातेपुतेपासून न भुंकता, न थकता चक्क तो या वारीचा साथीदार बनला आहे. पालखी जिथे मुक्कामी असेल तिथे तो मुक्काम करतो आणि पुन्हा दिंडीसोबत चालतो. वारकरी परंपरेनूसार प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचा अंश आहे. कदाचित माऊलीनेच या मुक्या जीवाच्या रूपाने आपल्या वारीला साथ दिली असावी, अशी भावना त्याची निष्ठा, प्रेम आणि साथ पाहून व्यक्त होत होती. ग्लोबल दिंडीचे प्रमुख अनिल खेडकर यांनी सोशल मीडियावर या बाबतचा व्हिडिओ शेअर केला आहे. ग्लोबल दिंडी मध्ये अनेक विलक्षण अनुभव त्यांना आले आहेत. ही दिंडी सोमवारी (दि.२०) पंढरपूर येथे पोहोचली आहे. पांडुरंगाने दिंडी मध्ये कोणतेही विघ्न येऊ दिले नाही, अशी भावना या दिंडीतील वारकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# ‘पंढरी’तील प्रासादिक साहित्याची दुकाने सजली

## पेढा, बुक्का, कुंकू, चुरमुरे, साखर फुटाणे, अगरबत्ती, टाळ, पखवाज, वीणा, मूर्तींना मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जुलै-**

आषाढी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी वारकरी भाविकांची पंढरपूरात मांदियाळी दिसत आहे. मंदिर परिसरात असलेल्या प्रासादिक साहित्याच्या दुकानांतून प्रासादिक साहित्य खरेदी करण्यासाठी भाविकांची गर्दी होवू लागली आहे. आषाढी यात्रेच्या काळात प्रासादिक साहित्याच्या विक्रीतून पंढरपूरात मोठी उलाढाल होत असते.



यावर्षी सुरुवातीला जरी पावसाने ओढ दिली असली तरी नंतरच्या काळात वरुणराजा सध्या दमदार बॅटींग करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा काही प्रमाणात पल्लवीत झालेल्या आहेत. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विठुरायावर हवाला ठेवीत वारी कदापि चुकवू द्यावयाची नाही या वारकरी संप्रदायाच्या नियमाला अनसरुन आषाढी यात्रेसाठी मोठ्या संख्येने वारकरी येथे दाखल होत आहेत. यंदा यात्रेसाठी ३० लाखांहून अधिक वारकरी हजेरी लावतील असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वर्तविला आहे. प्रशासनाने देखील २० ते २५ लाख भाविकांची उपस्थिती राहिल हे गृहित धरुन यात्रेची तयारी केलेली आहे. आषाढी यात्रेला राज्यासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात आदी राज्यांतून सुमारे वीस लाखांहून अधिक भाविक दाखल होतील, असा प्रशासनाचा अंदाज आहे. त्यामुळे आषाढी यात्रेत प्रासादिक साहित्याला मोठी मागणी असणार आहे. गावी परत जाताना प्रसाद म्हणून बुक्का, पेढे, अगरबत्ती, नारळ, हार, कुंकू, हळद, टाळ, पखवाज, वीणा, देवाच्या मुर्ती, लहान मुलांची खेळणी आदी साहित्यांची मागणी भाविक करत असतात. सध्या श्री विठ्ठल मंदिराभोवताली प्रासादिक साहित्यांची दुकाने विविध प्रकारच्या प्रासादिक वस्तूच्या मालाने फुललेली दिसत आहेत. त्याचबरोबर शहरातील चौफाळा, छत्रपती शिवाजीमहाराज चौक, स्टेशन रोड, नगरप्रदक्षिणा रस्ता, नाथ चौक, हरिदास वेस, तांबडा मारती, कालिकादेवी चौक, काळा मारती आदी ठिकाणी प्रसाद, टाळ व पखवाजाची दुकाने आहेत. बुक्का, कुंकू, चुरमुरे, कांडे साखर, बत्तासे साखर, साखर फुटाणे आदी खरेदी करण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

**५०० कोटी उलाढालीचा अंदाज**

वर्षातील सर्वात मोठी आषाढी वारी पंढरी नगरीमध्ये भरत असते. या आषाढी वारीला संपूर्ण बाजारपेठ फुललेली आहे. या छोट्या-मोठ्या व्यवसायांतून जवळपास पाचशे कोटींच्या वर उलाढाल होत असते. यंदाही त्याच शक्यतेने या वारीत मोठ्या प्रमाणात पंढरपूर शहरातील आणि बाहेरचे व्यापारी आपली दुकाने मांडली आहेत.

**भाविकांकडून प्रसादाला मोठी मागणी**

आषाढी वारीला भाविकांची सध्या मोठी गर्दी आहे. यामुळे भाविकांची मोठी मागणी प्रसाद साहित्याला असते. संपूर्ण प्रसाद पॅक करून दुकानात मांडणी केली आहे. जेणेकरून भाविकांना सर्व साहित्य पाहायला मिळते जाणि विक्रीही लवकर होते. पेढा, चुरमुरे, साखर फुटाणे, कांडे बत्तासे, बुक्का, कुंकू, अगरबत्ती, टाळ, तुळशी माळा, चंदनाचा गंध या साहित्यांना भाविकांची प्रचंड मागणी असते.

- **राजेंद्र खंडागळे,** प्रासादिक साहित्य विक्रेता.

## हृदयविकाराच्या झटका आलेल्या वारकऱ्याला उपचार

### पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/पंढरपूर, दि. २३ जुलै-**

आषाढी यात्रेसाठी आलेल्या दिंडीसोहळ्यात वाखरी येथे कीर्तन करत असताना एका वारकऱ्याला तीव्र हृदयविकाराचा झटका आला. मात्र त्याला तातडीने वैद्यकीय उपचार मिळाल्याने त्याच्या जीवावर आलेले गंडांतर टळले.

दिगंबर जाधव, (वय ६०, रा. हदगांव, जिल्हा नांदेड) असे त्यांचे नाव आहे. आषाढी यात्रेसाठी ते आपल्या सहकारी वारकऱ्यांसह आले होते. मात्र वाखरी येथे कीर्तन करत असताना त्यांना अचानक हृद्यविकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर ते स्वतःहून तातडीने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे दाखल झाले. यावेळी आयसीयू नोडल अधिकारी डॉ. महेश कुमार सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली फिजिशियन डॉ. सीमा इंगोले यांनी रुग्णाचा इसीजी काढला. प्राकृतिक दोष अभ्यासल्यावर त्यांना तातडीने आयसीयूमध्ये दाखल केले. त्यांच्यावर ‘थ्रोम्बोलायसिस’ करण्यात आले. या उपचारामुळे रक्तवाहिनीतील अडथळा दूर करण्यास मदत झाली. रुग्णाची स्थिती स्थिर करण्यात आली. त्यानंतर आवश्यक वैद्यकीय उपचार व सतत देखरेखीखाली रुग्णाची प्रकृती सुधारली. आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी चोवीस तास कार्यरत असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सरडे यांनी दिली.

**वारकऱ्याची प्रकृती सध्या उत्तम**

सध्या संबंधित वारकरी भाविकाची प्रकृती चांगली असून, तो धोक्याबाहेर आहे. आषाढी यात्रेदरम्यान वारकरी भाविकांना तत्पर, दर्जेदार आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर सज्ज आहे.

- **डॉ. विजयकुमार सरडे,** वैद्यकीय अधीक्षक,उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर.

## गुड समॅरिटन ॲपमुळे वाचले प्राण

**सोलापूर/पंढरपूर, दि. २३ जुलै-**

वारीदरम्यान पंढरपूर येथे महिलेस अचानक चक्कर येऊन ती बेशुद्ध पडली. तेव्हा गुड समॅरिटन स्वयंसेवकांनी ॲपद्धारे तात्काळ आपत्कालीन माहिती पाठविल्याने तिला वेळेत वैद्यकीय मदत मिळाली, आणि तिचे प्राण वाचल्याचे ॲपचे स्वयंसेवक दयानंद मेंशेके यांनी सांगितले.

जिल्ह्यातील दयानंद मेंशेके यांनी दुपारी १२:११ वाजता गुड समॅरिटन ॲपद्वारे आपत्कालीन सूचना पाठविली. त्यानंतर १०८ आपत्कालीन प्रतिसाद केंद्रांने पूळूज प्राथमिक आरोग्य केंद्रांची रुग्णवाहिका रवाना केली. रुग्णवाहिका ११ मिनिटे ५५ सेकंदांत (१२:२९ वाजता) घटनास्थळी पोहोचली. रुग्णवाहिकेच्या वैद्यकीय पथकाने महिलेवर तातडीने प्राथमिक उपचार केले. नंतर पुढील वैद्यकीय उपचारासाठी सेवा उपलब्ध करून दिली. विशेष म्हणजे, १०८ रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचेपर्यत गुड समॅरिटन स्वयंसेवकांनी महिलेची काळजी घेतली व तिला सुरक्षितपणे १०८ वैद्यकीय पथकाच्या स्वाधीन केले. त्यांच्या तत्परतेमुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला वेळेत उपचार मिळाले. वारीच्या पूर्वतयारीदरम्यान शासनामार्फत आयोजित प्रशिक्षणामुळे आम्हाला आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रकारे मदत करण्याचे कौशल्य प्राप्त झाले. महिला बेशुद्ध पडल्याचे पाहताच मी तत्काळ ॲपद्वारे माहिती दिली. ॲप प्रभावीपणे कार्यरत होते आणि १०८ रुग्णवाहिका अल्पावधीत घटनास्थळी पोहोचली. त्यामुळे रुग्णाला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्याचेही मेंशेके यांनी सांगितले.



## नारायण गड पालखी सोहळ्याचे मोडनिंब येथे स्वागत

### पुष्पवृष्टी, उभे रिंगण, अश्वपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२३ जुलै-**

मोडनिंब (ता.माढा) येथे श्री क्षेत्र नारायणगड पायी दिंडी पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. शहरात पालखीचे आगमन होताच अश्व राजाचे स्वागत करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

श्रीक्षेत्र नारायणगड पालखी मोडनिंब येथे मुक्कामास असते. या सोहळ्यास १०० वर्षाहून अधिक वर्षाची परंपरा आहे. यावेळी सरपंच लक्ष्मी पाटील, कैलास तोडकरी, कुरण गिड्डे, ग्रा.प. सदस्य बालाजी पाटील, दत्तात्रय सुर्वे, मनसेचे प्रशांत गिड्डे, वैभव मोरे, राहुल पाटील, विजयकुमार नामदे, राहुल गांधी आदी उपस्थित होते. पालखीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. हरिनामाच्या जयघोषात आणि टाळ मृदुंगाच्या निनादात शहर प्रदक्षिणा झाली. शहर प्रदक्षिणेची आदर्शनगर, दत्तनगर, जय भवानी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, श्रीराम चौक, शिवशक्ती चौक, श्री वेताळ देवस्थाननजीक सांगता झाली. दिंडीत भगव्या पताका, पारंपरिक टाळकरी, विणेकरी यांनी विठ्ठलनामाचा ठेका धरत पाउंड खेळले. डोईवर तुळशी वृंदावन घेऊन महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. महिलांनी फुगडीचा आनंद घेतला. दिंड्या शहरात आल्यानंतर परिसर भक्तिमय झाला.

शहरातील स्टेशन रोड, स्वामी समर्थ चौक यासह अनेक ठिकाणी वारकऱ्यांसाठी अल्पोपहार वाटप करण्यात आला. परंपरेनुसार गावकरी वारकऱ्यांना घरी जेवायला घेऊन गेले. पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांनी गर्दी केली होती. मोडनिंब येथे एक दिवसाचा मुक्काम घेऊन पहाटे पालखीने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरास निघालेल्या या दिंडी सोहळ्यात १२ हजार वारकरी आहेत.

# विडी कामगार महिलांकडून पांडुरंगाच्या चरणी कीर्तन अन् भजनाचे शब्दसुमन

### ज्ञान प्रबोधिनीच्या म्याकल यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा । अश्विनी तडवळकर**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सोलापूरच्या पूर्व भागातील अनेक महिलाना एकत्र करून ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या स्त्री शक्ती सक्षमता विभागाच्या वतीने विधी मिळणाऱ्या महिलांना मातृभाषा तेलुगु असतानाही मराठीतून अभंग व कीर्तन भजन म्हणण्याचे प्रशिक्षण देऊन अध्यात्माच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.



विशेष म्हणजे या महिला विठ्ठलाच्या चरणी आपली भक्ती वाहण्यासाठी मातृभाषा म्हणजेच तेलुगु भाषेतूनही पांडुरंगाला अभंग सादर करत आहेत. त्या त्यांच्या या सादरीकरण पाठीमागे पांडुरंगाला भेटण्यासाठी पंढरपुरात जाऊ शकलो नाही तरी शब्दसुमनाने हृदय सेवा करीत आहोत असा संदेश दिला आहे.

रोज आपल्या विडी वळण्याचे काम करून विड्या झाल्यानंतर या महिला दीड ते दोन तास या भजनाच्या सरावाला देतात. भजन कोणते आहे अभंग कोणते आहे त्यातील शब्द काय आहेत टाळ वाजवण्याची कला किंवा पेटी आणि तबल्यासोबत भजनाचे शब्द कसे म्हणायचे आहेत या सगळ्याची अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सराव प्रशिक्षण घेऊन या महिला तयार झाल्या आहेत.

सध्या दीडशेहून अधिक महिला याचं काम करत असून शहरातल्या विविध भागांमध्ये यांचे गट तयार करण्यात आले आहेत यासाठी विशेष ताई काम करत असून समन्वयासाठी याच गटातील महिला पुढाकार घेतात आणि त्यांना हवी त्या पद्धतीने प्रशिक्षणाची तयारी ज्ञानप्रबोधिनी संस्थेच्या स्त्री सक्षमता विभागाच्या अंबिका म्याकल या करतात.

**कर्तव्यासह अध्यात्माचा आनंद**

विडी कामगार महिलांना २४ तासही कमी पडतात. घरचे काम करून पुन्हा विड्या मिळण्याचे काम या महिलांना करावे लागते विड्या झाल्यानंतर त्या कारखान्यात नेऊन देणे आणि पुन्हा येणे असे दिवसभर व्यस्त असतात. त्यातूनही आपल्यात ईश्वराचा अध्यात्म अंश रुजवावा या प्रांजळ भावनेतून या महिला रोज वेळ देतात आणि एकमेकांना बोलावून घेऊन सराव करतात. त्यातून शब्दा शब्दाचा अर्थ शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात म्हणजेच कर्तव्य आणि आनंद याचा मेळ घालून या महिला पांडुरंगाच्या चरणी शब्दसुमन वाहत आहेत. याकरिता ज्ञानप्रबोधिनी संस्थेचे सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी यांनी प्रेरणा दिली आहे.

- **अंबिका म्याकल,** स्त्री सक्षमता विभाग प्रमुख

**वेगळंच समाधान मिळते**



आम्ही रोज आमचे काम करतोच मात्र काम करून पुन्हा दुपारी भजन कीर्तन करतो. त्याचा आनंद गगनात मावणारा नाही. या आनंदाने आम्हाला वेगळेच अपूर्व समाधान मिळते ज्ञानप्रबोधिनीने आम्हाला ज्या पद्धतीने प्रशिक्षण दिले आहे त्याचे किती आभार मानावे तितके कमी आहेत या उपक्रमासाठी आम्ही कायम सकारात्मक असतो आणि सक्रियही असतो.

**-मधुरा द्यावनपल्ली,** महिला भक्त